पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५, खंड २४, अंक ६-७, पृष्ठे १००

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ दीपज्योत
७ ■ पाण्याची तहान कृत्रिम बुद्धिमत्तेलाही!
१२ ■ पर्यावरण संवर्धनाची चिनी वाट
१७ ■ काटकसरीच्या राजकीय धोरणांचे तर्कशास्त्र आणि फलित
३० ■ ऋजू परंतु खंबीर नेतृत्त्वाचे वेधक जीवनदर्शन
४० ■ विस्कटलेले अर्थकारण फ्रान्समधील राजकारणाच्या मुळावर...

**पुरवणी**

५४ ■ (१) ज्ञानदेव, 'ज्ञानदेवी' आणि भाषाव्यवहार

**उजळणी**

७४ ■ (१) : रामकृष्ण गोपाळ भांडारकर


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१–२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०–२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई–मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक ६–७)**
**सप्टेंबर–ऑक्टोबर २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# दीपज्योत

‘अर्थबोधपत्रिके’च्या कुटुंबातील सर्व सदस्यांना दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छा. दिवाळीतील पाडव्यापासून आपल्या सगळ्यांच्या जीवनात प्रवेशणारे नवीन संवत्सर येताना शांती, समाधान, कल्याण आणि आनंद बरोबर घेऊन येवो हीच मनोकामना.

आपण आज, एका अर्थाने, ज्ञानयुगामध्ये जगत आहोत. ‘माहिती’ आणि ‘ज्ञान’ या दोहोंत जो फरक आहे तो आपण घटकाभर बाजूला ठेवू. ज्ञान आणि माहितीचा चौफेर अक्षरश: विस्फोट होत असताना त्या धबधब्याचे रूपांतर प्रबोधनासाठी परिणामकारकरीत्या कसे घडवून आणायचे, हा खरा प्रश्नच आहे. अभिजाततेचा दर्जा मिळवून घेतलेली मराठी आमची लोकभाषा असली तरी, जागतिक पातळीवर ज्ञानभाषा म्हणून प्रतिष्ठित आहे इंग्रजीच. त्यांमुळे, कोणत्याही ज्ञानशाखेतील उत्तमोत्तम ग्रंथ आणि जीवनाच्या नाना शाखांत साकारत असलेले संशोधन व अभ्यास इंग्रजी भाषेच्या माध्यमातूनच वैश्विक पातळीवरील संचित ज्ञानामध्ये समाविष्ट होत राहतात. तेव्हा, ‘ज्ञानभाषा’ म्हणून मान्यता पावलेल्या इंग्रजीमधून प्रकाशित होणारे आधुनिक संशोधन आणि अद्ययावत ज्ञान लोकभाषा मराठीमध्ये तितक्याच प्रत्ययकारकपणे रूपांतरित करून, इंग्रजी भाषेशी विशेष सलगी नसलेल्या लोकसमूहांमधील जिज्ञासूंपर्यंत ते पोहोचविण्याचे एक मोठे आव्हान ज्ञानाच्या प्रांतात सक्रिय असणाऱ्या सगळ्यांच घटकांच्या पुढ्यात आज आहे. तेच काम अल्पस्वल्प प्रमाणात करण्याचा प्रयत्न ‘अर्थबोधपत्रिका’ तिच्या मर्यादित साधनसामग्रीद्वारे आजवर करत आलेली आहे, हे वास्तव, आत्मप्रौढीचा लवमात्रही स्पर्श न होऊ देता, या ठिकाणी नमूद करावयास हवे. अशा प्रकारच्या वाचनसाहित्याला एकूणांत मोजकाच प्रतिसाद मिळणार, हे वास्तव मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही. समाजातील विविध घटकांची वाचनाभिरूची सतत बदलत राहते, हे तर मान्यच केले पाहिजे. शिवाय, मराठी वाचकवर्गही बहुस्तरीय आहे. वाचनाबाबतची आवडनिवड, त्यांमुळेच, स्तरनिहाय बदलत राहावी, हेदेखील स्वाभाविकच ठरते. ती आवड नेमकी कशी जोखायची, हादेखील एक

मोठा प्रश्नच. आज आपण सगळेच इतके वेगवान आयुष्य जगतो आहोत की, एकीकडे हाताशी असलेल्या फुरसतीचा दुष्काळ आणि दुसरीकडे वाचनीय साहित्याचा महामूर सुकाळ, अशा कैचीत आपण सततच असतो. त्यांतही पुन्हा, आपला देश आजमितीस जगाच्या पाठीवरील सर्वांत तरूण देश आहे. अधीरता हा तर तारुण्याचा स्थायीभावच ! तेव्हा, पुढ्यात येणारी जी माहिती अथवा/आणि जे ज्ञान आपल्याला आताच्या वर्तमानात आपल्या जीवनात लगोलग वापरता येईल आणि ज्या माहितीमुळे आपले जगणे ताबडतोब अधिक सुधारेल ते व तेवढेच वाचनसाहित्य हातात घेण्यास तरुणाई उत्सुक व तयार असते, ही वस्तुस्थितीदेखील नितळ मनाने मान्यच केली पाहिजे. निव्वळ बहुश्रुत अथवा आंतरिकदृष्ट्या समृद्ध होण्याच्या प्रांजळ प्रेरणेने ज्ञानार्जनास प्रवृत्त होणे, ही श्रीमंतीची बाब म्हणूनच आज गणावी लागेल. कारण, तितकी मानसिक शांती व भौतिक अनुकूलताच बव्हंशी दुर्मीळ बनलेली आहे.

हे सगळे मान्य करूनही, एक सामाजिक जबाबदारी म्हणूनच, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या खटाटोपापासून अणुभरही विचलित झालेली नाही. सर्वसामान्य मराठी वाचकांच्या जाणिवेचा परीघ सतत विस्तारता राहण्यासाठी जमेल तेवढा हातभार लावण्याचा नम्र हेतूच केवळ या उपक्रमाच्या मुळाशी आहे. त्यांमुळे, वाचकांची संख्या मूठभर असूनही त्याची खंत वाटली तरी, त्यापायी त्रागा करून 'हे सगळे थांबवावे,' असा विचारही मनाला स्पर्शत नाही. अडचणींचे अडथळे आणि निराशेचा अंधार गडद करणाऱ्या वृत्ती-प्रवृत्ती सभोवार सर्वत्र खड्या असल्या तरी, आपले पुढचे एक तरी पाऊल प्रकाशमान करणारी दीपज्योत निरंतर तेवत ठेवणे, हे आपल्या सगळ्यांचेच कर्तव्य होय. 'अर्थबोधपत्रिके'च्या मुळाशी असणारी आद्य प्रेरणा नेमकी तीच आहे. दसरा-दिवाळी हे तर आनंदाचे पर्व. या सणांचा उत्साहही काही आगळाच. आता गोडधोड म्हणा अथवा नवीन कपडेलत्ते म्हणा, यांचे नाविन्य व अप्रुप आज, पूर्वीच्या मानाने फारसे उरलेले नाही. कारण, वर्षभरच आपण ते करत असतो. असे असले तरीही, नवीन काही तरी खरेदी करण्याच्या उत्साहाला दिवाळीच्या मुहूर्तावर बहर येतो, ही बाबही तितकीच खरी. त्यांमुळे, आहाराच्या आपल्या सवयी आता कमालीच्या बहुविध बनलेल्या असल्या तरी, दिवाळीच्या फराळाचे चार जिन्नस करण्याची-खाण्याची अपूर्वाई आजही ओसरलेली नाही. एरवी नियमाने प्रकाशित होणारी नियतकालिकेदेखील, दिवाळीचे निमित्त साधून, त्यांच्या पानांमध्ये नवीन, मुद्दामहून तयार केलेल्या वाचनफराळाचे आरोगण अगत्याने करतात, ते काही उगीच नाही. दिवाळी अंकांची ओढ, त्यांमुळेच, आजही लागून राहते. दिवाळी अंकांसारखा वेगळा काही उपक्रम आवर्जून करण्याचा

'अर्थबोधपत्रिके'चा परिपाठ नाही. तरीदेखील, या जोडअंकात अंमळ वेगळ्या प्रकृतीचा काहीएक मजकूर जाणीवपूर्वक अंतर्भूत केलेला आहे.

'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ म्हणजे श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रतिपद टीका होय, ही बाब सर्वसाधारण मराठी कुटुंबांना चांगल्यापैकी ज्ञात असते. मुळात, श्रीमद्भगवद्गीता हाच 'आध्यात्मिक' गणला जाणारा ग्रंथ असल्यामुळे तिचा भाष्यग्रंथ गणला जाणारा 'ज्ञानदेवी' हा ग्रंथदेखील अध्यात्मपरच असावा, अशी धारणा स्वाभाविकपणेच आपल्या मनात स्थिरावलेली आहे. ती अ-यथार्थ आहे असे मुळीच नाही. परंतु, 'ज्ञानदेवी'कडे केवळ अध्यात्मग्रंथ म्हणून बघणे पुरेसे नाही, याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करणारा एक लेख या अंकातील पुरवणी विभागात मुद्दाम सादर केलेला आहे. 'ज्ञानेश्वरी'ची रचना म्हणजे, १३व्या शतकातील लोकव्यवहाराचे माध्यम असणाऱ्या लोकभाषा मऱ्हाटी प्राकृताला ज्ञानव्यवहाराची भाषा बनविण्यासाठी ज्ञानदेवांनी साकारलेला एक भाषिक महत्प्रयोग होय, अशी भूमिका त्या लेखाद्वारे वाचकांच्या पुढ्यात विचारार्थ मांडलेली आहे. मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा आता अधिकृतरीत्या प्राप्त झालेला आहे. आता, खऱ्या अर्थाने आपल्या पुढे आव्हान आहे ते, अभिजाततेचे लेणे ल्यालेल्या या मराठीला सर्वार्थाने सक्षम अशी ज्ञानभाषा बनविण्याचे. ते आव्हान पेलण्याची प्रेरणा देत त्या दिशेने करावयाच्या प्रयत्नांची दिशा उजळण्यास 'ज्ञानेश्वरी' कशा प्रकारे आपल्याला आज मार्गदर्शक ठरू शकते, याची काही सूत्रे मांडण्याचा हेतू त्यामागे आहे. ज्ञानव्यवहाराची भाषा संस्कृत आणि सर्वसामान्यांच्या लोकव्यवहाराची भाषा मऱ्हाटी प्राकृत असे द्वंद्व १३व्या शतकात होते. जागतिकीकरणाच्या वाऱ्यांनी लपेटलेल्या आजच्या २१व्या शतकात, तेच द्वंद्व आपल्या पुढ्यात, ज्ञानभाषा इंग्रजी आणि लोकव्यवहाराची भाषा मराठी या स्वरूपात उभे आहे. जवळपास सगळ्यांच ज्ञानशाखांमधील अद्ययावत संशोधन आणि ज्ञान शब्दरूपाने आज साकारते ते मुख्यत: इंग्रजी भाषाविश्वात. इंग्रजीतील सकस आणि सरस ज्ञानठेवा तितक्याच प्रत्ययकारकपणे सुसेव्य मराठीमध्ये रूपांतरित करण्यासाठी, पर्यायाने, मराठीला सक्षम अशी ज्ञानभाषा बनवण्यासाठी ज्ञानक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सगळ्यांच घटकांना सतत प्रयत्नशील राहावे लागणार आहे. त्या दिशेने करावयाच्या प्रयत्नांना किती आयाम चिकटलेले आहेत, त्याचा काही एक अदमास, 'ज्ञानेश्वरी'चे अंतरंग न्याहाळले तरी आपल्याला येतो. लोकभाषा मऱ्हाटी प्राकृताला ज्ञानभाषा बनविण्यासाठी सिद्ध होते वेळी ज्ञानदेवांनी किती आघाड्यांवर सूक्ष्म विचार केला असला पाहिजे, याची जाणीव करून देणे हा त्या लेखाचा हेतू होय.

'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील दोन लेख दोन लोकोत्तर व्यक्तिमत्वांच्या स्मरणाला वाहिलेले आहेत. स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान (गुलझारीलाल नंदा यांची हंगामी पंतप्रधानकीची कारकिर्द विचारात घेतली तर तिसरे) लाल बहादूर शास्त्री यांचा २ ऑक्टोबर १९०४ हा जन्मदिवस. काळाच्या हिशेबाने, त्यांमुळे, २ ऑक्टोबर २०२५ हा ठरतो शास्त्रीजींचा १२१वा जयंतीदिन. लाल बहादूर शास्त्री यांचा काळ, जीवन आणि कर्तृत्व यांचा साक्षेपपूर्वक आलेख मांडणारे एक संशोधनपूत चरित्र अगदी अलीकडेच प्रकाशित झालेले आहे. त्या पुस्तकाच्या माध्यमातून आपल्या पुढ्यात अवतरणारे शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू एका लेखात सादर केलेले आहेत. तर, या अंकातील 'उजळणी' विभाग वाहिलेला आहे तो आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संस्कृत विद्याविशारद, कर्ते सुधारकाग्रणी आणि प्रार्थना समाजाचे एक आघाडीचे आधारस्तंभ असणाऱ्या डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या उज्ज्वल चरित्राचे काही पैलू सादर करण्याला. त्याला कारणे दोन. डॉ. भांडारकर हे त्या मानाने आजवर अल्पज्ञात राहिलेले व्यक्तिमत्त्व आहे, हे झाले त्यांतील पहिले कारण. तर, २०२५ हे त्यांचे स्मृतिशताब्दी वर्ष होय, हे आहे त्यामागील दुसरे मुख्य कारण. त्या निमित्ताने डॉ. भांडारकर यांच्या बहुआयामी कार्यकर्तृत्वाचे दर्शन आपल्याला घडावे हा त्यांमागील प्रधान हेतू आहे.

जर्मनी आणि फ्रान्स हे युरोपीय समुदायातील केंद्रवर्ती महत्त्वाचे दोन बलदंड देश. एकंदर युरोपीय समुदायाच्या वित्तीय तसेच पैसाविषयक धोरणांची दिशा व कल निर्धारित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या दोन देशांपैकी फ्रान्स आजघडीला राजकीय अस्थैर्यापायी पुरता जेरीस आलेला आहे. २०२२ सालापासून ही राजकीय अस्थिरता फ्रान्सची पाठ सोडायला तयार नाही. फ्रान्समधील प्रचलित राजकीय व्यवस्थेमध्ये सक्रिय असणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये, विचारप्रणालीच्या दृष्टीने, अति-उजवे, अति-डावे आणि अंमळ उजवीकडे कल असणारे परंतु मध्यममार्गी विचारसरणीचे, असे तीन मुख्य प्रकार अथवा गट दिसतात. आर्थिक धोरणांच्या दिशेबाबत या तीन गटांमध्ये नांदणारा मतैक्याचा संपूर्ण अभाव फ्रान्समधील आजच्या राजकीय अस्थिरतेच्या मुळाशी आहे. ऱ्हस्व दृष्टीची, तात्कालिक लाभांवर नजर खिळलेली आर्थिक धोरणे आणि एखाद्या विचारसरणीचा राजकीय पक्षांकडून केला जाणारा तारतम्यहीन पाठपुरावा यांचे साटेलोटे समाजजीवन कसे धूसर बनवते याची साक्ष पुरविणारा तपशील सादर करणारा या अंकातील प्रदीर्घ लेख रोचक ठरावा.

दीपावलीच्या निमित्ताने सजवलेला हा वाचनवानवळा रुचकर वाटेल अशी अपेक्षा आहे. दीपावलीच्या अनंत हार्दिक शुभेच्छा! ■■

# पर्यावरण

## पाण्याची तहान कृत्रिम बुद्धिमत्तेलाही!

जगातील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या पाण्याच्या कमतरतेचा सामना करीत असताना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा डोलारा सांभाळण्यासाठी पाण्याचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असल्याने आता त्यातून एक नवीनच समस्या उद्‌भवण्याची समस्या निर्माण होऊ पाहते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जगभरात सुरू झालेला असताना त्या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी विजेचा आणि पाण्याचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर करावा लागतो आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विस्तारापायी पर्यावरणाला मोठा फटका बसण्याची भीती जाणकारांकडून व्यक्त केली जाते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर, त्या तंत्राचे विविध क्षेत्रांवर होणारे सामाजिक परिणाम, सार्वजनिक वापरातील धोके या सगळ्यांविषयी खूप चर्चा होते. परंतु, कृत्रिम बुद्धिमत्तेची सेवा देण्यासाठी जी भव्य 'डेटा सेंटर्स' (माहिती केंद्रे) उभी करण्यात आलेली आहेत, त्यासाठी विजेचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे. ती थंड ठेवण्यासाठी तितक्याच मोठ्या प्रमाणात पाणीसुद्धा लागते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आगामी काळात अधिकच वाढत जाणार असल्याने येणाऱ्या काळात त्यामुळे पाण्याची समस्या गंभीर रूप धारण करेल असा अंदाज आता अभ्यासक वर्तवू लागले आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय' तंत्रज्ञान आपण अगदी सहजतेने हाताळतो. त्यामध्ये ज्या वेगाने आपल्याला हवी ती माहिती मिळते ती पाहून आपण थक्कदेखील होतो. परंतु ती सुविधा आपल्याला प्राप्त होत असताना तिच्या मागे मोठी यंत्रणा कार्यरत असते हे आपल्या सहसा ध्यानात येत नाही. तिला 'डेटा सेंटर (माहिती केंद्र) असे म्हटले जाते. प्रचंड मोठ्या प्रमाणात संगणकीय सुविधा आणि संचयन साधने तिथे असतात आणि त्यामुळे 'चॅट-जीपीटी'सारख्या 'चॅटबॉट'ना माहिती शिकणे आणि लक्षात ठेवणे शक्य होत असते. जगभरातील अनेक भागांमध्ये अशी

माहिती केंद्रे सुरू झालेली असून मोठमोठ्या गोदामांच्या आकारापेक्षा ती मोठी असू शकतात. काही माहिती केंद्रे तर फूटबॉलच्या मैदानाइतकीसुद्धा मोठी आहेत. तिथे २४ तास वीजपुरवठा होत राहणे अत्यंत गरजेचे असते. ज्या तंत्रज्ञानाचा वापर आपण करतो त्याचा प्रत्यक्ष कामकाजातील अनुभव उत्तमच राहावा यासाठी ही पडद्यामागील यंत्रणा सर्वोत्तम पद्धतीने कार्यरत असणे तितकेच गरजेचे असते. त्यासाठी अशा माहिती केंद्रांच्या आतील भागातील वातावरणसुद्धा काटेकोरपणे नियंत्रित करावे लागत असते. या 'डेटा सेंटर्स'साठी खूप मोठ्या प्रमाणावर ऊर्जेचा वापर होत असल्याने सध्या त्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाऊ लागले आहे या संदर्भात जगभरात विविध स्वरूपाचे अहवालसुद्धा प्रसिद्ध होऊ लागले आहेत. 'कॅलिफोर्निया विद्यापीठ' आणि 'टेक्सास' या दोन विद्यापीठांनी अलीकडेच या संदर्भात एक महत्त्वाचे संशोधन केले असून Making AI Less Thirsty: Uncovering & Addressing the Secret Water Footprint of AI Models या नावाने हा अहवाल आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झाला आहे. जगभरात निर्माण होणाऱ्या एकूण विजेच्या दोन टक्के वीज ही सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान जगभरात पोहोचवण्यासाठी वापरली जात असल्याचे वास्तव या अहवालात मांडण्यात आले आहे.

माहिती केंद्रांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची आकडेवारी नेमकी किती आहे या विषयी अद्याप जागतिक पातळीवर पुरेशी आकडेवारी उपलब्ध नाहीत. तसेच त्या संदर्भात अधिकृत माहितीही उपलब्ध करून दिली जात नाही. मात्र, ब्रिटनने या संदर्भातील प्रश्नाचे गांभीर्य जागतिक पटलावर मांडण्यास सुरुवात केलेली आहे. ब्रिटनमधील पाणी संसाधन व्यवस्थापन तज्ज्ञ असलेल्या डॉ. वेंकटेश उड्डमेरी (Dr. Venkatesh Uddameri) यांनी या संदर्भात माहिती सादर केलेली आहे. त्यानुसार, एका 'डेटा सेंटर'साठी दररोज सुमारे दीड ते दोन कोटी लीटर पाण्याचा वापर केला जातो. म्हणजे ३० ते ४० हजार लोकसंख्येच्या एखाद्या गावाला दररोज जितके पाणी लागेल तितके पाणी एका माहिती केंद्रासाठी दररोज द्यावे लागते. या एका उदाहरणातून त्यांनी या एकूणच प्रश्नाचे गांभीर्य वैश्विक समुदायाच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

जगभरात ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने माहिती केंद्रे आहेत त्या ठिकाणी पाण्याच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. आजच्या घडीला प्रामुख्याने अमेरिका आणि चीन या प्रमुख देशांमध्येच माहिती केंद्रे एकवटलेली आहेत. युरोपमध्येही काही

प्रमुख देशांमध्ये ‘एआय’ तंत्रज्ञानाच्या संदर्भात कार्यरत असणारी माहिती केंद्रे कार्यरत आहेत. त्यामध्ये जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, सिंगापूर, नॉर्वे, स्वीडन आदी देशांचा समावेश आहे. व्हर्जिनियामध्ये सर्वाधिक माहिती केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. त्यामुळे तेथील स्थानिक जलस्रोतांवर ताण येऊ लागला आहे. तिथे पाण्याचा वापर पूर्वी जितका होता त्यामध्ये २०१९ ते २०२३ या कालावधीमध्ये मोठी वाढ झालेली आहे. प्रतिवर्षी १.१३ अब्ज गॅलन इतका पाण्याचा वापर पूर्वी होत असे तो आता १.८५ अब्ज गॅलन इतका वाढलेला आहे. वरील उदाहरण एकूण परिस्थितीचे चित्र स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. अवघ्या तीन-चार वर्षांच्या काळात पाण्याच्या वापरात झालेली वाढ ही लोकसंख्या वाढीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणांनी झालेली नसून ‘एआय’ तंत्रज्ञानाच्या संदर्भात अलीकडच्या काळात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या माहिती केंद्रांपायी झालेली आहे. त्यामुळेच भविष्यात अशा सर्व शहरांच्या पुढ्यात पाणीटंचाईचे एक मोठे आव्हान उभे राहू शकेल आणि त्यांतून अनेक नव्या समस्या जन्माला येतील असा या क्षेत्रातील जाणकारांचा अंदाज आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनुषंगाने प्रस्थापित करण्यात आलेल्या माहिती केंद्रांमध्ये पाण्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असा दुहेरी स्वरूपात वापर केला जातो. ‘एआय’ला जेव्हा माहिती दिली जाते आणि ती प्रसारित करण्यासाठी आज्ञावली तयार केली जाते त्या वेळी पाण्याचा वापर सर्वाधिक केला जातो. हा झाला प्रत्यक्ष वापर. परंतु, अप्रत्यक्ष वापर म्हणजे वीजनिर्मिती करीत असताना माहिती केंद्रांच्या बाहेरसुद्धा पाणी लागते. कोळशावर चालणाऱ्या वीजकेंद्रामधील ‘कूलिंग टॉवर्स’मध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो. माहिती केंद्रांत हे पाणी प्रत्यक्ष वापरले जात नसले तरीदेखील ही केंद्रे सुरू ठेवण्यासाठी सातत्याने पाण्याची गरज लागत असते आणि तो वापर अधिक आहे. माहिती केंद्रे थंड राहावीत म्हणून पाण्याचा प्रत्यक्ष वापरसुद्धा मोठ्या प्रमाणावर होत राहतो. माहिती केंद्रांचे ‘सर्व्हर’ यशस्वी रीतीने कार्यान्वित राहावेत आणि त्यात खंड पडू नये म्हणून वापरली जाणारी वीज उष्णतेच्या रूपात बाहेर पडत असते. या केंद्रांचा आकार प्रचंड असल्याने तिथे मोठ्या प्रमाणावर उष्णता तयार होत असते. तापमान स्थिर ठेवण्यासाठी आणि ‘सर्व्हर’ उष्णतेने न तापता ते थंड राहावेत म्हणून ‘हीट एक्स्चेंज सिस्टीम’मधून पाणी पाठवून ‘सर्व्हर’सह सर्व उपकरणे थंड राखली जातात. बाह्य तापमानातील बदलांना त्यानुरूप प्रतिसाद देण्यासाठीसुद्धा अनेकदा पाणी आवश्यक ठरते.

या संदर्भात अमेरिकेने AI less 'Thirsty' या विषयावर एक संशोधन अहवाल सादर केला असून त्यात या कारणांपायी होणाऱ्या अतिरिक्त पाणीवापराचे गंभीर धोके अधोरेखित केलेले आहेत. अर्थात, एकूण विचार केला तर माहिती केंद्रांच्या अनुषंगाने होणाऱ्या पाण्याच्या वापरासंदर्भात पुरेसे संशोधन झालेले नाही. दुसरा आणखी गंभीर भाग असा की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या तंत्रज्ञान संस्था पाणीवापरावर होणारा खरा खर्च उघड करण्यास राजी नाहीत. त्यामुळे बरीचशी माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. त्याकडे त्या त्या देशांतील सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन होणाऱ्या पाणीवापराकडे आणि त्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी केली जाते आहे. हे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मते, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित कंपन्यांमध्ये 'एआय चॅटबॉट्स'ना कुठे, कधी आणि किती प्रशिक्षण दिले जाते यावर त्यासाठी लागणाऱ्या पाण्याचा वापर ठरत असतो. त्यामुळेच माहिती केंद्रांसाठी स्थळ निश्चित करणे कळीचे ठरते. त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता मुबलक आहे ना याची खातरजमा करूनच तिथे भविष्यातील माहिती केंद्रे प्रस्थापित व्हावीत आणि त्याचबरोबर

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

पाण्याचा संभाव्य वापर लक्षात घेऊन तिथे राहणाऱ्या लोकांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये याचीही हमी घेतली जावी, अशीही मागणी सध्या होते आहे. माहिती केंद्रे थंड ठेवण्यासाठी पाण्याच्या व्यतिरिक्त इतर काही उपाययोजना असू शकतात का याचीही चाचपणी आता सुरू झालेली आहे.

जगभरात ठिकठिकाणी निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीवापराचा हा मुद्दा निश्चितच गंभीर आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जितका वाढत जाईल त्या प्रमाणात माहिती केंद्रांची संख्याही वेगाने वाढत जाणार आहे. परिणामी, पाण्याचा वापरही तितक्याच प्रमाणात वाढेल आणि गंभीर परिस्थिती त्यातून निर्माण होईल अशी भीती जाणकारांकडून वर्तवली जाते आहे. कमी ऊर्जा वापरणाऱ्या 'रिव्हर्स ऑस्मोसिस'च्या तंत्राचा (आरओ) वापर करण्यावर भर देणे गरजेचे आहे. माहिती केंद्रांमध्ये एकदा वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून वापरलेल्या त्या पाण्यातील ९८ टक्के पाणी पुनर्वापरासाठी तयार करता येऊ शकते. ते पाणी 'कूलिंग टॉवर'साठी पुन्हा वापरून पाण्याचा वापर कमी करता येऊ शकतो. अशा काही उपायांचा अवलंब केल्याने माहिती केंद्रे दीर्घकाळ चालवणे शक्य बनून पाण्याचा वापरही कमी करता येऊ शकतो, याकडे अभ्यासक आता प्रकर्षाने लक्ष वेधत आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर आता ब्रिटन सरकारनेही कठोर पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. या संदर्भात 'नॅशनल इंजिनिअरिंग पॉलिसी सेंटर' (एनइपीसी) या संस्थेचा अहवाल मागवण्यात आलेला असून पाण्याचे उपलब्ध स्रोत, पाण्याचा उपसा आणि पाण्याचा अनिर्बंध वापर या सगळ्यावरच काटेकोर बंधने जारी करण्यासंदर्भातील पावले उचलली जाऊ शकतील असे ब्रिटन सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे केवळ ब्रिटनमध्येच नाही तर जगभरात जिथे जिथे मोठ्या प्रमाणावर माहिती केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत तेथील पाण्याच्या अनिर्बंध आणि प्रचंड वापरावर निर्बंध आणणे ही काळाची गरज आहे, हे अगदी उघड आहे. त्यामुळेच, 'भविष्यातील युद्धे पाण्यावरूनच होतील,' असे म्हटले जात असताना माहिती केंद्रांच्या चलनवलनासाठी पाण्याचा अनिर्बंध वापर होण्यावर मर्यादा आणणे हे भविष्यातील आणखी मोठे आव्हान ठरू शकते, असेच हा अहवाल सुचवतो.

**संदर्भ :**


1) https://news.ucr.edu/articles/2023/04/28/ai-programs-consume-large-volumes-scarce-water
2) https://dig.watch/updates/making-ai-less-thirsty
3) https://guides.library.queensu.ca/c.php?g=740510&p=5344286

# पर्यावरण

## पर्यावरण संवर्धनाची चिनी वाट

पर्यावरणाच्या अनेकानेक समस्या जागतिक पातळीवर गंभीर स्वरूप धारण करीत असताना चीनने मात्र पर्यावरणरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने नियोजनबद्ध पावले टाकण्यास सुरुवात केली असल्याचे दिसून येते आहे. शहरांतील हिरवाईचा विस्तार, जैवविविधतेचे संरक्षण, हरित ऊर्जेचे उत्पादन आणि या सगळ्यांत नागरिकांचा सक्रिय सहभाग या गोष्टींवर त्यामध्ये लक्ष केंद्रित केलेले आहे. काही तात्कालिक तर काही दीर्घकालीन प्रकल्प त्या अंतर्गत चीनने हाती घेतलेले आहेत. पर्यावरण रक्षणासाठी स्वतःची कायदेशीर चौकट चीनने अतिशय मजबूत केलेली असून पर्यावरण संरक्षक कायदे, प्रदूषण नियंत्रण कायदे, पर्यावरणाचे संरक्षण या बाबींना विशेष महत्त्व दिले आहे. या शिवाय, वनसंवर्धन, जल गुणवत्ता सुधारणा आणि जैवविविधतावर्धन या कडेही लक्ष दिले जात आहे.

गेल्या सुमारे चार दशकांमध्ये चीनने अभूतपूर्व अशी आर्थिक प्रगती साध्य केलेली आहे. दरवर्षी सरासरी आठ टक्के किंवा त्याहून अधिक दराने ही वाढ होत असल्याने नागरिकांचे जीवनमानही सुधारले आहे. परंतु, एका बाजूला पायाभूत सुविधांचा झपाट्याने विकास होत असताना त्या सगळ्याचे पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहेत. सातत्यशील आर्थिक प्रगतीसाठी पाणी, ऊर्जा, जमीन यासह नैसर्गिक संसाधनांची मागणी खूप वाढलेली आहे. जंगलसंपत्ती कमी झाल्याने वारंवार पूर येणे, वालुकामय क्षेत्रांचे आकारमान विस्तारणे, दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे असे अनेकानेक दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. कार्बन उत्सर्जनाच्या बाबतीतही जागतिक क्रमवारीत चीन बराच आघाडीवर आहे. त्यामुळेच पर्यावरणाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या दिशेने पावले उचलणे चीनच्या लेखी गरजेचे झालेले होते. जागतिक स्तरावरील पर्यावरणाच्या समस्या अधिक सघन बनविण्यात चीनचा वाटा कायमच मोठा राहिला आहे. मात्र, या सगळ्याचे परिणाम देशांतर्गत

पातळीवरसुद्धा चीनला भोगावे लागत आहेत. म्हणूनच गेल्या दशकभरापासूनच चीनने पर्यावरणाशी संलग्न विविध प्रश्नांवर लक्ष केंद्रित केलेले असून त्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केलेली आहे.

नागरीकरण ही चीनची जशी मोठी ताकद आहे तशीच ती पर्यावरणाच्या दृष्टीने मोठी समस्यासुद्धा ठरते. वेगाने नागरीकरण साध्य करून चीनने वेगाने विकास साधला आणि भौतिक सुविधांमध्येही भरघोस भर घातली. नागरीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक विकासाच्या संधी दडलेल्या असतात हे नेमकेपणाने लक्षात घेऊन चीनने त्यावर जोमाने भर दिला. परंतु एका बाजूला वेगवान आर्थिक विकास होत असताना त्यातून आर्थिक, सामाजिक आणि मुख्यतः पर्यावरणाशी संबंधित अनेक समस्या उभ्या राहिल्या. १९७० च्या दशकामध्ये चीनमध्ये आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. त्या वेळी केवळ १८ टक्के लोकसंख्या शहरी भागांमध्ये राहत होती. उच्च आर्थिक विकासदर, उद्योगधंद्यांची वाढ, नव्या रोजगाराच्या संधी, अधिक उत्पन्नाची हमी, ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक चांगल्या नागरी सुविधा, शिक्षणाच्या चांगल्या संधी आणि सुधारित राहणीमान अशा अनेक कारणांमुळे नागरीकरणाचा वेग १९९० सालानंतर वाढत गेला. १९९० च्या दशकात सुरुवातीला हे प्रमाण २२ टक्क्यांवर जाऊन पोहोचलेले होते. ते आणखी वेगाने वाढू लागले आणि २०१५ साल उजाडेपर्यंत हे प्रमाण तब्बल ५४ टक्क्यांवर जाऊन पोहोचले. २०२४ सालासाठी उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून हे प्रमाण आता ६७ टक्क्यांवर गेले आहे. १९८० पासून अवघ्या ३५ वर्षांत शहरांत राहणाऱ्या लोकांची संख्या ५६ कोटींनी वाढली असल्याचे वास्तव संबंधित आकडेवारीतून उलगडते. १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी २५६ शहरे चीनमध्ये आहेत. शहरांत राहणाऱ्या नागरिकांची संख्या २०३० सालापर्यंत ७० ते ७५ टक्क्यांहून अधिक होईल असा जाणकारांचा अंदाज आहे.

त्यामुळेच, एकीकडे शहरांत राहणाऱ्या लोकांची संख्या वाढत गेली तसतशी पायाभूत सेवा आणि भौतिक सुविधांची गरजही वाढत गेली. त्यांच्या पुरवठ्याची बेगमी करताना पर्यावरणाचे मात्र सर्वच पातळ्यांवर अतोनात नुकसान होत राहिले. शहरांच्या व्यवस्थापनासाठी अधिक ऊर्जा लागत असल्याने मोठी शहरे आणि पर्यावरणाचा ऱ्हास हे जणू समीकरणच बनलेले आहे. या सगळ्याची गंभीर जाणीव झाल्यामुळेच त्या दिशेने पावले टाकणे क्रमप्राप्त ठरले. त्या दृष्टीने भेडसावणाऱ्या मोठ्या पर्यावरणीय समस्या डोळ्यासमोर ठेवून चीनने पर्यावरणरक्षण व संवर्धनासाठी धोरणात्मक पावले उचलण्यास सुरुवात केलेली असून त्याचे परिणाम हळूहळू दिसू लागलेले आहेत.

ढासळत्या पर्यावरणासंदर्भात देशातूनही शासनाला विरोध होऊ लागला आणि नागरिक उघडपणे नाराजी व्यक्त करू लागले. त्यामुळे २०१५ साली अस्तित्वात आलेल्या पर्यावरण संरक्षण कायदा व कायदेशीर सुधारणांतर्गत धोरणात्मक पावले उचलण्यास चिनी शासकांनी सुरुवात केली. २०१६ साली चिनी सरकारने पॅरिस हवामान करारावर स्वाक्षरी केली. त्या नियोजनबद्ध प्रयत्नांचा पहिला चांगला परिणाम म्हणजे २००६ ते २०१७ या कालावधीत चीनमधील कार्बन डाय ऑक्साईडची पातळी ७० टक्क्यांनी कमी झाली. २०१८ पर्यंत वायू प्रदूषणही कमी झाले. अक्षय ऊर्जेचा वापर व त्यासाठीची गुंतवणूक यावर चीनने विशेष लक्ष दिले. २०१७ मध्ये जगभरात अक्षय ऊर्जाविषयक प्रकरणांमध्ये २८० अब्ज अमेरिकी डॉलर्स इतकी जी गुंतवणूक झालेली होती त्यातील ४५ टक्के गुंतवणूक एकट्या चीनने केलेली होती. अत्याधुनिक सौर पॅनल, पवन ऊर्जा आणि जलविद्युत ऊर्जेवर त्या अंतर्गत लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. इलेक्ट्रिक मोटरगाड्यांच्या उत्पादनावर आजच्या घडीला चीनने लक्ष केंद्रित केले असून जगात सर्वाधिक इलेक्ट्रिक मोटरगाड्या आणि बसगाड्यांचे उत्पादन चीन करू लागला आहे. २०१० ते २०१२ या कालावधीत चीनने इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्यासाठी ४० ते ६० टक्के इतके अनुदान जाहीर केले. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर करसवलतही जाहीर करण्यात आली. वाहनांद्वारे सोडल्या जाणाऱ्या धुरापायी घडून येणारे प्रदूषण शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट चीनने नजरेसमोर ठेवले. नवीन इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादकांना त्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यात आले आणि त्यासाठी त्यांना मदतीचा हात देण्यात आला. असा पाठिंबा दिल्याने देशांतर्गत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर तर वाढलाच पण मोठ्या प्रमाणावर त्यांची निर्यातसुद्धा सुरू झाली. ही वाढ अतिशय वेगाने होत राहिली आणि कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी करण्यात चीनला यश आले.

पर्यावरणाच्या समस्या सोडवण्यासाठी चीनने काही वेगळे मार्गसुद्धा अनुसरलेले आहेत. त्यापैकी, कचऱ्याचा वापर करून वीजनिर्मिती करण्यासाठी उचललेले पाऊल महत्त्वाचे आणि अनुकरणीय ठरले आहे. २०१० सालापर्यंत शहरांमधील कचरा ही चीनसाठी एक डोकेदुखी बनलेली होती. चीन हा घनकचरा निर्मिती करणारा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला होता. या कचऱ्यापैकी ३५ टक्क्यांहून अधिक कचरा हा उघड्यावर टाकला जात असल्याने त्यातूनसुद्धा प्रदूषणाला हातभार लागत होता. परिणामी, भूजल आणि वायू प्रदूषणाच्या अनेक समस्या चीनमध्ये निर्माण झालेल्या होत्या. कचऱ्याच्या अनियंत्रित विघटनातून घातक असा हरितगृह वायू मिथेन उत्सर्जित होत असे. या मोठ्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी चीनने कंबर कसली. अत्याधुनिक

साधने वापरून कचऱ्यापासून वीजनिर्मिती करण्याचे पाऊल उचलले. विशेषतः, शहरी भागात निर्माण होणारा कचरा एकत्र करून त्याद्वारे ऊर्जा निर्मिती करण्यावर भर देण्यात आला. आजच्या घडीला हे पाऊल महत्त्वाचे ठरले असून त्यातून शहरातील कचऱ्याचा प्रश्न तर मार्गी लागलाच परंतु त्याच्या जोडीला ऊर्जानिर्मितीचाही चांगला पर्याय खुला झाला. चीनमधील मोठ्या नगरांतील कचरा एकत्र करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आजमितीस चार मोठे प्रकल्प कार्यान्वित केलेले आहेत. त्यातून वार्षिक ४००-५०० गिगावॅट इतकी ऊर्जानिर्मिती होते आहे. घनकचऱ्याची प्रभावी विल्हेवाट लावणे हे चीनसाठी एके काळी मोठे आव्हान होते; परंतु, या उपाययोजनेमुळे त्या समस्येवर प्रभावी मात करता आली आहे.

याच धर्तीवर सूर्यप्रकाशासारख्या अपारंपरिक ऊर्जा साधनांद्वारे ऊर्जा निर्मिती करण्यासाठी चीनने महत्त्वाकांक्षी असे प्रकल्प हाती घेतलेले आहेत. सौर ऊर्जा क्षेत्रातील विविध प्रकल्पांमध्ये चीन सक्रिय आहे. अंतराळात सौर ऊर्जा केंद्र उभारणे, कमी सूर्यप्रकाशातही ऊर्जा निर्माण करू शकणारे तंत्रज्ञान विकसित करणे याच्याही पुढे जात, कृत्रिम सूर्य तयार करण्याच्या दिशेने उचललेले पाऊल अपूर्व मानले जाते आहे. चीनमधील Urumqi येथे साकारण्यात येत असलेला भव्य सौर प्रकल्प, Anhui प्रांतातील तरंगणारी सौरशेती तसेच तिबेट पठारावर साकारण्यात येत असलेला Longyan project हे प्रकल्प भव्यअसून त्यांनी जगाचे लक्ष वेधून घेतलेले आहे.

कार्बन उत्सर्जनात एके काळी आघाडीवर असलेल्या चीनने विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या उत्पादनावर लक्ष केंद्रीत केले आणि त्यांमुळे सारी परिस्थिती बदलून दाखवली. आजच्या घडीला, विजेवर चालणाऱ्या वाहनांचे सर्वाधिक उत्पादन करणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश चीन बनलेला आहे. Tesla, BYD, NIO, Xpeng अशा कंपन्यांनी वाहननिर्मितीत आघाडी घेतलेली आहे. या कंपन्यांमुळे विजेवर चालणाऱ्या वाहनांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन चीनमध्ये होऊ लागलेले आहे. २०३५ सालापर्यंत संपूर्ण देशातील वाहने विजेवर चालणारी असावीत असा चीनचा प्रयत्न आहे. विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी लागणारी लिथियम आयनची बॅटरी प्रामुख्याने चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर तयार होते. त्यामुळे त्या बाबतीतही चीनने आघाडी घेतली आहे. उत्पादन खर्च मर्यादित ठेवून मोठ्या प्रमाणावर वाहननिर्मिती करणे आणि त्याद्वारे देशातील गरज भागवून जागतिक बाजारपेठसुद्धा काबीज करणे चीनला या साऱ्या प्रयत्नांपायी शक्य झालेले आहे. विजेवर चालणारी वाहने अधिकाधिक वापरली जावीत यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे, त्यांचा पर्यावरणविषयक दृष्टिकोन परिपक्व बनवणे आणि त्या माध्यमातून पर्यावरणरक्षणाला

नागरिकांचाही हातभार लागावा या दृष्टीने चीनने नियोजनबद्ध पावले उचलली आहेत.

या शिवाय, 'ग्रीन बेल्ट अँड रोड' या मोहिमेला प्रतिसाद देत जागतिक प्रयत्नांनाही चीनने साथ दिली आहे. हरित विकासाला प्रोत्साहन देत त्यासाठी मोठमोठ्या योजना हाती घेतलेल्या आहेत. शुष्क अशा वाळवंटी प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर हिरवी झाडे लावण्यासाठी हाती घेतलेले महाप्रकल्प हा त्याच योजनांचा एक भाग आहे. मध्य आशियातील हरितलागवड आणि सौर ऊर्जा प्रकल्प यांच्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या मदतीचा हातसुद्धा चीनने पुढे केलेला आहे. त्या माध्यमातून अपारंपरिक ऊर्जा विकासालाही हातभार लागणार आहे. शहरातील जलव्यवस्थापनासाठी चीनने 'स्पाँज सिटी' ही एक अभिनव मोहीमही हाती घेतलेली आहे. शहरी भागांमध्ये पावसाच्या पाण्याचे संकलन, नैसर्गिक पद्धतींचा वापर करून पाण्याचे शुद्धीकरण, पाण्याचा पुनर्वापर अशा विविध माध्यमांतून स्थानिक जलस्रोतांची क्षमता वाढवणे आणि पुराचे धोके कमी करणे यासाठी नियोजनबद्ध पावले उचलली जात आहेत.

या वैविध्यपूर्ण उपाययोजनांकडे दृष्टीक्षेप टाकला असता असे लक्षात येते की, गेल्या दोन दशकांपासून पर्यावरणाचा ऱ्हास हा विषय चीनने खूप गांभीर्याने हाताळलेला आहे. परिस्थिती हातातून निसटते की काय अशी वेळ आलेली असताना त्यामधून सावरून, स्वतःमध्ये सुधारणा करून आणि परिवर्तन घडवण्यासाठी ठोस असे कार्यक्रम व्यापक स्तरावर राबवून पर्यावरणरक्षण आणि संवर्धनाकडे चीनने विशेष लक्ष दिलेले आहे. पर्यावरण रक्षणासंदर्भातील ती चिनी वाट इतरांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरू शकेल अशी आहे.

**संदर्भ :**


1) https://greenfdc.org/china-belt-and-road-initiative-bri-investment-report-2023/
2) https://lowcarbonpower.org/region/People's_Republic_of_China
3) https://www.scmp.com/business/article/3293592/china-erase-excess-solar-panel-capacity-2027-ubs-forecasts



# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

# अर्थकारण

## काटकसरीच्या राजकीय धोरणांचे तर्कशास्त्र आणि फलित

भारतीय परंपरेमध्ये 'संजीवनी विद्ये'ची संकल्पना पुरातन काळापासून जागती राहिलेली आहे. प्राणहीनांना पुन्हा संजीवित करणाऱ्या या विद्येला 'मृत संजीवनी' असेदेखील नाव दिले जाते. ही विद्या प्राचीन काळापासून भारतीय आचार्यांना ठाऊक होती, अशीही धारणा आहे. पुराणांतरीच्या कथांनुसार दैत्यांचे गुरू शुक्राचार्य यांना ही विद्या अवगत होती आणि त्यांमुळे देव आणि दानवांच्या युद्धात मृत्युमुखी पडलेल्या राक्षसांना ते संजीवनी विद्येचा प्रयोग करून पुन्हा जिवंत करत असत, अशी आख्यायिकाही प्रसिद्ध आहे. शुक्राचार्यांच्या कुळात ही विद्या भृगू ऋषीपासून चालत असल्याचेही सांगितले जाते. हीच संजीवनी विद्या शुक्राचार्यांनी नाथ संप्रदायातील जालंदरनाथांना शिकवली होती, असाही एक प्रवाद सांगतो. आणखी एका धारणेनुसार, 'संजीवनी' नावाची एक वनस्पती द्रोणागिरी पर्वतावर असून ती प्राणहीनांना पुन्हा जीवदान प्रदान करणारी अशी आहे. रामायणातील कथाभागानुसार, इंद्रजिताने प्रेरित केलेल्या शक्तीमुळे प्राणांतिक जखमी झालेल्या लक्ष्मणाला जीवनदान प्रदान करण्यासाठी, काही ठरावीक वेळेत ती संजीवनी वनस्पती आणावी लागेल, असे वैद्यराज सुषेणाने सांगितल्यामुळे हनुमंत द्रोणागिरीच उचलून घेऊन रणभूमीवर पातल्याचेही दाखले सापडतात. थोडक्यात सांगायचे तर, अमरत्व प्रदान करणारी विद्या अगर वनस्पती म्हणून 'संजीवनी'चा डंका आपल्या पुराणांतरी प्राचीन काळापासून गाजत-गर्जत आलेला आहे.

काही संकल्पनांना जणू काही त्याच संजीवनी विद्येचा स्पर्श झाला असावा, असे म्हणणे गेल्या १०० वर्षांतील काही घटना-प्रसंगांवरून म्हणणे भाग आहे. 'काटकसरीचे राजकारण' (ऑस्टिरिटी पॉलिटिक्स) ही संकल्पना त्यांतीलच एक म्हणावी लागेल. प्रामुख्याने पश्चिमी राष्ट्रांत १९२०चे संपूर्ण दशक या संकल्पनेने प्रभावित केलेले होते. किंबहुना, १९२९-३०मध्ये उद्भवलेल्या भीषण अशा जागतिक

मंदीच्या अवतरणाला या संकल्पनेने प्रभावित झालेल्या राजकीय-आर्थिक-औद्योगिक धोरणांनीच मोठ्या प्रमाणावर हातभार लावला, असेही एक दावावजा प्रतिपादन अर्थाभ्यासकांच्या एका चमूकडून आजवर सतत केले गेलेले आहे. १९२९ ते १९३९ अशी दहा वर्षे उभ्या जगाला घेरून राहिलेल्या प्रगाढ मंदीला त्या आधीच्या दशकभरादरम्यान युरोपातील काही देशांमध्ये राबविण्यात आलेली काटकसरपूरक राजकीय धोरणे खूप प्रमाणात कारणीभूत ठरली, अशी भूमिका काही अभ्यासक मांडतात. मुख्यत: ब्रिटन, ब्रिटिश अंमलाखालील भारत, जर्मनी आणि इटली या देशांचा निर्देश या संदर्भात करण्यात येतो. केवळ एवढेच नाही तर, अशा प्रकारची सरकारी खर्चाबाबत काटकसरीची कठोर धोरणे राबविल्यामुळेच जर्मनीमध्ये हिटलरप्रणीत फॅसिस्ट शक्तींच्या उदयाला अवकाश प्राप्त झाला तर, दुसरीकडे इटलीमध्ये मुसोलिनीचे हात बळकट झाले, असाही एक विचारप्रवाह अभ्यासकांमध्ये दिसतो.

काटकसरीची राजकीय धोरणे राबविण्याच्या काही देशांच्या धोशापायी वैश्विक स्तरावर उद्भवलेल्या आर्थिक अरिष्टांचा सामना करण्यासाठीच अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष फ्रॅन्कलिन रुझवेल्ट यांनी सत्तेवर येताच १९३३ साली 'न्यू डील' असे सम्यक् नामकरण केलेल्या धोरणांची मुहूर्तमेढ रोवली. १९३३ सालापासून पुढे पाच वर्षे, म्हणजे, १९३८ सालापर्यंत त्या धोरणविधानाची अंमलबजावणी अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये जारी राहिली. आर्थिकदृष्ट्या दु:सह स्थितीतील समाजघटकांना थेट अर्थसाह्य, बेरोजगारांसाठी नोकऱ्यांच्या संधी निर्माण करणे आणि/अथवा बेरोजगार भत्याची सुविधा पुरविणे, वृद्धांसाठी निवृत्तिवेतनाची व्यवस्था करणे, शारीरिकदृष्ट्या विकलांगांसाठी अर्थसाहाय्याची तरतूद करणे, अडचणीत आलेल्या बँकांना सरकारी अर्थसाहाय्याचा टेकू पुरविणे, शेतकऱ्यांना अर्थसाह्य देणे... अशा प्रकारच्या धोरणांचा 'न्यू डील' कार्यक्रमात अंतर्भाव होता. मंदीच्या चपेट्यात होरपळणाऱ्या अमेरिकी अर्थव्यवस्थेला आणि मंदीच्या चटक्यांनी जर्जर झालेल्या अमेरिकी समाजातील बाधित घटकांना लगोलग मदतीचा हात पुरवत त्यांचे सक्षमीकरण घडवून आणणे, हा 'न्यू डील' या उपक्रमाच्या मुळाशी असलेला मुख्य हेतू होता.

काटकसरीच्या राजकारणाचा बहर दुसऱ्या महायुद्धानंतर पारच ओसरला. कारण, युद्धात होरपळलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांची पुनर्उभारणी करण्यासाठी सरकारी खर्चाचा स्रोत बळकट बनवणे सगळ्यांच संबंधितांना क्रमप्राप्त होते. ज्येष्ठ व विख्यात अर्थतज्ज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांनी सुचविलेल्या उपायांचा अवलंब देशोदेशी सुरू झाला. अर्थव्यवस्थेतील मागणी आणि रोजगार या दोहोंना ऊर्जा मिळण्याच्या

दृष्टीने शासनसंस्थेनेच मोठ्या प्रमाणावर विकासाच्या कल्याणकारक योजना सरकारी खर्चाची ओंजळ ओणवी करून राबविल्या पाहिजेत, हे केन्सप्रणीत प्रमेय व्यापक स्तरावर स्वीकारण्यात आले. केवळ इतकेच नाही तर, दुसऱ्या महायुद्धात जायबंदी झालेल्या दक्षिण तसेच पश्चिम युरोपातील देशांच्या अर्थव्यवस्थांना आधार पुरविण्यासाठी अमेरिकेने 'मार्शल प्लॅन'सारख्या योजनेलाही हात घातला. त्यांमुळे, साधारणपणे १९५०च्या दशकापासून पुढील तीन ते साडेतीन दशके काटकसरीच्या धोरणदृष्टीचा पाठपुरावा करणाऱ्या राजकीय विचारप्रणालीचा कोणी विचारदेखील केला नाही. किंबहुना, तो साराच कालखंड शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाच्या धोरणप्रणालीची तळी उचलून धरणारा शाबीत झाला. राज्यसंस्था म्हणजे 'बिग ब्रदर', ही शासनसंस्थेसंदर्भातील भूमिका प्रस्थापित होत आली ती नेमकी त्याच पर्वादरम्यान.

काटकसरीच्या राजकारणाचा मुख्य भर राहतो तो शासकीय तिजोरीतील तुटीचा खड्डा भरून काढण्यास, कर्जांचा बोजा उतरविण्यास अगर हलका करण्यास प्राधान्य देणाऱ्या वित्तीय (राजकोषीय) धोरणांच्या आखणी-अंमलबजावणीवर. ही उद्दिष्टे साध्य करण्याचे मार्ग दोन. एक तर, सरकारी खर्चावर मर्यादा आणणे अथवा/आणि सरकारी महसूल वाढविण्यासाठी कंबर कसणे. सरकारी अर्थसाह्यांना कात्री लावणे आणि/अगर करदरांची फेररचना करणे, मग शासनसंस्थांना भाग पडते. या व्यतिरिक्तही अन्य उपाययोजनांचा अंतर्भाव काटकसरीच्या राजकीय धोरणांमध्ये होतो अगर केला जातो. कठोर पैसाधोरणाचा अवलंब करणे आणि/अगर खासगीकरणास चालना देणे यांसारख्या पर्यायांचाही अवलंब काटकसरीच्या धोरणदृष्टीचा पाठपुरावा करणारी राजकीय विचारप्रणाली करत असते. सर्वसाधारण भाषेमध्ये बोलायचे तर, शासकीय अर्थकारणाला अथवा वित्तकारणाला काही एक शिस्त लावणे, हा काटकसरीच्या राजकीय विचारप्रणालीचा गाभा होय. काटकसरीवर भर देणारी वित्तीय धोरणे राबविणे उचित की अनुचित, काटकसरीची धोरणे राबविल्याने त्यांचे अपेक्षित असे सकारात्मक परिणाम व्यवहारात उगवतात अथवा नाही, यांबाबत धोरणकर्तेच केवळ नव्हे तर, सैद्धान्तिक अर्थशास्त्रीय संशोधनाच्या विश्वातील अभ्यासकांमध्येही एकमत अभावानेच आढळते. तरीदेखील, १९२०चे दशक उलटून चांगली १०० वर्षे उलटली तरी, जमिनीत खोलवर मुळे रुजवून बसल्यासारखी, काटकसरीच्या राजकीय प्रणालीची संकल्पना वेळोवेळी डोके वर काढताना दिसतेच. तिला संजीवनी वनस्पतीचा अगर संजीवनी मंत्राचा स्पर्श झालेला असावा की काय, असा विचार त्यांमुळेच कोणाही मनात उद्भवावा.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक अर्थकारणाचा चेहरामोहरा झपाट्याने बदलला. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या वैश्विक स्तरावरील दोन विकास संस्था अस्तित्त्वात आल्या आणि दुसऱ्या महायुद्धात हानी पोहोचलेल्या अर्थव्यवस्थांना वित्तीय साहाय्याचा एक आधार खुला झाला. त्याच वेळी, वासाहतिक वर्चस्वाखालून १९५० आणि १९६०च्या दशकात स्वातंत्र्य पदरात पाडून घेतलेल्या नवस्वतंत्र विकसनशील देशांनाही सुलभ तरतुदींनीशी दीर्घकालीन मुदतीच्या अर्थसाहाय्याचा स्त्रोत या दोन जागतिक सावकारांच्या रूपाने खुला झाला. दुसरीकडे, अमेरिकाकेंद्री बनण्याकडे जागतिक अर्थव्यवस्थेची वाटचाल झपाट्याने चालू झाली. अमेरिकी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी स्वीकारलेली उदार व प्रसरणशील वित्तीय धोरणे आणि वेगवान तंत्रशास्त्रीय प्रगती या दोहोंपायी अमेरिकी अर्थव्यवस्था केवळ दमदार वेगाने आगेकूच करू लागली इतकेच नव्हे तर, ती उभ्या वैश्विक अर्थव्यवस्थेचे 'पॉवर हाउस'देखील बनली. त्यांमुळे, दुसऱ्या महायुद्धानंतरचे जवळपास पुढील पाव शतक हे भरधाव आर्थिक विकासाचे शाबीत झाले. या संपूर्ण कालावधीदरम्यान काटकसरधार्जिणी धोरणे राबविण्याचे ना कारण होते ना त्याची निकड भासावी अशी परिस्थिती उद्‌भवली.

परंतु, हे सगळे चित्र एकाएकी पालटले ते १९७०च्या दशकाच्या प्रारंभी. पेट्रोलियम व पेट्रोलजन्य जिनसांचे उत्पादन व निर्यात करणाऱ्या देशांच्या संघटनेने (ओपेक - Organization of Petroleum Exporting Countries - OPEC) १९७३ साली एकाएकीच पेट्रोल व पेट्रोलजन्य जिनसांची भाववाढ एकतर्फीच जारी केली आणि जगाला पहिला 'ऑइल शॉक' बसला. मुख्यत: जे विकसनशील देश कच्च्या खनिज तेलाच्या आयातीवर निर्भर होते त्यांच्या अर्थव्यवस्थांना जबर धक्का बसला. तेलाच्या आयातीचा त्यांचा खर्च एकदम वाढला. केवळ इतकेच नाही तर, तेलजन्य जिनसांच्या दरवाढीपायी सर्वसाधारण महागाईचा तेवरदेखील भडकायला लागला. त्या देशांच्या अर्थव्यवस्थांच्या आगेकूचीचा दर मंदावू लागला. त्याचा परिणाम रोजगारावर जाणवू लागला. या चपेट्यातून विकसित अर्थव्यवस्थादेखील सुटल्या नाहीत. तेलाच्या दरवाढीने विकसित देशांच्या अर्थव्यवस्थांमध्येही महागाई फणा वर काढू लागली. आधीची दोन दशके अवलंबलेली विस्तारवादी, उदार अशी वित्तीय तसेच पैसाविषयक धोरणे आणि इंधनांचे चढलेले दर या दोहोंपायी विकसित अर्थव्यवस्थांमध्येही महागाईचा ज्वर चांगल्यापैकी जाणवायला लागला. त्या महागाईला लगाम घालण्यासाठी विकसित देशांमधील मध्यवर्ती बँकांनी कठोर पैसाधोरण

अवलंबण्यास सुरुवात केली. साहजिकच, त्यांमुळे विकसित देशांमधील व्याजांचे सरासरी दर चढू लागले. चढत्या व्याजदरांचा फटका बसू लागला गुंतवणुकीला आणि त्याची परिणती दिसून येऊ लागली ती रोजगारनिर्मितीवर.

मध्य पूर्वेतील तेलनिर्यातदार देशांच्या संघटनेने (ओपेक) १९७३ साली अचानकच वाढवलेल्या तेलकिमतींचे चटके निवतात न निवतात तोच इराणातील उठावापायी १९७९ साली पुन्हा एकवार तेलाचा भडका उडाला. इराणच्या शहांची सत्ता उलथून पाडल्यानंतर जी अस्थिरता तिथे निर्माण झाली त्यांपायी तेलाचे उत्पादन बाधित बनले. इराणमधील दरदिवशीचे तेल उत्पादन जवळपास पाच लाख बॅरल्सनी घटले. कच्च्या खनिज तेलाच्या जागतिक उत्पादनात इराणचा वाटा त्या वेळी होता जवळपास सात टक्क्यांचा. दर दिवशीच्या तेल उत्पादनात इराणमध्ये जवळपास पाच लाख बॅरल्सची घट घडून आल्यामुळे साहजिकच तेलाचे बाजारभाव तापले. त्यांतच, इराणमधील ही अस्थिरता आणखी किती काळ कायम राहून तेलाच्या पुरवठ्याला फटका बसेल यांबाबतच्या अनिश्चिततेपायी धास्तावलेल्या तेल आयातदार देशांनी मोठ्या प्रमाणावर तेलाचे साठे करून ठेवण्याचा सपाटा चालू केला. त्यांपायी तेलाचे दर अधिकच भडकले आणि सर्वत्र सर्वसाधारण महागाईला इंधनपुरवठा होऊ लागला.

महागाईचा प्रतिकूल परिणाम अर्थविकासावर जाणवू लागला. चढलेल्या व्याजदरांपायी नवीन गुंतवणुकीच्या पायात खोडा पडत चाललेलाच होता. त्यांतच, अनेक विकसित देशांमधील नानाविध पारंपरिक उद्योग अस्तंगत होत होते. दुसरीकडे, बदलत्या औद्योगिक तंत्रज्ञानापायी अनेक देशांमध्ये संरचनात्मक बेरोजगारीचे (स्ट्रक्चरल अन्‌एम्प्लॉयमेन्ट) आव्हान तीव्र बनू लागले. घटलेला आर्थिक विकासाचा दर, वाढती महागाई आणि चढे व्याजदर या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून अनेक उद्योगांमधून कामगारकपात सुरू झाली. या सगळ्यांचा परिणाम होऊन महागाई आणि बेरोजगारी यांच्या दुहेरी चपेट्यात अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्था १९८०च्या दशकाच्या प्रारंभी लपेटल्या गेल्या. विकसित देशांमधील अर्थचित्र विपरित बनल्याने त्या अर्थव्यवस्थांमधील मागणी मलूल होऊ लागली. परिणामी, पश्चिमी बाजारपेठांवर अवलंबून असणाऱ्या विकसनशील देशांच्या निर्यातीवर आच आली. भडकलेल्या तेलापायी ज्वर वाढलेल्या महागाईमुळे विकसनशील देशही गांजलेले होतेच. त्यांतच, त्यांच्या निर्यातीलाही खोडा बसला.

अमेरिकी अर्थव्यवस्थाही महागाईचा व वाढत्या बेरोजगारीचा सामना करत होतीच. महागाईला चाप लावण्यासाठी अमेरिकी मध्यवर्ती बँकेने कठोर पैसाधोरणाचे

पाऊल उचलून पतपुरवठ्याला लगाम लावला. त्यांपायी व्याजदरांची सरासरी पातळी अमेरिकेत चढती भाजणी दर्शवू लागली. त्यांमुळे, अमेरिकी भांडवल बाजारातून ज्यांनी कर्जे उभारलेली होती त्यांना व्याजाच्या भरण्यापायी अधिक बोजा सहन करणे माथी आले. अनेक विकसनशील देशांनी त्या काळात विकसित देशांमधील भांडवलबाजारांतून कर्जे घेतलेली होती. ती बव्हंश कर्जे तरत्या व्याजदरांची होती. व्याजांचे दर चढल्यामुळे संबंधित विकसनशील देशांना वाढलेल्या व्याजदरांनी व्याजभरणा करणे क्रमप्राप्त ठरले. पश्चिमी बाजारपेठांतील मागणी घटल्यामुळे विकसित देशांमधून तिथे निर्यात होणाऱ्या जिनसांच्या किंमती नरमाईकडे झुकलेल्या होत्या. त्यांतच, अनेक विकसनशील देश आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सक्रिय बनल्यामुळे निर्यातीच्या आघाडीवर सगळीकडेच स्पर्धा वाढलेली होती. त्यांपायी सरासरीने जिनसांच्या किंमतीदेखील घटलेल्या होत्या. वाढत्या स्पर्धेपायी सरासरीने उतरलेल्या किमती आणि पश्चिमी बाजारपेठांतील मागणी घटल्यामुळे निर्यातीत घडून आलेल्या घटीपायी विकसनशील देशांना परकीय चलनाचा होणारा पुरवठा पुरता बाधित बनलेला होताच. अशा परिस्थितीत, अनेक विकसनशील देशांना पूर्वी घेतलेल्या कर्जांची परतफेड जड होऊन बसले व कर्जे थकली. त्या सत्राची सुरुवात, मेक्सिकोने १९८२ साली कर्जाची परतफेड करण्यासंदर्भातील असमर्थता व्यक्त करण्याने झाली.

थकित कर्जांची ती समस्या अधिकतर करून गंभीर बनली ती लॅटिन अमेरिकेतील तसेच आफ्रिकेतील अनेक देशांच्याबाबतीत. आशिया खंडातील काही देशही त्या गर्तेत फसलेले होते. अशा देशांना त्या संकटातून बाहेर काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखे जागतिक सावकार पुढे सरसावले पण बरोबर काही अटींची जंत्री घेऊनच. कर्जदार देशांनी काही एक वित्तीय शिस्त जोपासण्याची हमी दिली तरच त्यांना कर्जांची परतफेड करण्यासंदर्भात अधिक वेळ देण्यासारख्या अथवा पूर्वीची कर्जे परत करण्यासाठी नव्याने कर्ज उपलब्ध करून देण्यासारख्या सुविधांचा देकार आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने देऊ केला. त्या अटीच 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' या नावाने विख्यात बनल्या. 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' हे दुसरे-तिसरे काही नसून काटकसरीच्या राजकीय धोरणप्रणालीचे दुसरे नाव होय! म्हणजेच, काटकसरीच्या राजकीय धोरणाला १९२०च्या दशकानंतर सहा दशकांनी संजीवनी वनस्पतीची मात्रा चाटवली गेली. 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' हा काटकसरीच्या राजकीय धोरणप्रणालीचा दुसरा अवतार होता.

थकित कर्जे, बेरोजगारी, घटलेला विकास दर, महागाई, सरकारी तिजोरीतील वाढती तूट... यांसारख्या आर्थिक अरिष्टांमध्ये फसलेल्या अर्थव्यवस्थांना तारण्यासाठी

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि अमेरिकी अर्थ खाते यांनी जी मार्गदर्शक तत्त्वे सूचित केली त्यांना अमेरिकी अर्थतज्ज्ञ जॉन विल्यम्सन यांनी १९८९ साली 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' अशी सर्वसमावेशक संज्ञा बहाल केली. अमेरिकी वित्त मंत्रालय, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या तिघांचीही केंद्रीय कार्यालये वॉशिंग्टन या शहरात असल्याने त्या मार्गदर्शक तत्त्वांच्या गुच्छाला 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' असे नाव लाभले. अडचणीत सापडलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांना वित्तसाहाय्याचा टेकू हवा असेल तर त्यांनी 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्'च्या कक्षेत येणाऱ्या आर्थिक-वित्तीय शिस्तीचे पालन करणे अनिवार्य ठरेल, अशा प्रकारची भूमिका त्या दोन्ही वैश्विक सावकारांनी त्या वेळी धारण केली.

'वॉशिंग्टन कन्सेन्सस्'च्या कक्षेत एकंदर दहा कलमांचा अंतर्भाव होता. त्या कलमांचा तपशील पुढीलप्रमाणे : (१) शासकीय तिजोरीतील तूट वाढू नये यासाठी सरकारने कर्जे उभारण्यावर मर्यादा आणणे, म्हणजेच पर्यायाने तुटीला पायबंद घालणे (२) सरकारी खर्चाची गुणवत्ता सुधारणे. अनुदानांऐवजी तोच पैसा आर्थिक घटकांच्या उत्पादकतावाढीस हातभार लावेल अशा गुंतवणुकीकडे वळवणे (३) वाढीव कर महसूल जमा करण्यासाठी करांच्या सीमान्त दरांतील वाढ सीमित राखत असतानाच करांचा पाया विस्तृत बनवून करसंकलन वाढवण्यावर जोर देणे (४) भांडवल बाजारातील प्रवाहांनुसार व्याजदरांची निश्चिती व्हावी. व्याजदर सरकारने ठरवू नयेत (५) आर्थिक वाढीस पूरक ठरेल अशा पातळीवर देशाच्या चलनाचा अन्य परदेशी चलनांशी असणारा विनिमय दर राखला जावा (६) परदेशी व्यापारावरील बंधने हटवून व्यापार अधिक मुक्त करण्यात यावा (७) परदेशी कंपन्यांना देशी अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूक करणे सुलभ बनवण्यात यावे (८) सरकारी मालकीच्या कंपन्यांची उत्पादकता सुधारावी यासाठी त्यांचे खासगीकरण करण्यात यावे (९) बाजारपेठांवरील सरकारी नियंत्रणे हटवली जावीत, आणि (१०) मालमत्तेसंदर्भातील खासगी हक्कांची जपणूक निगुतीने करण्यात यावी. थोडक्यात, अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थापनात शासनसंस्थेने तिचा सहभाग घटवून खासगी क्षेत्राला अधिक वाव द्यावा आणि त्या माध्यमातून अर्थकारणात वित्तीय शिस्त जारी करावी, हा 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्' या संकल्पनेचा गाभा होता. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत, 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' या दोन भागिदारांच्या परस्परसापेक्ष सहभागातील व सहयोगातील ढळलेले संतुलन ठाकठीक करण्यासाठी अवलंबणे गरजेचे असलेली कार्यपद्धती म्हणजे 'संरचनात्मक ठाकठिकी कार्यक्रम'

(स्ट्रक्चरल ॲडजस्टमेन्ट प्रोग्रॅम), असे, काटकसरीच्या राजकीय धोरणप्रणालीचे नव्याने बारसे १९८०च्या दशकाच्या मध्यापासून करण्यात आले. या धोरणदृष्टीचे समर्थन करणाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आर्थिक विकासाच्या आणि व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत शासनसंस्थेचा तिथवर असणारा व्यापक सहभाग अधिक नेमकेपणाने निर्देशित करून सीमित करण्याद्वारे शासनसंस्थेच्या वित्तीय कारभाराला शिस्त लावणे म्हणजे अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक रचनेची कालानुरूप दुरुस्ती होय. काटकसरीच्या राजकीय धोरणप्रणालीचा हा नव-अवतार असा झाला.

इथे एक बाब आवर्जून नोंदवून ठेवली पाहिजे. ती अशी की, १९८०च्या दशकामध्ये विकसनशील देशांच्या समूहामध्ये सगळेच देश सर्वसाधारणपणे एकाच प्रकारच्या आर्थिक अडचणींचा सामना करत होते, असे समजणे दिशाभूल करणारे ठरेल. लॅटिन अमेरिका आणि आफ्रिकेतील अनेक देश कर्जांच्या सापळ्यात गुरफटलेले होते ही बाब खरीच. परंतु, मुख्यत: पूर्व आशिया तसेच दक्षिण आशियातील अनेक देश आर्थिक आघाडीवर नवीन धोरणदिशेचा अवलंब करण्यास सिद्ध झालेले होते. १९७८ साली चीनने आर्थिक पुनर्रचनेला हात घातला. तर, १९८० साली पुन्हा सत्तेवर आलेल्या इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाच्या सरकारनेदेखील भारतात नव्याने उभरत असलेल्या शहरी मध्यमवर्गाच्या आशा-अपेक्षा-आकांक्षा हेरून, १९७०च्या दशकात आर्थिक विकासविषयक धोरणांचा 'गरिबी हटाव' व ग्रामीण प्रगतीवर स्थिर ठेवलेला झोत हळूहळू बदलायला सुरूवात केलेली होती. शासनसंस्थाप्रणीत आर्थिक विकासाकडे दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्णत: झुकलेला धोरणझोत, क्रमाने, शासनसंस्थेचा अर्थकारणातील सहभाग व भूमिका अधिक स्पष्टपणे आरेखित करून खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाला अधिक वाव देणाऱ्या धोरणप्रणालीकडे १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धामध्ये वळायला सुरुवात झाल्याची चिन्हे अनेक ठिकाणी दिसू लागलेली होती. या प्रक्रियेलाच 'आर्थिक सुधारणा' अथवा, अधिक नेमकेपणे बोलायचे तर, 'आर्थिक पुनर्रचना' असे संबोधण्यात येतो. म्हणजेच, १९८०च्या दशकाच्या सुरुवातीस जे विकसनशील देश कर्जांच्या बोज्याखाली दबलेले होते त्यांच्या संदर्भात 'स्ट्रक्चरल ॲडजस्टमेन्ट प्रोग्रॅम' या संकल्पनेला जी अर्थवत्ता प्रस्तुत होती तिच्यापेक्षा निराळी अर्थवत्ता पूर्व तसेच दक्षिण आशियातील चीन व भारतासारख्या काही देशांच्यासंदर्भात लागू पडत होती.

आर्थिक व्यवस्थापनासंदर्भातील खुल्या बाजारपेठीय व्यवहारधार्जिण्या धोरणदृष्टीचा माहौल १९८०च्या दशकाच्या मध्यापासून ते पुढील दोन दशके गतिमान राहिला.

परंतु, २००८ साली अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये उद्‌भवलेल्या ‘सब्‌प्राइम’ कर्जांच्या समस्येपायी त्या पर्वाला पायबंद बसण्याची परिस्थिती उद्‌भवली. २००८ सालातील १५ सप्टेंबर रोजी ‘लेहमन ब्रदर्स’ या १८५० साली स्थापन झालेल्या विख्यात व बलाढ्य अमेरिकी वित्त कंपनीने दिवाळखोरी जाहीर केली आणि १९२९ ते १९३९ या दशकभर ठाण मांडून बसलेल्या गहिऱ्या जागतिक मंदीच्या आठवणी जाग्या करणाऱ्या वैश्विक वित्तीय अरिष्टाची पावले अमेरिकी अर्थव्यवस्थेत उगम पावून जगभरात सर्वत्र सर्वदूर उमटली. अर्थविकासामध्ये ‘शासनसंस्था’ आणि ‘बाजारपेठ’ या दोन भिडूंच्या सहयोगात्मक सहभागासंदर्भातील धोरणदृष्टीचा लंबक थेट दुसऱ्या टोकाला पोहोचलेला होता. खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाची सद्दी प्रस्थापित होण्याच्या १९८०च्या दशकाच्या उत्तरार्धापासून सुरू झालेल्या पर्वादरम्यान विचारप्रणालीचा लंबक Government has no business to be in business या ध्रुवावर जाऊन स्थिरावलेला होता. अर्थकारणाच्या व्यवस्थापनासंदर्भातील त्या कमालीच्या विपरित धारणेचा फुगा लेहमन ब्रदर्सच्या दिवाळखोरीची टाचणी लागल्यानंतर धाडकन फुटला. अर्थकारणातील उत्पादन-वितरण-विभाजनासारखे कळीचे निर्णय अनियंत्रित बाजारपेठेवर सर्वथैव सोडून दिल्याचे दुष्परिणामच जणू ‘सब्‌प्राइम’ कर्जांच्या फुटलेल्या फुग्याने अमेरिकी अर्थव्यवस्थेत उडवून दिलेल्या धुमाकुळामुळे अधोरेखित झाले, अशी उपपत्ती काही अभ्यासक मग मांडू लागले. तर, अमेरिकेत जन्माला आलेल्या या वित्तीय अरिष्टाद्वारे खासगी कॉर्पोरेट विश्वाचा वरचष्मा गाजणाऱ्या खुल्या बाजारपेठीय व्यवस्थेतील धोक्यांचा साक्षात्कार जागतिक समुदायाला पुन्हा एकवार होत असल्याची हाकाटी चीनने उठवली.

‘सब्‌प्राइम’ कर्जांच्या अमेरिकी समस्येने सगळ्या वैश्विक अर्थकारणावर त्याची सावट आच्छादल्यानंतर जे वित्तीय अरिष्ट उद्‌भवले त्यांपायी जगभरात सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात मंदीची छाया दाटली. अमेरिकेसह अनेकानेक देशांमधील बँका व वित्तीय संस्था अडचणीत आल्या. अनेक उद्योगधंदे बसले. त्यांपायी मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचे संकट गडद बनले. कित्येकांचे रोजगार कसेबसे बचावले पण पूर्ण वेळच्या नोकऱ्यांचे रूपांतर अर्धवेळ नोकऱ्यांमध्ये घडून आले. पगारवाढी लांबणीवर पडल्या. एकंदरीने सर्वत्रच घनघोर अनिश्चिततेचा माहौल प्रस्थापित झाला. नोकरी-रोजगार अशा कशाचीच शाश्वती न उरल्याने कुटुंबसंस्थांनी खरेदीकडील हात आखडता घेतला. त्यांपायी बाजारपेठांमधील मागणी खचली. त्या साऱ्या निराशेचा प्रतिकार करण्यासाठी, देशोदेशींच्या शासनसंस्थांना पुन्हा एकवार केन्सप्रणीत

अर्थधोरणांचा आश्रय घेणे भाग पडले. काटकसरीच्या भलामणीला वाहिलेली राजकीय धोरणे खुंटीला टांगून ठेवण्याखेरीज पर्याय उरला नाही. काटकसरीच्या धोरणाचा दुसरा अवतार अशा रीतीने आटपला. अर्थव्यवस्थेतील मागणी टिकवून धरण्यासाठी सरकारी खर्चाची भरभक्कम इंजेक्शने अर्थकारणाला टोचण्याकडे शासनसंस्थांनी पावले उचलली. जागतिक वित्तीय अरिष्टाच्या, साधारणपणे २०११-१२ सालापासून बसायला लागलेल्या चटक्यांची तीव्रता, ओसरण्याच्या दिशा साधारणपणे २०१६-१७ सालापासून उजळू लागल्या. त्यांमुळे, सरकारी खर्चाळूपणाला तिथवर वाहिलेल्या धोरणांचा फेरविचार शासनसंस्थांच्या पातळीवर जरा कोठे मूळ धरू लागतो न लागतो तोच २०१९ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून 'कोविड-१९'च्या पाउलखुणा चीनसह अन्य काही देशांमध्ये उमटू लागल्या. आणि २०२० सालातील मार्च महिन्यात जगड्.व्याळ टाळेबंदीच्या साखळदंडांनी वैश्विक अर्थव्यवस्थेला पुरते जखडून टाकले! 'कोरोना'च्या उद्भवापायी निपजलेली आर्थिक दु:स्थिती जवळपास २०२२ सालाच्या मध्यापर्यंत दाट राहिली. 'कोविड-१९'ने उडवलेल्या हलकल्लोळापायी पुरत्या जायबंदी झालेल्या अर्थव्यवस्थांना पुन्हा उभारी देण्यासाठी शासनसंस्थेलाच कंबर कसणे भाग होते. काटकसरीच्या राजकीय धोरणांचे खुंटीवर टांगून ठेवलेले गाठोडे, त्या परिस्थितीत, खाली उतरवण्याचा विचार स्वप्नामध्ये अवतरणेदेखील अशक्यच होते.

प्रथम उद्भवलेले वैश्विक वित्तीय अरिष्ट आणि त्या पाठोपाठ आलेला 'कोविड-१९'चा फेरा या दोन दणक्यांपायी मेटाकुटीला आलेल्या अर्थकारणात धुगधुगी फुंकण्यासाठी शासनसंस्थेलाच खर्चाकडे हात ओणवा करण्यावाचून गत्यंतर राहिले नाही, हे खरे. परंतु, मुळात त्यासाठी पैसा कोठून आणायचा हा प्रश्न होताच व तो राहतोच. कारण, अर्थव्यवस्थेची चाकेच मरगळल्याने सरकारच्या करसंकलनालाही फटका बसला. म्हणजे, एकीकडून महसुलाचे आटलेले प्रवाह आणि दुसरीकडे अर्थकारण तगविण्यासाठी पैसा खर्च करण्याची अनिवार्यता या कात्रीत सापडलेल्या शासनसंस्थांना, मग, कर्जउभारणी करण्याखेरीज गत्यंतरच उरले नव्हते. कारण अगदी सोपे व सरळ होते. जात्याच्या त्या दोन पाळ्यांमध्ये सगळेच सापडलेले होते. महसुलाचे सुकलेले प्रवाह आणि वाढीव खर्चाची अपरिहार्यता या दोहोंची परिणती शासनसंस्थेची वित्तीय तूट फुगण्यात घडून यावी, हे स्वाभाविकच. शासनसंस्था आणि खासगी कॉर्पोरेट विश्व दोघांनाही भांडवल बाजारातून कर्जाऊ रकमा उभारण्याखेरीज अन्य मार्गच उरला नव्हता व नाही. त्यांमुळे, आजमितीस सर्वत्र कर्जांचे डोंगर वाढल्याचे चित्र दिसते आहे. केवळ इतकेच नाही तर, खर्चाबाबत

हात ओणवा करण्याने महागाईचा तेवर चढलेला आहे. तिसरीकडे, रशिया-युक्रेन संघर्ष, 'हमास' व इस्त्रायल यांचे परस्परांवर जारी असलेले हल्लेसत्र आणि अमेरिका व इस्त्रायलने इराणविरुद्ध उपसलेले हत्यार यांपायी आखाती प्रदेश पुन्हा एकवार कमालीचे अस्थिर बनलेले आहेत. परिणामी, कच्चे खनिज तेल तापून महागाईला खतपाणी मिळते आहे. या सगळ्यांवर उपाय म्हणून, काटकसरीच्या राजकीय-आर्थिक धोरणांचा तिसरा अवतार साकारला तो 'वित्तीय अथवा राजकोषीय दृढीकरणांच्या (फिस्कल कन्सॉलिडेशन) धोरणाचा पाठपुरावा अगत्यपूर्वक करण्याच्या आवाहनाद्वारे. १९२०च्या दशकानंतर, पुरेपूर १०० वर्षांनी, काटकसरीच्या राजकीय धोरणाला दुसऱ्यांदा संजीवनी मात्रा चाटवली जाऊ लागली. फरक होता तो केवळ नावापुरताच - नाममात्र! हे तिसरे बारसे. प्रथम 'वॉशिंग्टन कन्सेन्सस्', मग, 'स्ट्रक्चरल ॲडजस्टमेन्ट प्रोग्रॅम' आणि आता, 'फिस्कल कन्सॉलिडेशन'. आशय तोच, 'लेबल' काय ते निराळे!

'राजकोषीय दृढीकरणांसाठी ज्या धोरणप्रणालीचा पुरस्कार केला जातो ती सगळी धोरणे स्वरूपत: 'राजकोषीय'च होत. सरकारी तिजोरीतील तूट कमी करणे तसेच/आणि शासनसंस्थेच्या माथ्यावरील कर्जांचा बोजा हलका करणे, हाच त्या धोरणांचा आद्य हेतू असतो. एक तर, महसुलाचे स्रोत वाढविणे अथवा बळकट करणे किंवा/आणि शासनसंस्थेच्या खर्चाचे सुसूत्रीकरण घडवून आणत असतानाच सरकारी खर्चाची गुणवत्ता सुधारणे या दोन्ही पर्यायांचा अंगीकार इथे अपेक्षित असतो आणि अभिप्रेतही. सरकारी खर्चाला कात्री लावणे, वेतनखर्च गोठविणे अथवा सरकारच्या महसुलाच्या सापेक्ष सरकारी खर्च आणि कर्जे यांचे व्यवस्थापन/नियमन करणे, अशा उपायांचा अंतर्भाव या प्रयत्नांमध्ये होतो अथवा केला जातो. काटकसरीचा पाठपुरावा करणाऱ्या अशा राजकीय धोरणांच्या पुरस्कर्त्यांच्या दाव्यानुसार त्या धोरणांचे सकारात्मक परिणाम अनुभवास येतात. वित्तीय दृढीकरणाचा अंगीकार करण्याने अर्थव्यवस्थेतील कर्जांचे स्थिरीकरण साधले जाते, वित्तीय शिस्त राखण्याबाबतच्या सातत्यशीलतेचे भरणपोषण होते, शासनसंस्था जारी करत असलेल्या कर्जरोख्यांच्या पतमानांकनाबाबतचा धनकोंचा तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणुकदारांचा विश्वास सुदृढ बनतो. परिणामी, अमंळ मऊ व्याजदरांनी कर्जे मिळण्याच्या शक्यता उजळ बनतात.

ज्या हेतूने काटकसरीच्या राजकीय धोरणांचा अंगीकार केला जातो ती उद्दिष्टे त्यांमुळे साध्य होतात अथवा नाही, यांबद्दल अभ्यासकांमध्ये जसे तात्त्विक मतभेद

नांदतात त्याचप्रमाणे या संदर्भातील वास्तवदेखील त्याबाबत एकमुखी निर्वाळा देत नाही. मुख्य अडचण आहे ती हीच व इथेच. २००८ सालानंतर अवतरलेल्या वित्तीय अरिष्टाचा सामना करण्यासाठी ज्या युरोपीय देशांनी काटकसरीची जी जी म्हणून राजकीय धोरणे कठोरपणे राबविली त्यांचा या संदर्भातील अनुभव मात्र अजिबातच प्रोत्साहक आणि उमेद वाढविणारा नाही. मुख्य म्हणजे, काटकसरीची धोरणे राबविण्यासाठी जी कार्यपद्धती अंमलात आणली जाते तिचे भलेबुरे परिणाम कसे आणि कोणावर घडून येतात, ते अभ्यासणे या संदर्भात अतिशय कळीचे ठरते. ज्या ज्या देशांमध्ये काही काळ काटकसरीची धोरणे अवलंबिली गेली तिथे त्यांचे प्रतिकूल परिणाम बहुश: घडून आले ते समाजव्यवस्थेतील तुलनेने दुर्बल घटकांवरच. सरकारी तूट आटोक्यात राखण्यासाठी सरकारी खर्चाला कात्री लावली जाते तेव्हा प्रथम कुऱ्हाड चालवली जाते ती शिक्षण, आरोग्य, निवृत्तिवेतनासारख्या बाबींसाठी केल्या जाणाऱ्या तरतुदींवर. दुसरीकडे, सरकारी नोकरभरतीलाही पायबंद बसतो. महागाईला आळा घालण्यासाठी अवलंबलेल्या कठोर पैसाधोरणापायी व्याजदर वाढतात. त्याचा परिणाम नवीन गुंतवणुकीवर संभवतो. एकंदर महागाईपायी उत्पादन खर्च वाढू लागला की, काटकसरीचा उपाय म्हणून कॉर्पोरेट विश्व कामगार कपातीचा पर्याय अवलंबते अथवा रोजगारांच्या कंत्राटीकरणाकडे वळते. परिणामी, बेरोजगारी आणि पगारकपात यांचा दुहेरी घाला कष्टकरी वर्गावर पडतो. कामावरून कमी केलेले मनुष्यबळ अर्थव्यवस्थेत अन्यत्र शोषले जाईल, ही सैद्धान्तिक उपपत्ती बहुतेकदा कागदावरच राहते. शासनसंस्थादेखील काटकसरीच्या धोरणाचा पाठपुरावा करतेवेळी सामाजिक सुरक्षेचे छत्र विरळ करण्याकडे वळते. ऊर्जा, अन्न, खते यांसारख्या जिनसांवर दिली जाणारी अनुदाने शासनसंस्था मग सूक्ष्मदर्शक भिंगाखाली धरते.

काटकसरीच्या धोरणांचा रोख ज्या वेळी महसूल वाढवून तूट घटविण्याकडे राहतो त्या वेळीदेखील भरडले जातात ते समाजातील आर्थिकदृष्ट्या तुलनेने दुर्बल घटकच. महसूल वाढविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून एक तर नवनवीन कर अंमलात आणले जातात अथवा अस्तित्त्वात असणाऱ्या करदरांची फेररचना करण्यात येते. करप्रणालीमधील सवलतींना फाटा दिला जातो. पूर्वापार लागू असलेल्या करांचा पाया विस्तारण्याचे प्रयत्न मग शासनसंस्था हाती घेते. परिणामी, सर्वसामान्यांच्या खिशावर करभरण्याचा ताण वाढतो. म्हणजे, सरकारी तूट मर्यादेत राखण्यासाठी, शासनसंस्थेच्या माथ्यावरील कर्जांचा डोंगर वाढून हाताबाहेर परिस्थिती जाऊ नये यासाठी राजकीय पातळीवर ज्या वेळी काटकसरीची वित्तीय धोरणे

अवलंबिली जातात त्या वेळी त्यांचा मुख्य फटका बसतो तो समाजव्यवस्थेतील असंघटित, तुलनेने दुर्बल आणि बहुश: आर्थिक व वित्तीयदृष्ट्या दोलायमान (व्हल्नरेबल) राहणीमान पदरी आलेल्या घटकांनाच.

त्यांमुळे, काटकसरीची धोरणप्रणाली ही केवळ वित्तीय आणि म्हणून समाजजीवनाच्या आर्थिक अंगांपुरतीच सीमित बाब उरत नाही. तिचे सामाजिक आणि पर्यायाने राजकीय परिणामदेखील नजरेआड करता येत नाहीत. शासनसंस्थेच्या वित्तीय व्यवहारांना काही एक शिस्त लावून सरकारी तूट व कर्जांचा भार आटोक्यात राखण्यासाठी काटकसरीच्या धोरणांचा अवलंब करावा की अन्य काही पर्याय योजावेत यांबद्दल अभ्यासकांच्या विश्वात मतैक्याचा अभाव आढळून येतो त्यांमागील कारणदेखील हेच!

### ‘अर्थबोधपत्रिके’च्या या अंकातील लेखांचे संदर्भस्रोत


- गर्गे, स. मा. (संपादक) : भारतीय समाजविज्ञान कोश, खंड ३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८९, पृ. क. ४०८-४०९.
- गोडबोले, म. शं. : अनुभवामृत, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९८३.
- जोशी (पं.), महादेवशास्त्री (संपादक) : भारतीय संस्कृतिकोश, खंड ९, संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९७६, पृ. क्र. ५४४-५४५.
- दांडेकर, शं. वा. : श्रीज्ञानेश्वरी, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९५३.
- दीक्षित, राजा (संपादक, द्वितीयावृत्ती): प्रार्थनासमाजाचा इतिहास, मूळ लेखक व संपादक - द्वारकानाथ गोविंद वैद्य, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई, २०१९, पृ. क्र. - ४७१-४८१, ५१९-५२५.
- मोरे (डॉ.), सदानंद: इये मराठीचिये नगरी, सकाळ प्रकाशन, पुणे, २०२४.
- वैद्य, द्वारकानाथ गोविंद (संपादक): प्रपन्नप्रलपित अथवा रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें, मुंबई वैभव प्रेस, मुंबई, आवृत्ति चौथी, १९३०.
- शिंदे (डॉ.), रूपाली: न व्हावे उदास : समतेचा सत्तासंवाद, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे, २०२५.
- श्रीतुकारामबावांच्या अभंगांची गाथा, संचालक, शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री, मुंबई, १९७३.
- Chopra, Sanjeev : The Great Conciliator : Lal Bahadur Shastri and the Transformation of India, Bloomsbury, India, New Delhi, 2025.
- Matthijs, Matthias : What Does France’s Political Instability Mean for Europe ?, Council on Foreign Relations, December 17, 2024.
- Phelan, John : The Economic Roots of France’s Political Collapse, The Daily Economy, December 12, 2024.
- Vanharn, Erik-Jan : France’s Public Debt : Can Macron Change Course ?, rabobank.com/knowledge/d011425335.
- Hurst, Alexander : France has a massive debt crisis. So why is it spending billions a year subsidising business?, theguardian.com/commentisfree/2025/sep/02.

# स्मरण

## ऋजू परंतु खंबीर नेतृत्त्वाचे वेधक जीवनदर्शन

काळाच्या पडद्याआड जाऊन प्रदीर्घ काळ उलटून गेला तरी ज्यांच्या मृत्युभोवती दाटलेले गूढाचे पटल आजही विरळ झालेले नाही असे आपल्या इतिहासातील दोन महापुरूष म्हणजे– नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्वतंत्र भारताचे दुसरे *(पंडित नेहरू यांच्या देहावसानानंतर पंतप्रधानपद सांभाळलेल्या गुलझारीलाल नंदा यांची हंगामी पंतप्रधानपदाची कारकीर्द जमेस धरली तर तिसरे)* पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री. त्यांपैकी नेताजींवर इंग्रजीमध्ये तर खूपच लेखन–संशोधन झालेले आहे. मराठीमध्ये त्या मानाने खूपच कमी काम नेताजींवर झालेले असले तरी अगदीच काही लेखन झालेले नाही, असेही नाही. परंतु, शास्त्रीजींचे मात्र तसे नाही. पाठ्यपुस्तकातील धड्यांव्यतिरिक्त शास्त्रीजींचा उल्लेख झालाच तर फार तर २ ऑक्टोबर या त्यांच्या जन्मदिवशी होतो. मात्र, शास्त्रीजींचे ग्रह तसे कठोरच म्हणायला हवेत. कारण, २ ऑक्टोबर हा राष्ट्रपिता महात्माजींचाही जन्मदिवस असल्यामुळे सगळा झोत स्थिरावतो तो महात्मा गांधीजींवरच. शास्त्रीजींच्या पंतप्रधानकीबाबतही, योगायोगाने, तसेच काहीसे होते. पंडित नेहरू यांच्या निधनानंतर १९६४ सालातील जून महिन्याच्या अगदी प्रारंभीच शास्त्रीजींकडे पंतप्रधानकीची धुरा आली आणि जेमतेम दीडएक वर्ष उलटते न उलटते तोच १९६६ सालातील जानेवारी महिन्याचा पहिला पंधरवडा उलटायच्या आतच शास्त्रीजींचे देहावसान झाले. त्या नंतर पंतप्रधानपदी आल्या इंदिरा गांधी. १९४७ सालापासून पंडित नेहरू सलग १७ वर्षे पंतप्रधानपदी राहिले. सरत्या ब्रिटिश अमदानीत,१९४६ साली स्थापन करण्यात आलेल्या हंगामी सरकारमध्येही पंतप्रधान तेच होते. त्यांमुळे, तिथपासूनचा काळ धरला तर जवळपास दीड तप पंडितजींनी पंतप्रधानपदाची जबाबदारी समर्थपणे पेलली. शास्त्रीजींच्या देहावसानानंतर १९६६ साली सत्ता स्वीकारलेल्या इंदिराजी त्या नंतर सलग ११ वर्षे, म्हणजे, १९७७ सालापर्यंत पंतप्रधानपदावर कार्यरत

राहिल्या. पंडित नेहरू यांच्यासारख्या वैश्विक पटलावर करिष्मा कमावलेल्या उत्तुंग नेत्याची १८ वर्षांची कारकीर्द आणि त्या नंतर इंदिराजींनी गाजवलेली ११ वर्षांची वादळी कारकीर्द यांच्या सापटीत शास्त्रीजींची १ वर्ष ७ महिन्यांची पंतप्रधानकी पुरती लोपूनच गेली. परिणामी, 'जय जवान, जय किसान' या घोषणेपुरतीच शास्त्रीजींची स्मृती आज उरलेली आहे, असे म्हणले तर ते वास्तवाला सोडून होणार नाही, इतके शास्त्रीजी आता विस्मृतीच्या गर्तेत लोटले गेलेले आहेत. शास्त्रीजींचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व यांवर चढलेले विस्मृतीचे ते दाट पटल विरळ करण्याचे अतिशय स्तुत्य कार्य संजीव चोप्रा यांनी त्यांच्या 'द ग्रेट कन्सिलिएटर : लाल बहादूर शास्त्री ॲन्ड द ट्रान्सफॉर्मेशन ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या माध्यमातून केलेले आहे.

शास्त्रीजींच्या या चरित्रग्रंथाची कहाणीदेखील मोठी रोचक आहे. भारतीय प्रशासन सेवेमध्ये पुरी तीन तपांची प्रदीर्घ सेवा बजावून निवृत्त झालेल्या संजीव चोप्रा यांच्याकडे निवृत्तीपूर्वी मसुरी येथील 'लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी'च्या संचालकपदाची धुरा सोपविण्यात आलेली होती. लोकशाही राज्यव्यवस्थेचा दुसरा स्तंभ गणल्या जाणाऱ्या प्रशासकीय सेवेसाठी सक्षम अधिकारी निर्माण करणाऱ्या या संस्थेचे ग्रंथालय तितकेच सुसज्ज असावे, हे वेगळे सांगायची गरज नाही. परंतु, गंमत म्हणा अथवा विरोधाभासी विस्मयकारक बाब म्हणा, सुमारे दोन लाखांहून अधिक ग्रंथसंपदा असलेल्या त्या ग्रंथालयात, ज्यांचे नाव संस्था अभिमानाने मिरवते त्या शास्त्रीजींच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या ग्रंथांची संख्या एका डझनाच्या आतबाहेरच असावी, याचा धक्का संचालकपदाची सूत्रे नव्यानेच हाती घेतलेल्या चोप्रा यांना बसला. पंडित नेहरू यांच्या पश्चात देशाचे पंतप्रधानपद भूषविलेल्या शास्त्रीजींच्या जीवनदर्शनासंदर्भात चोप्रा यांच्या मनीमानसी खुपलेली ती अनास्थाच या चरित्रग्रंथाची गंगोत्री ठरली.

संदर्भविपुलता हे चोप्रा यांनी सिद्ध केलेल्या या चरित्रग्रंथाचे आगळे वैशिष्ट्य ठरते. शास्त्रीजींच्या प्रत्यक्ष सहवासात व संपर्कात आलेल्या व्यक्तींनी टिपून ठेवलेल्या त्यांच्या आठवणी, शास्त्रीजींचा पत्रव्यवहार, पंडित नेहरू यांच्याबरोबर झालेला शास्त्रीजींचा पत्रसंवाद, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय पुराभिलेखागारात उपलब्ध असणारी शास्त्रीजींविषयक कागदपत्रे व दस्तऐवज, संसदेच्या सभागृहांत शास्त्रीजींनी केलेल्या भाषणांचे शब्दांकन, काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकांदरम्यान झालेल्या चर्चांची शब्दरूपे, ठिकठिकाणच्या ग्रंथालयांत शास्त्रीजींसंदर्भात उपलब्ध असणारे संदर्भ, नवी दिल्ली येथील लाल बहादूर शास्त्री स्मृती मंदिरातील उपलब्ध तपशील,

शास्त्रीजींच्या चिरंजीवांसह अन्य कुटुंबियांबरोबरच्या भेटींदरम्यानच्या चर्चा... अशांसारख्या विविध स्त्रोतांद्वारे संकलित केलेल्या तपशीलांचा कशिदा भरून चोप्रा यांनी शास्त्रीजींच्या चरित्रग्रंथाचा पट रंगविलेला आहे. ग्रंथातील प्रत्येक प्रकरणाला विस्तृत टीपा जोडून अन्य बारीकसारीक खुलासे व पूरक माहितीचे सादरीकरण करण्यात लेखकाचा साक्षेप ठळकपणे प्रतीत होतो. अशा व इतक्या मेहनतीने तयार केलेले ग्रंथ मराठी भाषेमध्ये त्या मानाने फारसे दिसत नाहीत, याचा खेद वाटल्याखेरीज मग राहात नाही.

शास्त्रीजींचा जीवनप्रवास आणि त्यांची जडणघडण या संदर्भातील आपली माहिती किती तोकडीच केवळ नव्हे तर तुटपुंजी आहे, याचा साक्षात्कार या चरित्रग्रंथाचे अंतरंग आपल्याला घडवते. शास्त्रीजींची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांचे बालपण, बालवयात त्यांच्यावर झालेले संस्कार, ते संस्कार घडविण्यास कारणभूत ठरलेली परिस्थिती व व्यक्तिमत्वे, पारदर्शकता-विनयशीलता-सलोखाप्रियता-नैतिकता-ऋजुता हा मूल्यसंचय शास्त्रीजींच्या जीवनव्यवहारात ज्या प्रक्रियेद्वारा घडून आला ती सारी प्रक्रिया, प्रथम 'सर्व्हन्टस् ऑफ द पीपल सोसायटी' व पुढे काँग्रेसच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांचा घडून आलेला सहभाग, लोकव्यवहारात सक्रिय असतानाची त्यांची कार्यशैली, काँग्रेस पक्षाच्या व्यवस्थेत त्यांचे बदलत गेलेले महत्त्व, काँग्रेस पक्षाच्या पंडित नेहरू यांच्यासह यच्चयावत वरिष्ठ नेतृत्वाचा विश्वास संपादन करणारी त्यांची निरलस कामकाजपद्धती, पंडित नेहरू यांच्या पश्चात सत्तेचे संकम्रण घडून येत असताना काँग्रेस पक्षांतर्गत रंगलेले नाट्य... अशा कशा कशाचाच तपशील आपल्याला ज्ञात नसतो. पंतप्रधानकीची वस्त्रे परिधान केल्यानंतर देशांतर्गत संस्थात्मक व्यवस्थेमध्ये शास्त्रीजींच्या पुढाकाराने घडून आलेले महत्त्वाचे बदल तर आपल्या गावीही नसतात. शास्त्रीजींसंदर्भातील आकलनाचा इतक्या वर्षांचा मोठा अनुशेष या ग्रंथामुळे भरून निघतो. चोप्रा यांनी इथे नमूद केलेल्या असंख्य प्रसंगांद्वारे शास्त्रीजींचेच केवळ नव्हे तर त्यांच्या एकंदर कुटुंबाचेच आपल्या पुढ्यात उभरणारे चित्र अतिशय मननीय आणि मोहक आहे.

अगदी बालपणापासूनच, जीवनाचा बहुतांश काळ, शास्त्रीजी आणि त्यांच्या कुटुंबियांनी आर्थिक ओढगस्तीच्या परिस्थितीतच व्यतीत केला. कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी न लाभलेल्या अतिशय सामान्य परिस्थितीतील हा मुलगा पुढे या खंडप्राय देशाचे पंतप्रधानपद भूषवेल असे भविष्य कोणी तेव्हा केले असते तर भविष्यकर्त्यालाच लोकांनी वेड्यात काढावे, अशी त्या संपूर्ण कुटुंबाची तेव्हा

परिस्थिती होती. परंतु, शास्त्रीजींचे एकंदर जीवनच, एका अर्थाने, योगायोगांनी नटलेले राहिले. अंगावर शहारा उभा राहावा अशा एका दिव्यातून नवजात लाल बहादूर सहीसलामत बाहेर पडले ते दैव बलवत्तर होते म्हणूनच केवळ. शारदाप्रसाद आणि रामदुलारी या कायस्थ दांपत्याच्या पोटी लाल बहादूर यांचा २ ऑक्टोबर १९०४ रोजी मुगलसराय (आजचे दीनदयाळ उपाध्याय नगर) येथे जन्म झाला. त्यांच्या आजोबांचे नाव मुन्शी हजारीलाल. लाल बहादूर यांचा जन्म त्यांच्या आजोळी झाला त्या वेळी मुन्शी हजारीलाल मुगलसराय येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. लाल बहादूर यांचे वडील शारदाप्रसाद त्या वेळी अलाहाबाद (आजचे प्रयागराज) इथे शिक्षक म्हणून काम करत होते आणि त्यांनी नायब तहसिलदाराची परीक्षादेखील यशस्वीरीत्या पार केलेली होती.

लाल बहादूर यांच्या जन्मानंतर सुमारे दीड वर्ष शारदाप्रसाद व रामदुलारी अलाहाबाद येथे होते. लाल बहादूर जेमतेम एक महिन्याचे असताना त्यांना घेऊन त्यांचे आईवडील घाटावरील एका जत्रेला गेले. गर्दीमध्ये धक्का लागून रामदुलारी यांच्या कुशीतून लाल बहादूर निसटले. त्या नंतर उडालेल्या गोंधळात रामदुलारी यांना बाळाचा काही ठावठिकाणा लागेना. त्या अगदी हवालदील होऊन गेल्या. आपले अपत्य परत मिळेपर्यंत घाटावरून हालायचे नाही, असा निर्धार करून त्या तिथेच बसल्या. योग असा बळकट की, आईच्या हातातून निसटलेले लाल बहादूर त्या गर्दीत असलेल्या एका गुराख्याच्या हारावजा टोपलीत अलगद पडले. पोटी संतान नसलेल्या त्या गुराख्याला त्याच्या दुरडीत गवसलेले बाळ म्हणजे गंगामैय्याने त्याच्या प्रार्थनेला दिलेला प्रसादरूपी प्रतिसादच भासला. साहजिकच, सापडलेले बाळ परत करायला तो काही केल्या तयार होईना. परंतु, पोलिसांनी केलेला हस्तक्षेप आणि तो सारा प्रसंग डोळ्यांनी बघितलेल्या काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेला निर्वाळा यांमुळे लाल बहादूर पुन्हा त्यांच्या जन्मदात्या मातापित्यांच्या हवाली झाले! परंतु, तो आनंद शारदाप्रसाद फार काळ उपभोगू शकले नाहीत. नायब तहसीलदारपदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच, १९०६-०७ अशी दोन वर्षे पंजाब आणि संयुक्त प्रांतासह त्या भागात धुमाकूळ घालणाऱ्या प्लेगने त्यांचा बळी घेतला आणि वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षीच रामदुलारींना वैधव्य आले. गतधवा रामदुलारी आणि कैलाश देवी, लाल बहादूर व सुंदरी देवी या शारदाप्रसाद यांच्या तीन अपत्यांचा सांभाळ करण्यास सासरच्यांनी नकार दिल्यामुळे लाल बहादूर यांचे आजोबा मुन्शी हजारीलाल आपली मुलगी व तीन नातवंडे यांना मुगलसराय येथे

त्यांच्या घरी घेऊन आले. परंतु, दु:सह काळाने तिथेही पाठ सोडली नाही आणि अल्पावधीतच अर्धांगवायूच्या झटक्याने मुन्शी हजारीलालही देवाघरी गेले. मात्र, एकत्र कुटुंबपद्धतीची सद्दी असणाऱ्या त्या काळात रामदुलारी यांचे मुगलसराय येथे शिक्षकी पेशात असलेले चुलत बंधू बिंदेश्वरीप्रसाद यांनी आपली चुलत बहीण व तिच्या तीन अपत्यांची जबाबदारी पेलली. त्यांमुळे, जन्मानंतरची पहिली बारा वर्षे लाल बहादूर यांनी मुगलसराय येथे व्यतीत केली.

शुद्ध शाकाहाराचा संस्कार लाल बहादूर यांनी त्यांच्या आईकडून स्वीकारला. जन्मजातच जणू काही लाल बहादूर हे नीतीमत्तेचे पूजक होते. त्यांच्या बालमनाची रचना करणारे बारीकसारीक प्रसंग चोप्रा यांनी रोचक शैलीत सादर केलेले आहेत. लाल बहादूर यांचे मूळ आडनाव होते 'वर्मा.' आपल्या देशातील जात-वर्णप्रधान समाजव्यवस्थेत व्यक्तीचे आडनाव त्याचा वर्ण, जात आणि सामाजिक प्रतिष्ठा सूचित करत असते, या वास्तवाचा शोध आणि बोध लाल बहादूर यांना सहावीत प्रवेश करतेवेळी वयाच्या १३व्या वर्षी झाला. आपले आडनाव लावायचे नाही, असा निश्चय त्या टप्प्यावर त्यांनी जाहीर करून टाकला आणि निर्धाराने अमलातदेखील आणला. परिवारातील सर्वांच्या भुवया त्यांपायी उंचावल्या गेल्या परंतु लाल बहादूर हटले नाहीत. त्या नंतर काशी विद्यापीठाची पदवी पदरात पडेपर्यंत लाल बहादूर यांनी त्यांच्या नावापुढे आडनाव लावलेच नाही. काशी विद्यापीठातील पदवीशिक्षण पूर्ण केल्यानंतर 'शास्त्री' ही बहुमानवाचक जी उपाधी त्यांना बहाल करण्यात आली तीच त्यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत आपल्या नावापुढे धारण केली. साधी राहणी, सत्यप्रियता, समता आणि प्रेम ही मूल्ये लाल बहादूर यांना जणू काही वारसाहक्कानेच प्राप्त झाली होती. ती त्यांनी आयुष्यभर निष्ठापूर्वक जपलीदेखील. त्या मूल्यसंचयात राष्ट्रप्रेम या मूल्याची भर पडली ती लाल बहादूर पुढे बनारस येथील हरिश्चंद्र घाटावर असलेल्या हरिश्चंद्र हायस्कूल या शाळेत दाखल झाले तेव्हा. या शाळेतील निष्कामेश्वर मिश्र या मुख्याध्यापकांचा लाल बहादूर यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यात अतिशय महत्त्वाचा सहभाग राहिला. वाचनाची मुळातच गोडी असलेल्या लाल बहादूर यांनी निष्कामेश्वर मिश्र यांच्या समृद्ध अशा व्यक्तिगत ग्रंथसंग्रहाद्वारे वाचनाच्या कक्षा औरसचौरस विस्तारल्या. या सगळ्या काळात आर्थिक ओढगस्तीने मात्र त्यांची पाठ काही सोडली नाही. असे असूनही, पैशाचा लोभ लाल बहादूर यांच्या मनीमानसी कसा कधीच वसला नाही याची काही लोभसवाणी उदाहरणे चोप्रा यांनी या ग्रंथात नमूद केलेली आहेत.

बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी लाल बहादूर यांनी महात्मा गांधी यांना पहिल्यांदा बघितले १९१६ साली. त्या वेळी गांधीजींनी केलेले भाषण आणि पुढे पंजाबातील जालियानवाला बागेतील हत्याकांड या दोन घटनांचा लाल बहादूर यांच्या मनावर अतिशय सखोल कोरला गेलेला परिणाम चिरस्थायी ठरला. पुढे काशी विद्यापीठाची 'शास्त्री' ही पदवी प्राप्त केलेल्या लाल बहादूर यांच्या व्यक्तिमत्वावर काशी विद्यापीठाचे प्रवर्तक बाबू शिवप्रसाद गुप्ता यांचा पडलेला प्रगाढ प्रभाव त्यांच्या स्वभावाचा पोत पक्का करणारा ठरला. प्रखर मानवतावादी असणाऱ्या शिवप्रसाद गुप्ता यांच्या व्यक्तिमत्वाला समाजचिंतक, तत्वज्ञ असे अन्य पैलूही होते. भारतीय आध्यात्मिक प्रज्ञा आणि आधुनिक विज्ञान, परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम घडवून आणण्याच्या भूमिकेचा परिपोष बाबू शिवप्रसाद अतिशय हिरिरीने करत. त्यांच्या या समन्वयशील विचारपद्धतीचा सखोल ठसा लाल बहादूर यांच्या अंत:मनावर सघनपणे उमटला. किंबहुना, समन्वित विचार हा लाल बहादूर यांचा जणू स्थायिभावच बनला. हीच पुंजी त्यांना पुढे त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीमध्ये हाताशी आली. सत्य आणि ज्ञान या दोन बाबी समन्वयशीलच असायला हव्यात, विविध भूमिकांचा आणि दृष्टिकोनांचा सलोखाशील समन्वय साधण्यात सत्याला अपयश येत असेल तर त्याला 'सत्य' हे संबोधन प्रदान करताच येणार नाही, या बाबू शिवप्रसाद यांच्या जीवनदृष्टीची अमिट मुद्रा लाल बहादूर यांच्या विचारशैलीवर दृढपणे उमटली. पंडित जवाहरलाल नेहरू आणि पुरुषोत्तमदास टंडन यांच्यासारख्या परस्पर भिन्न वृत्तीच्या आणि बहुतांश राजकीय प्रश्नांच्याबाबतीत मतैक्याची शक्यता अणुमात्रही नसलेल्या दोन धुरीणांबरोबर काम करतेवेळी, बाबू शिवप्रसाद यांच्याकडून हस्तगत केलेली, परस्परविरोधी विचारप्रणालींचा समन्वय साधण्याची कलाच लाल बहादूर यांच्या कामाला पुढे आली. भूमिकांच्याबाबतीत एकमेकांच्या विरुद्ध टोकावर उभ्या असणाऱ्या या दोन महनीय व्यक्ती एकमेकांना धाडायची पत्रे लिहिण्यासाठी लाल बहादूर यांनाच पाचारण करत असत, ही एकच बाब शास्त्रीजींच्या सलोखाप्रिय आणि समन्वयकुशल कार्यपद्धतीचे अधोरेखन करण्यास पुरेशी आहे.

पुरुषोत्तमदास टंडन यांच्याशी घनिष्ठ अनुबंध निर्माण होण्याचा योग लाल बहादूर यांच्या जीवनात उगवला तो 'पंजाब केसरी' या पदवीने गौरविल्या जाणाऱ्या लाला लजपतराय यांनी १९२१ साली स्थापन केलेल्या 'सर्व्हन्टस् ऑफ द पीपल सोसायटी' या संस्थेत त्यांचा प्रवेश झाल्यापासून. पैसा, पद, प्रतिष्ठा या कशाचाही मोह न धरता

देशसेवेसाठी जीवन अर्पित करणारी देशसेवकांची फळी निर्माण करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून 'सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी' ही संस्था स्थापन करणाऱ्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचा आदर्श लाला लजपतराय यांच्या पुढ्यात 'सर्व्हन्टस् ऑफ द पीपल सोसायटी' ही संस्था स्थापन करताना होता. या संस्थेचे काम पुढे नेण्यासाठी समर्पित कार्यकर्त्यांच्या शोधात लाला लजपतराय काशी विद्यापीठात येऊन डॉ. भगवानदास यांना भेटते झाले. लाला लजपतराय ज्या पिंडप्रकृतीच्या देशसेवकांच्या शोधात होते ती सारी गुणवैशिष्ट्ये लाल बहादूर यांच्या ठायी असल्यामुळे डॉ. भगवानदास यांनी त्यांची शिफारस लाला लजपतराय यांच्याकडे केली आणि शास्त्रीजी 'सर्व्हन्टस् ऑफ द पीपल' या संस्थेत दाखल झाले. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर 'सर्व्हन्टस् ऑफ द पीपल सोसायटी' या संस्थेची धुरा पुरुषोत्तमदास टंडन यांच्याकडे गेली. अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर टंडन यांनी संस्थेचे मुख्यालय लाहोरहून हलवले अलाहाबादला. शास्त्रीजी आणि पुरुषोत्तमदास टंडन यांचा अनुबंध त्यांमुळे अधिकच निकट बनला. बारीकसारीक तपशीलांच्या नोंदणी, पत्रांचे अथवा अहवालांचे मसुदे तयार करणे, दस्तऐवजीकरण, विविध मतप्रणालीच्या समाजघटकांशी संवाद साधून त्यांची मतमतांतरे शांतपणे ऐकून घेणे ही शास्त्रीजींच्या ठायी असणारी अवघी गुणसंपदा मनावर ठसल्याने अल्पावधीतच ते पुरुषोत्तमदास टंडन आणि जवाहरलाल नेहरू यांच्या विश्वासास पात्र ठरले. पुढे स्वातंत्र्याच्या चळवळीत थेट सहभाग झाल्यापासून शास्त्रीजींच्या तुरुंगवासाचे सत्रही यथावकाश अवतरले. तिथूनच काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत वर्तुळात लाल बहादूर शास्त्री यांचा प्रवेश या सगळ्या प्रक्रियेद्वारे क्रमाक्रमाने पुढे कसा झाला तो सारा प्रवास लेखकाने या ग्रंथात साधार व वाचनीय शैलीत रेखाटलेला आहे.

जवाहरलाल नेहरू यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचा विश्वास शास्त्रीजींनी संपादन केला तो त्यांच्या अंगभूत गुणांमुळे. पारदर्शक निरलसता, निर्मोही वृत्ती, तळागाळातील कार्यकर्ते व पक्ष संघटनेतील पदाधिकारी यांच्याशी थेट संपर्क, अफाट व अखंड भ्रमंती, जन्मजात ऋजुता, संयम, समन्वयशील स्वभाव, परस्परविरोधी मते शांतपणे ऐकून घेण्याची तितिक्षा ...हा शास्त्रीजींच्या ठायी वसणारा गुणसमुच्चय ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीदरम्यानची सर्वांत मोठी व महत्त्वाची पुंजी ठरत राहिली. शास्त्रीजी आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक हलाखीचा मुकाबला मात्र त्या संपूर्ण काळात जवळपास सततच करत राहावा लागला. विशेषतः, शास्त्रीजींच्या तुरुंगवासादरम्यानच्या काळात ज्या आर्थिक विवंचनांना त्यांचे कुटुंबीय सामोरे जात

होते त्यांचे या ग्रंथातील तपशील वाचल्यानंतर पोटात कालवल्याखेरीज राहात नाही.

डॉ. राजेन्द्रपसाद हे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष असताना जवाहरलाल नेहरू हे उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्याच वेळी त्यांच्या पत्नी कमला नेहरू या स्वित्झर्लंड येथे उपचाराधीन होत्या. त्या कठीण पर्वादरम्यान एका सक्षम सहकाऱ्याची गरज भासल्याने नेहरू यांनी शास्त्रीजींना लखनौ येथे पाचारण केले आणि उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीच्या महासचिवपदी त्यांची नियुक्ती केली. शास्त्रीजी त्या वेळी होते अवघ्या ३१ वर्षांचे. काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत व्यवस्थेत शास्त्रीजींचा पुढे जो सतत ऊर्ध्वगामी प्रवास होत राहिला त्याचा हा एक प्रकारे आरंभबिंदूच ठरला. प्रदेश काँग्रेसचे महासचिव या नात्याने काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षांशी जसा त्यांचा निकट संपर्क येऊ लागला तसाच उत्तर प्रदेश काँग्रेसच्या गोविंदवल्लभ पंत, रफी अहमद किडवई, संपूर्णानंद, चंद्रभान गुप्ता यांसारख्या वजनदार नेत्यांशीही त्यांचा संवाद घडू लागला. त्या जबाबदाऱ्यांचा एक भाग म्हणून उत्तर प्रदेशातील शेती, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी काय केले पाहिजे यांबाबत शिफारसी करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. पुरुषोत्तमदास टंडन अध्यक्ष असलेल्या त्या समितीचे सदस्य सचिव म्हणून शास्त्रीजींची नेमणूक करण्यात आली. त्या समितीने जो अभ्यास हाती घेतला त्यांद्वारे देशातील शेतीप्रश्नाच्या अनेकानेक कंगोऱ्यांचा निकट परिचय शास्त्रीजींना घडून आला. विस्तृत अशा प्रश्नावलीच्या आधारे संकलित केलेल्या क्षेत्रीय सांख्यिकीच्या विश्लेषणावर आधारित अतिशय मेहनतीने तयार करण्यात आलेल्या त्या संशोधनपूत अहवालाद्वारे शेतीसंदर्भातील जे आकलन शास्त्रीजींच्या ठायी बिंबले ती सारी प्रगल्भता पुढे त्यांच्या पंतप्रधानकीच्या कारकिर्दीत प्रवर्तित करण्यात आलेल्या हरित क्रांतीच्या व धवल क्रांतीच्या बीजारोपणात प्रतिबिंबित झाली.

शास्त्रीजींच्या जीवनाचा हा सगळाच तपशील या ग्रंथाद्वारे प्रथमच वाचकांच्या पुढ्यात येतो आहे. १९३५ च्या कायद्यानुसार देशात प्रांतिक सरकारे अस्तित्त्वात आल्यानंतर उत्तर प्रदेशमध्ये झालेल्या निवडणुकीत शास्त्रीजी फुलपूर मतदारसंघातून निवडून आले. गोविंदवल्लभ पंत यांच्या नेतृत्वाखालील त्या सरकारने आपल्या कार्यकाळात जारी केलेल्या कुळ कायद्याच्या निर्मितीमध्ये शास्त्रीजींची भूमिका कळीची राहिली. प्रांतिक सरकारे बरखास्त झाल्यानंतर शास्त्रीजींनी स्वत:ला पुन्हा कामाला जुंपून घेतले. सततचे काम, पुरेशा विश्रांतीचा अभाव, आर्थिक ओढग्रस्त, पायाला लागलेली भिंगरी, खाण्यापिण्याची आबाळ या सगळ्याची अखेर परिणती

शास्त्रीजींना प्लुरसीचा जबरदस्त त्रास होण्यात घडून आली. तो दणका इतका प्रखर होता की शास्त्रीजींना तब्बल तीन दिवस बोलतादेखील येत नव्हते. त्या वेळी ते होते ३६ वर्षांचे. बनारसमधील रुग्णालयात त्यांना दाखल केले त्या वेळी त्यांचे कुटुंब होते अलाहाबाद येथे. शास्त्रीजींच्या गंभीर आजाराची वार्ता कळल्यानंतर अलाहाबाद येथून बनारसला जाण्यासाठी लागणाऱ्या तिकिटाचे पैसेदेखील त्यांच्या पत्नीपाशी नव्हते. अखेर, पुरुषोत्तमदास टंडन यांनी शास्त्रीजींची पत्नी, चार मुले आणखी त्यांचा एक शेजारी यांच्या प्रवासाची सोय केल्यानंतर ते सारे शास्त्रीजींपाशी बनारस येथे पोहोचू शकले.

लहानपणापासून पाठ न सोडणारी आर्थिक हलाखी, कमालीची संवेदनशील आणि स्वाभिमानी मनोरचना, अविश्रांत धडपड, अपुरा आणि असंतुलित आहार, कामाच्या दबडग्यापायी वेळेवर जेवणखाण होण्याची हेळसांड या सगळ्यांपायी शास्त्रीजींची प्रकृती कायम नाजूकच राहिली. त्यांतच त्यांचा अतिशय ऋजू स्वभाव, वर्तनातील मार्दवशीलता, कमालीचा संयम, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी मनाचे संतुलन ढळू न देण्याचे कौशल्य आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे परस्परविरोधी मतमतांतरांचा समन्वय घडवून आणण्याची सलोखाप्रियता यांपायी, कसोटीच्या प्रसंगी ही व्यक्ती कठोर निर्णय घेऊ शकेल अथवा नाही, अशी आशंका काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ वर्तुळातील जवळपास सगळ्यांनाच सतत वाटत असे. परंतु, शास्त्रीजींची कृश दिसणारी बटुमूर्ती, वेळ येईल तेव्हा, किती खंबीर व दृढनिश्चयी बनत असे याची एक चुणूक, पुढे, १९६४ साली उद्भवलेल्या हजरतबाल दर्ग्याच्या समस्येदरम्यान दिसून आली. त्या वेळी, शास्त्रीजींचा समावेश नेहरू यांच्या मंत्रिमंडळात 'बिनखात्याचे मंत्री' म्हणून करण्यात आलेला होता. कामराज यांनी मांडलेल्या योजनेनुसार, त्या पूर्वी, केंद्रीय मंत्रिमंडळातील गृह खात्याच्या मंत्रिपदाचा राजीनामा देऊन शास्त्रीजींनी पक्षसंघटनेच्या कामाला स्वत:ला वाहून घेतलेले होते. वास्तविक पाहता, कामराज योजनेनुसार जे मंत्री पायउतार होणार होते त्या यादीत शास्त्रीजींचे नाव नव्हते. परंतु, जी गोष्ट आपण स्वत: अंमलात आणत नाही तिचा उपदेश दुसऱ्यांना करण्याचा अधिकार आपल्याला नसतो, या तत्त्वाला जागून शास्त्रीजींनी स्वत: होऊनच गृहमंत्रीपदाचा राजीनामा सादर केला.

शास्त्रीजींचे कौटुंबिक तसेच व्यक्तिगत जीवन किती साधे होते याचे उत्कट दर्शन या ग्रंथातील काही प्रसंग प्रकर्षाने घडवतात. केंद्रीय गृहमंत्रीपदाचा राजीनामा सादर करून मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यानंतर कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये जो एकदम

बदल घडून आला त्याला शास्त्रीजी आणि त्यांचे सगळेच कुटुंबीय सहज सामोरे गेले. त्या काळात आपल्या एका सहकाऱ्याची गाडी त्यांत स्वखर्चाने इंधन घालून ते वापरत होते. केवळ इतकेच नाही तर, सरकारी बंगला खाली केल्यानंतर, परवडेल अशाच लहान घराच्या शोधात आपण असल्याचेही ते एका सुहृदाला लिहिलेल्या पत्रात नमूद करतात. याहीपेक्षा अंत:करणाला भिडणारा आणखी एक तपशील शास्त्रीजींनी त्या काळात एका परिचिताला लिहिलेल्या पत्रात आपल्याला सापडतो. मंत्रिपदाचा त्याग केल्यानंतर निर्माण झालेल्या आर्थिक तंगीला सामोरे जाताना कुटुंबातील सगळ्यांनीच स्वत:चे कपडे स्वत:च धुण्याचा परिपाठ स्वीकारल्याचे शास्त्रीजी लिहितात. केवळ इतकेच नाही तर, रोजच्या जेवणातील एक भाजी कमी करण्याबरोबरच आहारातील दुधाची मात्रादेखील घटविण्यात आल्याचे ते नमूद करतात. आपल्या पत्नीची निरलस आणि खंबीर साथ असल्यामुळेच या परिस्थितीला तोंड देण्याचे धैर्य मला लाभते, असेही शास्त्रीजी प्रांजळपणे तिथे विदित करतात.

रेल्वेच्या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून शास्त्रीजींनी सादर केलेला मंत्रिपदाचा राजीनामा, त्यांची पंतप्रधानकीची कारकीर्द, हरित क्रांती आणि राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाची निर्मिती, कृषी मूल्य निर्धारण आयोग आणि भारतीय अन्न महामंडळाची निर्मिती, पाकिस्तानला त्यांनी दिलेले चोख प्रत्युत्तर, 'जय जवान, जय किसान' ही त्यांची प्रेरक घोषणा, ताश्कंद करार... या साऱ्या बाबी त्या मानाने ज्ञात आहेत. परंतु, या सगळ्याच्याही पलीकडे असणारे शास्त्रीजी आपल्या पुढ्यात शब्दरूपाने सादर करणे, हे या चरित्रग्रंथाचे सर्वांत आगळे वैशिष्ट्य होय!

*(टीप : २ ऑक्टोबर १९०४ हा लाल बहादूर शास्त्री यांचा जन्मदिवस. काळाच्या हिशेबाने, त्यांमुळे, २ ऑक्टोबर २०२५ हा ठरतो लाल बहादूर शास्त्री यांचा १२१ व्या जयंतीदिन. त्याचे औचित्य साधून, संजीव चोप्रा यांनी लिहिलेल्या शास्त्रीजींच्या चरित्रग्रंथाचा परिचय करून देणारा 'अर्थबोधपत्रिके'च्या संपादकाने लिहिलेला हा पूर्व प्रकाशित लेख या ठिकाणी पुनर्प्रकाशित केलेला आहे. : पूर्व प्रकाशन ''रयत'', ऑगस्ट २०२५, वर्ष १, अंक ४, पृ. क्र. ६०-६७)*

# राजकारण

## विस्कटलेले अर्थकारण फ्रान्समधील राजकारणाच्या मुळावर...

गेली सुमारे साडेतीन वर्षे फ्रान्सचे राजकारण अस्थिरतेच्या भोवऱ्यात गुरफटलेले आहे. १६ मे २०२२ ते ६ ऑक्टोबर २०२५ या अवघ्या ३७ महिन्यांच्या काळात फ्रान्सने सहा पंतप्रधानांची राजवट अनुभवली. त्यांपैकी २१ महिन्यांनी तर पाच पंतप्रधानांची राजवट पाहिली. या सहांपैकी Jean Castex आणि Elisabeth Borne अशा दोघांची अनुक्रमे १ वर्ष २७० दिवसांची (३ जुलै २०२० ते १६ मे २०२२) आणि १ वर्ष २३८ दिवसांची (१६ मे २०२२ ते ९ जानेवारी २०२४) राजवट वगळली तर, Elisabeth यांच्यानंतर पंतप्रधानपदी विराजमान झालेल्या चारांपैकी एकालाही पुरे एक वर्षदेखील सत्ता राबविता आल्याचे दिसत नाही. सगळ्यांत कमाल झाली ती Sebastien Lecornu यांच्याबाबतीत. त्यांचा कार्यकाल ठरला अवघ्या २७ दिवसांचा! ९ सप्टेंबर २०२५ या दिवशी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती पेललेले Sebastien Lecornu ६ ऑक्टोबर २०२५ रोजी पदावरून पायउतार झाले. त्यांतही, गंमत म्हणजे, आपल्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाची अधिकृत घोषणा केल्यानंतर अवघ्या १२ तासांच्या आतच पंतप्रधानपदाचा राजीनामा त्यांनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांच्याकडे सुपूर्त केला. मंत्रिमंडळाची रचना पूर्ण करून त्याची अधिकृत घोषणा Sebastien Lecornu यांनी केली आणि तिथेच मतभेदाची ठिणगी पडली. Sebastien Lecornu यांच्या मंत्रिमंडळाच्या जडणघडणीबाबत, त्यांच्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या अति-उजव्या आणि अति-डाव्या अशा दोन्ही पक्षांना तीव्र असमाधान व आक्षेप होते. Sebastien Lecornu यांनी त्या संदर्भात काहीच केले नाही तर सरकार अल्पमतात आणून ते पाडण्याची धमकी डाव्या आणि उजव्या पक्षांनी उघड दिलेली होती. त्यांमुळे, अखेर, आपल्या पदाचा (आणि पर्यायाने) आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्याचे पाऊल Sebastien Lecornu यांनी उचलले.

या आधी, म्हणजे २०२४ सालातील डिसेंबर महिन्यात फ्रान्सचे तत्कालीन पंतप्रधान Michel Barnier यांनाही केवळ ९० दिवसांतच (५ सप्टेंबर २०२४ ते १३ डिसेंबर २०२४) पदत्याग करावा लागला होता. त्यांच्या सरकारवर विरोधी पक्षीयांनी मांडलेल्या अविश्वासदर्शक ठरावावर फ्रेंच संसदेमध्ये मतदान घेण्यात आले. त्यांत ते सरकार हरले. फ्रान्सच्या राजकीय व्यवस्थेतील अति-उजवे आणि अति-डावे Michel Barnier यांच्या सरकारच्या आर्थिक धोरणांच्या विरोधात एकत्र आले आणि त्यांनी सरकार पाडले. Michel Barnier यांच्यानंतर पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतलेल्या Francois Bayrou यांनाही कार्यकाळ मिळाला तो २७० दिवसांचाच (१३ डिसेंबर २०२४ ते ९ सप्टेंबर २०२५). आता, Sebastien Lecornu यांनी तर त्यांवरही कडी केली. Francois Bayrou यांच्या कार्यकालाच्या केवळ १० टक्के इतकाच कार्यकाल Sebastien Lecornu यांना लाभला. या राजकीय अस्थिरतेचे परिणाम फ्रान्सच्या एकंदर प्रकृतीवर नेमके काय, कसे व केव्हा घडून येतात हे अभ्यासणे जितके तातडीचे ठरते तितकेच, या अस्थैर्याचे युरोपीय समुदायाच्या तब्बेतीवर काय परिणाम घडतात हे बघणेदेखील कळीचे शाबीत होते.

त्याला कारणही तसेच आहे. जर्मनी आणि फ्रान्स या दोन देशांच्या अर्थव्यवस्था युरोपीय समुदायातील सर्वाधिक बलदंड अर्थव्यवस्था गणल्या जातात. साहजिकच, युरोपीय समुदायाचे 'पॉवर हाउस' म्हणूनच या दोन अर्थव्यवस्थांकडे आणि पर्यायाने या दोन देशांकडे बघितले जात आले. या दोहोंत पहिल्या स्थानावर राहिलेली आहे जर्मन अर्थव्यवस्था तर, दुसरे स्थान राहत आले फ्रान्सकडे. ज्या देशांचे अर्थकारण बळकट ते देश दणकट, या न्यायाने जर्मनी आणि फ्रान्स या दोन देशांचे युरोपीय समुदायातील महत्त्व केंद्रवर्ती स्वरूपाचे राहिलेले आहे. युरोपीय समुदायाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या या दोन देशांच्या माध्यमातून उभ्या समुदायातील राजकोषीय आणि वित्तीय शिस्त आजवर अभंग राहत आली. आता, अलीकडील काळातील सततच्या राजकीय अस्थैर्यापायी युरोपीय समुदायामध्ये आजवर राहिलेले फ्रान्सचे केंद्रवर्ती महत्त्व लोप पावून तो देश, समजा, परीघाकडे फेकला गेला तर एकंदरच समुदायातील राजकोषीय आणि वित्तीय शिस्तीचा आजवरचा कडकडीत पीळ एकदम ढिला पडेल, अशी भीती व्यक्त केली जाते आहे.

राजकारण आणि अर्थकारण यांचे नाते अतिशय जवळचे आणि तितकेच संवेदनशील असते. पुन्हा, ते नाते एकदिश कधीच नसते. ते असते उभयदिश. 'चांगले राजकारण हे सुभग अर्थकारणावर बेतलेले असले पाहिजे,' असे प्रतिपादन

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग त्यांच्या कारकिर्दीदरम्यान सतत करत राहिले, त्यांमागील कारण काही असेल तर ते नेमके तेच. फ्रेंच संसदेमध्ये Michel Barnier यांचे सरकार विश्वासदर्शक ठराव २०२४ साली हरले ते त्यांच्या सरकारने मांडलेल्या अंदाजपत्रकात सरकारी खर्चाबाबत आणि करआकारणीसंदर्भात जे प्रस्ताव मांडलेले होते त्यांमुळे. आताही, आर्थिक शिस्त पूर्णत: विस्कटल्याने पोत ढासळू लागलेल्या शासकीय अर्थव्यवहाराची गाडी पुन्हा रुळांवर आणण्यासाठी काही कठोर तरतुदी Sebastien Lecornu यांच्या सरकारने अंदाजपत्रकात प्रस्तावित केलेल्या होत्या. फ्रान्समधील राजकीय व्यवस्थेत सक्रिय असणाऱ्या डाव्या तसेच उजव्या अशा दोन्ही विचारसरणींच्या पक्षांचा Sebastien Lecornu यांच्या सरकारने अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेल्या तरतुदींना कडवा विरोध होता. त्यांतच, Sebastien Lecornu यांच्या मंत्रिमंडळाच्या रचनेबाबत फ्रान्समधील डाव्या आणि उजव्या पक्षांमध्ये कमालीचा असंतोष नांदत होता. अशा परिस्थितीत, काटकसरीवर भर देणारे अंदाजपत्रक संसदेच्या पुढ्यात मांडून ते मंजूर करून घेणे ही अग्निपरीक्षाच ठरणार होती. त्यांमुळे कोंडीत सापडलेल्या Sebastien Lecornu यांनी पदमुक्तीचा पर्याय अंतिमत: अवलंबला. आता, इथेही पुन्हा एक गंमत म्हणा अथवा योगायोग म्हणा, तो दिसतो. सरकारची सद्दी अल्पकालीन ठरण्याच्या संदर्भात Michel Barnier आणि Francois Bayrou या Sebastien Lecornu यांच्या दोन पूर्वसुरींनादेखील नेमक्या त्याच कारणासाठी सत्तात्याग करणे भाग पडले होते.

फ्रान्समधील या राजकीय अस्थिरतेला इंधनपुरवठा करणाऱ्या कारणांबाबत चौफेर चर्वितचर्वण चालू आहे. फ्रान्सचे विद्यमान अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन यांचे राजकारण त्यांस कारणभूत ठरते आहे, असे विश्लेषकांच्या एका वर्गाचे सांगणे आहे. तर, फ्रान्सच्या अर्थकारणात ठाण मांडून बसलेले अ-व्यवस्थापनही राजकीय अस्थिरतेला तितकेच कारणभूत आहे, असे अन्य अभ्यासकांचे प्रतिपादन दिसते. बऱ्याच अंशी फ्रान्समधील राजकीय व्यवस्थाही या परिस्थितीला तितकीच जबाबदार आहे, असाही एक तिसराच सूर मधूनच उमटताना दिसतो. फ्रान्समधील विद्यमान राज्यपद्धती निम-अध्यक्षीय प्रकारची आहे. राज्यव्यवहाराचा हा ढाचा १९५८ साली अस्तित्वात आणला तो चार्ल्स द गॉल यांनी. १९४४ ते १९५८ अशा, १४ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीदरम्यान फ्रान्समध्ये अधिकारारूढ झालेल्या दुबळ्या सरकारांची सद्दी एकदाची संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने गॉल यांनी सत्ताकारणाचा हा आकृतिबंध तिथे रूढ केला. या व्यवस्थेमध्ये, सत्तातोलामध्ये बलवान ठरणारा अध्यक्ष देशाचे परराष्ट्रीय

संबंध मुख्यत: हाताळतो; तर, अंदाजपत्रक आणि देशांतर्गत अन्य धोरणप्रणालीची निर्मिती व अंमलबजावणी यांवर निगराणी राहते ती पंतप्रधानाची. अशा परिस्थितीत, देशाचा अध्यक्ष एका राजकीय पक्षाचा तर पंतप्रधान दुसऱ्याच वेगळ्या पक्षाचा, अशी परिस्थिती फ्रान्समध्ये १९५८ सालानंतर वेळोवेळी उद्भवलेली आहे. परंतु, फ्रान्सच्या राजकीय व्यवस्थेतील एकाही पक्षाला संसदेमध्ये बहुमताचा आधार नाही, असे चित्र मात्र तिथे कधी अवतरले नव्हते.

परंतु, आजचे वास्तव नेमके त्याचबाबतीत अगदी निराळे आहे. फ्रान्सच्या राजकीय क्षितिजावर सक्रिय असणाऱ्या एकाही राजकीय पक्षाला अलीकडील काळात संसदेमध्ये बहुमत प्राप्त करून घेण्यात यश आलेले नाही. फ्रान्सच्या अर्थव्यवस्थेत २०१७ सालापासून राबविण्यात येत असलेला आर्थिक पुनर्रचना कार्यक्रम अबाधित राखण्याचा मॅक्रॉन आणि उजव्या विचारसरणीबाबत ममत्व असणाऱ्या त्यांच्या सहकारी राजकीय पक्षांचा मानस आहे. उद्योगधंद्यांना त्यांचे कामकाज करणे सुकर बनावे अशा प्रकारची अर्थसंलग्न धोरणप्रणाली व कार्यपद्धती अंगिकारणे, करवाढीला आळा घालणे, बोजड बनलेली निवृत्तिवेतनाची व्यवस्था सुरळीत बनवणे आणि युरोपीय समुदायाच्या सदस्य देशांच्या संरक्षण व ऊर्जाविषयक बाबींसंदर्भातील धोरणांमध्ये अधिक एकात्मता निर्माण होण्याच्या दिशेने युरोपीय समुदायाची वाटचाल गतिमान बनवणे, अशा बाबींचा समावेश त्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमामध्ये आहे. परंतु, फ्रान्समधील अति-उजव्या आणि अति-डाव्या अशा दोन्ही तंबूमधील राजकीय पक्षांचे त्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंतरंगाबाबत मतैक्य मात्र होत नाही, हा तिथला मुख्य पेच आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये अधांतरी अवस्था फ्रान्समध्ये निर्माण होताना दिसते ती नेमकी त्याच विसंवादापायी.

किंबहुना, त्यांमुळे तिथे निर्माण झालल्या राजकीय अस्थिरतेमधून मुक्तता मिळवण्याच्या आशेनेच फ्रान्सच्या मध्यवर्ती संसदेसाठी आकस्मिक निवडणुका घेण्याची हाराकिरी मॅक्रॉन यांनी २०२४ साली केली खरी पण ती अंगाशी आली. ३० जून २०२४ आणि ७ जुलै २०२४ अशा दोन दिवशी संसदेसाठी फ्रान्समध्ये मतदान झाले परंतु फ्रेंच मतदारांनी कोणत्याही एका पक्षाच्या पारड्यात बहुमताने त्यांचा कौल दिलाच नाही! आकस्मिकरीत्या जाहीर केलेल्या निवडणुकीदरम्यान कोणत्या तरी एका पक्षाला संसदेमध्ये एका पक्षाला बहुमत मिळेल, असा हिशेब मॅक्रॉन यांनी मनाशी बांधलेला होता. परंतु, मॅक्रॉन यांची ती अपेक्षा फ्रेंच मतदारांनी सपशेल धुळीला मिळवली. फ्रान्समधील राजकीय व्यवस्थेत सक्रिय असणाऱ्या

अति-उजव्या, अति-डाव्या आणि मॅक्रॉन यांच्या उजवीकडे कल असलेल्या परंतु मध्यममार्गी राजकीय विचाराच्या पक्षाला जवळपास समसमान जागा मिळून २०२४ साली फ्रान्समध्ये त्रिशंकू संसद अस्तित्वात आली. निर्विवाद बहुमत कोणालाच मिळाले नाही. अखेर, आपले विश्वासू सहकारी असणाऱ्या आणि उजवीकडे झुकणाऱ्या विचारसरणीबाबत आस्था बाळगणाऱ्या Michel Barnier यांच्या हाती मॅक्रॉन यांनी सत्तेची सूत्रे सोपविली. Michel Barnier यांच्या पुढ्यात आव्हान होते ते सरकारी तिजोरीतील वित्तीय तुटीवर नियंत्रण आणण्याचे. काटकसरीवर भर देणारे अंदाजपत्रक सादर करणे हे Michel Barnier यांना त्या दृष्टीने अनिवार्यच होते. परंतु, त्रिशंकू संसद अस्तित्वात असल्याने सर्व पक्षांची सहमती असल्याखेरीज अंदाजपत्रक मंजूर होणे अशक्यप्रायच होते. त्यासाठी संसदेमध्ये मतैक्य निर्माण करण्याखेरीज पर्यायच नव्हता. परंतु, सरकारी खर्चाला कात्री लावण्याचा प्रस्ताव मांडणारे अंदाजपत्रक मंजूर करून घेण्याइतपत संख्याबळ सभागृहात आपल्या पाठीशी उभे करणे शक्य नसल्याचे Michel Barnier यांच्या ध्यानात २०२४ सालातील डिसेंबर महिन्यातच आले. आणि झालेही नेमके तसेच. अति-उजव्या आणि अति-डाव्या विचारांच्या पक्षांनी एकत्रित येऊन Michel Barnier यांचे सरकार पाडले. मग, अगदी आरंभापासूनचे राजकीय मित्र असणाऱ्या Francois Bayrou यांना मॅक्रॉन यांनी पंतप्रधानपदी नियुक्त केली. आर्थिक आघाडीवर जी आव्हाने Michel Barnier यांच्या पुढ्यात होती तीच आव्हाने होती Francois Bayrou यांच्या पुढ्यात. आर्थिक आघाडीवर शिस्त प्रस्थापित व्हावी यासाठी अवलंबावयाच्या धोरणदिशेसंदर्भात, फ्रान्समधील वरिष्ठ वर्ग आणि सर्वसाधारण फ्रेंच नागरिक यांच्यादरम्यान उद्‌भवणाऱ्या विसंवादाच्या मुळाशी असणारी कारणे जवळपास सार्वत्रिक स्वरूपाची अशीच होती व आहेत. राहणीमानाचा वाढता खर्च, सार्वजनिक सेवांची घसरती गुणवत्ता व शासनप्रणीत सुविधांचा खालावलेला दर्जा, अन्य देशांतून येणाऱ्या स्थलांतरितांचा अविरत प्रवाह आणि युक्रेनसह एकंदरच मध्य पूर्वेतील अस्थिर राजकीय तसेच लष्करी वातावरण हे घटक त्या संदर्भात कळीचे ठरतात.

इथे काही मुद्द्यांबाबत तीव्र मतभेद नांदताना दिसतात ते फ्रान्समधील अति-डावे आणि अति-उजवे यांच्यादरम्यान. काही बाबतींत या दोन्ही विचारधारांमध्ये एकवाक्यतादेखील आहे. उदाहरणार्थ, फ्रान्समधील गर्भश्रीमंतांकडून एकंदर करमहसुलातील सर्वाधिक हिस्सा घेतला जावा यांबाबत अति डाव्या-उजव्या पक्षांमध्ये मतैक्य आहे. तसेच, निवृत्तिवेतनाच्या प्रचलीत व्यवस्थेत मॅक्रॉन करू पाहत असलेल्या

सुधारणांना दोघांचाही कडवा विरोध आहे. निवृत्तीचे वय साठावर पूर्ववत आणावे, हाच दोघांचाही धोशा आहे. ‘युरोपीय समुदाय’ या सामूहिक व्यासपीठाबद्दल अति–डावे आणि अति–उजवे असे दोघेही सारख्याचप्रमाणात साशंक आहेत. त्यांमुळे, अधिक प्रमाणावर काहीएक सार्वभौम नेतृत्व युरोपीय समुदायाच्या संसदेकडे सोपविण्यास दोघांचाही एकसारखाच विरोध दिसतो. असे असले तरी, काही धोरणांबाबत मात्र अति–डावे आणि अति–उजवे परस्परांच्या एकदम विरुद्ध ध्रुवांवर उभे ठाकलेले दिसतात. अन्य देशांमधून येणाऱ्या स्थलांतरितांबाबत अतिशय कडक व अ–लवचीक धोरण स्वीकारले जावे असा अति–उजव्यांचा धोशा आहे. तसेच, प्रदूषणमुक्त ऊर्जास्त्रोतांच्या विकासाबाबतही फ्रान्सने धीम्या गतीनेच पावले उचलावीत असा त्यांचा आग्रह आहे. अन्य देशांच्या प्रश्नांमध्येदेखील फ्रान्सने हस्तक्षेप करू नये, असेही त्यांचे म्हणणे आहे. तर, फ्रान्समध्ये पूर्वापार असलेले सामाजिक सुरक्षेचे कवच सरकारने बुलंद राखावे यांबाबत तिथले टोकाचे डावे आग्रही आहेत. केवळ इतकेच नाही तर, वातावरणीय बदलांचा सामना समर्थपणे करण्याबाबत फ्रान्सने अधिक महत्त्वाकांक्षी धोरणे अंगीकारून त्यांची अंमलबजावणी काटकोरपणे केली पाहिजे, यांबाबतही तिथले अति–डावे आक्रमक पवित्रा घेताना दिसतात.

राजकीय विचारसरणीसंदर्भात तसेच आर्थिक आघाडीवर शिस्त निर्माण करण्याबाबत अशा प्रकारची वैचारिक मतभिन्नता नांदत असलेल्या पक्षीय व्यवस्थेमध्ये काटकसरीचे पाऊल उचलणाऱ्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याबाबत मतैक्य निर्माण करणे फ्रान्समधील कोणाही राजकीय नेतृत्वाला अवघडच ठरावे, यांत आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नाही. परंतु, फ्रान्सची विद्यमान आर्थिक स्थिती अशी संवेदनशील बनलेली आहे की तिच्याकडे काणाडोळा करणेही कोणालाच परवडणारे नाही. फ्रान्सच्या वित्तीय तुटीचे त्या देशाच्या ठोकळ देशी उत्पन्नाचे असलेले गुणोत्तर प्रमाण २०२४ साली ६.१ टक्क्यांवर पोहोचलेले होते. त्या परिस्थितीमध्ये आजही काही बदल नाही. वित्तीय तुटीचे फ्रान्सच्या ठोकळ देशी उत्पादनाशी असलेले गुणोत्तर प्रमाण आज जवळपास त्याच परिघात आहे. परिणामी, वित्तीय तूट आणि ती भरून काढण्यासाठी सतत करावी लागणारी कर्जउभारणी यांचा सामना करण्याचे दुहेरी आव्हान फ्रान्समधील राजकीय नेतृत्वाच्या पुढ्यात आहे. हाताबाहेर जाऊ पाहत असलेली (खरे म्हणजे, हाताबाहेर गेलेली) ही परिस्थिती सावरण्यासाठी वित्तीय आघाडीवर जे कठोर निर्णय घेऊन त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे ती राजकीय इच्छाशक्ती सत्तेवर आलेले कोणतेही सरकार आज

दाखवू शकत नाही. त्यांमुळे, आर्थिक आघाडीवरील पेचप्रसंग सुटत नाहीत. बिकट अर्थकारणापायी राजकारणाचा गाडा निर्धारपूर्वक हाकणे २०२२ सालानंतर तिथे सत्तेवर आलेल्या एकाही पंतप्रधानाला जमू शकले नाही. त्यांमुळे, फ्रान्समधील राजकारण आणि अर्थकारण या दोन्ही क्षेत्रांतील अस्थिरता परस्परपूरकच केवळ नव्हे तर परस्परपोषकदेखील ठरते आहे.

फ्रेंच अर्थकारणाची घडी विस्कटण्यास, २१व्या शतकातील पहिल्या पाव शतकादरम्यान उद्‌भवलेली दोन आर्थिक अरिष्टे मुख्यत: कारणभूत ठरतात, असे विश्लेषण अनेक भाष्यकार या संदर्भात मांडतात. २००८ साली निर्माण झालेले जागतिक वित्तीय अरिष्ट आणि २०२० व २०२१ अशी दोन वर्षे वेटाळून बसलेली 'कोविड–१९'ची महामारी, ही ती दोन आर्थिक संकटे. या दोन हल्ल्यांनी फ्रान्सचे अर्थकारण पुरते नामोहरम करून टाकले, असे जे एक विश्लेषण मांडले जाते त्यांत खचितच अर्थ आहे. परंतु, फ्रान्समधील आजच्या बिकटावस्थेचे खापर केवळ या दोन आर्थिक संकटांच्या माथी फोडणे हेदेखील वस्तुस्थितीशी प्रतारणा करणारेच ठरेल. या चिवट दुखण्याची कारणमीमांसा समजावून घेण्यासाठी शासनसंस्थेचे फ्रान्सच्या अर्थकारणातील स्थान, फ्रेंच अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक (स्ट्रक्चरल) पेच आणि तेथील राजकीय व्यवस्थेमध्ये अलीकडील काळात कार्यरत बनलेले विविध विचारप्रवाह यांच्यादरम्यानचे आंतरिक संबंध त्यांच्या गुंतागुंतीसह समजावून घेण्याचा प्रयत्न करण्याखेरीज अन्य मार्ग नाही.

कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे कंकण हाती बांधलेली फ्रान्समधील राज्यसंस्था (स्टेट) तेथील अर्थकारणात जवळपास सर्वंकष स्वरूपाची भूमिका निभावते. शासनसंस्थेकडे कळीची भूमिका सोपविलेली नाही, असे फ्रान्सच्या अर्थव्यवस्थेमध्ये एकही क्षेत्र नसावे. शेतीपासून ते थेट आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या अत्याधुनिक क्षेत्रापर्यंत सर्वत्र फ्रेंच शासनसंस्थेचे मुखत्यारत्व अनुभवास येते. परिणामी, अर्थकारणामध्ये 'शासनसंस्था' या भिडूने अवास्तव हातपाय पसरलेले आहेत. फ्रान्सच्या सरकारी खर्चाचे त्या देशाच्या ठोकळ देशी उत्पादनाशी असलेले गुणोत्तर ही एकच बाब, शासनसंस्थेच्या अतिरिक्त फुगलेल्या आकारमानाची साक्ष पुरविण्यास पुरेशी ठरते. सरकारी खर्चाचे फ्रान्सच्या देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले प्रमाण जवळपास ५८ टक्क्यांच्या घरात आहे. जगभरात सर्वांत बलशाली समजल्या जाणाऱ्या सात देशांच्या समूहातील (जी–७) देशांमध्ये त्यांच्या त्यांच्या सरकारी खर्चाचे त्या त्या देशांच्या ठोकळ देशी उत्पादनाशी जे गुणोत्तर प्रमाण दिसते त्याच्या सरासरीपेक्षाही

फ्रान्सचे गुणोत्तर प्रमाण अधिक आहे. केवळ इतकेच नाही तर, युरोपीय समुदायातील अन्य देशांपेक्षाही फ्रान्सचे हे गुणोत्तर किती तरी अधिक भरते.

फ्रेंच शासन सामाजिक सुविधांखातर जो खर्च करते त्यांमुळे हे गुणोत्तर प्रमाण मुख्यत: अधिक भरते. नागरिकांच्या सर्वसाधारण कल्याणाची पातळी जपणे, आरोग्यसेवा, शिक्षण यांसारख्या सामाजिक सुविधा पुरविणे यांसाठीच्या शासकीय खर्चाचे फ्रान्स शासनसंस्था करत असलेल्या एकंदर खर्चामध्ये प्रमाण लक्षणीयरित्या मोठे आहे. 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अ‍ॅन्ड डेव्हलपमेन्ट' (ओइसीडी) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जगातील सर्वाधिक विकसित देशांच्या समूहात, सामाजिक सेवांवर सरासरीने केल्या जाणाऱ्या सरकारी खर्चाचे त्या त्या देशांच्या देशी ठोकळ उत्पादनाशी जे गुणोत्तर प्रमाण भरते त्यांहीपेक्षा फ्रान्सचे गुणोत्तर प्रमाण अधिक आहे. सामाजिक सुविधांखातर फ्रेंच शासन करत असलेल्या खर्चाचे फ्रान्सच्या ठोकळ देशी उत्पन्नाशी असणारे प्रमाण २०१९ साली (म्हणजे, 'कोविड-१९'चा आकांत उत्पन्न होण्यापूर्वी) ३१ टक्के इतके होते. असे असले तरी, शासनसंस्था पुरवत असलेल्या सेवांचा दर्जा सरासरीने घसरत असल्याबद्दल फ्रेंच समाजामधून आताशा नाराजीचा सूर उमटताना दिसतो. फ्रान्समधील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये पुरेसे कर्मचारी नाहीत, अशी तक्रार तेथील डॉक्टर व परिचारिका करताना दिसतात. ग्रामीण भागांतील रेल्वेसेवा आताशा बंद करण्यात येत असल्यामुळे ग्रामीण फ्रान्समध्ये असंतोष नांदता आहे. तर, सरकारी विद्यापीठांना पुरेसा निधीपुरवठा होत नाही म्हणून फ्रान्समधील प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थीगणही नाराज दिसतात.

ही झाली चित्राची केवळ एकच बाजू. दुसरी बाजूही बघावयास हवी. अन्यथा, वस्तुस्थितीचे सम्यक् दर्शन होणार नाही. वैद्यकीय महाविद्यालयांमधील नवीन प्रवेश फ्रान्समध्ये बराच काळ गोठविण्यात आलेले होते. सरकारी रुग्णालयांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ पुरेशा संख्येने उपलब्ध न होण्यामागील एक संभाव्य कारण तेच ठरत राहिले. वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्रवेशांवरील ती पाबंदी २०२० साली उठविण्यात आली. फ्रान्समधील नागरीकरणाच्या प्रक्रियेने गेल्या जवळपास पाव शतकात प्रचंड वेग पकडला. फ्रान्समधील नागरी विभागांत राहणाऱ्या शहरी लोकसंख्येचे फ्रान्सच्या एकंदर लोकसंख्येशी आधीच चांगले घसघशीत, म्हणजे, ७६ टक्के असणारे प्रमाण त्यांमुळे वाढून ८२ टक्क्यांवर पोहोचलेले आहे. साहजिकच, फुगणारी आणि विस्तारणारी शहरे आणि आक्रसणारी खेडी असे चित्र तिथे दिसते. अशा परिस्थितीत, आक्रसणाऱ्या ग्रामीण लोकसंख्येला रेल्वेसेवा पुरवायची तर तिचा दरडोई खर्च प्रचंड

ठरतो. ती सेवा मग आतबट्ट्याची शाबीत होते. सरकारी सेवांच्या घटत्या गुणवत्तेसंदर्भातील ही होत निखळ व्यावहारिक अशी आर्थिक कारणे. परंतु, फ्रेंच राजकारणात सक्रिय असणाऱ्या अति-उजव्या आणि अति-डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या लेखी या परिस्थितीस हातभार लावणारी कारणे वेगळीच आहेत. सरकार पुरवत असणाऱ्या सेवांवर फ्रान्समध्ये येणाऱ्या स्थलांतरितांच्या लोंढ्यांपायी ताण निर्माण होतो, असा अति-उजव्यांचा दावा आहे. परिणामी, सरकार पुरवत असलेल्या सार्वजनिक सुविधा व त्यांसाठी शासकीय तिजोरीमधून केली जाणारी तरतूद तोकडी ठरते, असे म्हणत फ्रान्समधील अति-उजवे राजकीय पक्ष खालावणाऱ्या सामाजिक सुविधांचे खापर फोडतात स्थलांतरितांच्या माथ्यावर!

आता, खर्चाचा एवढा भार पेलायचा तर शासनसंस्थेपाशी उत्पन्नाची तशीच बळकट साधनेही हवीत. विविध करांच्या आकारणीद्वारे फ्रेंच सरकार नागरिकांकडून जो करमहसूल गोळा करते त्याचे फ्रान्सच्या देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे प्रमाण आजघडीला ५१ टक्क्यांच्या घरात आहे. २०१९ साली हेच प्रमाण होते जवळपास ४५ टक्क्यांच्या परीघात. 'जी-७' या नावाने देशांचा जो समूह निर्देशित केला जातो त्या देशांमध्ये त्यांच्या त्यांच्या करमहसुलाचे त्या त्या देशाच्या ठोकळ उत्पादनाशी जे सरासरी प्रमाण आहे त्यांपेक्षा फ्रान्सचे हे प्रमाण अधिक आहे अथवा होते. इतका करभार सर्वसाधारणपणे असूनही फ्रान्स सरकार १९७०च्या दशकापासून सातत्याने तुटीचे अर्थसंकल्प सादर करत आलेले आहे, ही बाब जितकी विस्मयकारक तितकीच अभ्यसनीयदेखील ठरते. साध्या भाषेत सांगायचे तर,शासनसंस्थेची खर्चाची मात्रा महसुलापेक्षा सातत्याने अधिक राहणे, हेच वास्तव दशकानुदशके फ्रान्समध्ये नांदत आलेले आहे. फ्रान्सच्या अध्यक्षपदाची सूत्रे २०१७ साली हाती घेतल्यापासून सरकारचे उत्पन्न आणि खर्च यांचे बिघडलेले समीकरण सावरण्यासाठी मॅक्रॉन यांनी जारीने प्रयत्न चालू केले. २०१८ आणि २०१९ अशी दोन वर्षे त्या प्रयत्नांची अपेक्षित फळेदेखील फ्रान्सने चाखली. परंतु, २०२० सालातील मार्च महिन्यापासून उग्र रूप धारण केलेल्या 'कोविड'ने त्या सगळ्यावर पार पाणी फिरविले. सर्वंकष टाळेबंदीपायी हातपाय पुरते आवळले गेलेल्या अर्थव्यवस्थेला जबर सरकारी खर्चाचे इंजेक्शन दिल्याखेरीज अर्थव्यवस्थेतील रोजगार आणि रोजगारनिर्मिती करणारे व्यवसायधंदे टिकणे शक्यच नव्हते. केवळ फ्रान्स व युरोपीय समुदायातील अन्य देशच नव्हे तर, जगभरात सर्वत्रच ते चित्र दिसत होते. परिणामी, सरकारी खर्चात प्रचंड वाढ साहजिक ठरली. त्यांतून तूट वाढली. वित्तीय तुटीचे फ्रान्सच्या ठोकळ

देशी उत्पन्नाशी असणारे गुणोत्तर प्रमाण २०२३ साली पोहोचले ५.५ टक्क्यांवर. वाढती तूट आटोक्यात आणण्यासाठी युरोपीय समुदायातील अन्य देशांनी, 'कोविड-१९'चा बहर ओसरल्यानंतर आवश्यक ती उपाययोजना कणखरपणे राबविली. परंतु, फ्रान्सला मात्र ते जमले नाही. कारण, एकतर सरकारी खर्चाला कात्री लावणे आणि/अथवा करआकारणी वाढवून करसंकलनात भर घालणे या, तुटीचे निराकरण घडवून आणण्याच्या पर्यायांना फ्रेंच नागरिकांनी रस्त्यावर उतरून तर, राजकीय पक्षांनी संसदेमध्ये कडवा विरोध दिर्शविला. तुटीला पायबंद घालून सरकारी अर्थव्यवहाराची गुणवत्ता सुधारण्याबाबत राजकीय पक्षांमध्येच एकवाक्यता नसल्याचे दुष्परिणाम फ्रान्स आजवर भोगत आलेला आहे. आजचे चित्रदेखील त्यापेक्षा अजिबातच वेगळे नाही.

'कोरोना'च्या फैलावापायी उडालेल्या हाहाकारातून कोठे सावरतो ना सावरतो तोच फ्रान्सला दुसरा धक्का बसला तो २०२२ सालातील फेब्रुवारी महिन्यात युक्रेनविरोधात रशियाने आरंभलेल्या लष्करी कारवाईपायी. युक्रेनवरील त्या चढाईपायी फ्रान्सच्या मुख्य ऊर्जास्त्रोताला क्षती पोहोचली. इंधनपुरवठ्याची साखळी विस्कळीत बनून त्याची परिणती कच्चे खनिज तेल महागण्यात घडून आली. परिणामी, इंधनखर्चात वाढ झाली. इंधनांच्या दरवाढीचा सारा बोजा नागरिकांच्या खिशावर पडू नये यासाठी अनुदानांमध्ये वाढ घडवून आणणे क्रमप्राप्त ठरले. परिणामी, सरकारी खर्चातील वाढ जारी राहिली आणि तुटीचे भगदाडही रुंदावत राहिले. खर्च आणि उत्पन्नाचा मेळ घालण्यासाठी कर्जउभारणी करण्याखेरीज फ्रेंच सरकारला अन्य पर्याय उरलेलाच नव्हता. मग, कर्जांचा बोजाही चढू लागला. 'कोविड'चा हलकल्लोळ निर्माण होण्याअगोदर, म्हणजे, २०१९ साली फ्रान्सच्या माथ्यावर असणाऱ्या कर्जांचे देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले प्रमाण ९८ टक्के असे दणदणीत होते. 'कोविड' आणि युक्रेन-रशिया यांचा संघर्ष या दोहोंपायी उभ्या ठाकलेल्या आर्थिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कराव्या लागलेल्या खर्चापायी तूट अधिकच वाढून वाढीव कर्जे घेणे क्रमप्राप्त ठरत राहिले. त्यांमुळे, कर्जांचे देशी उत्पन्नाशी २०१९ साली असणारे ९८ टक्के असे प्रमाण उंचावून २०२१ साली ते पोहोचले १२० टक्क्यांवर! कर्जांचे आकारमान जसे फुगत चालले तसतसे व्याजभरणा करण्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या रकमेचे आकारमानही वाढू लागले. व्याजदेयकांच्या रकमेत वाढ घडून येत राहण्याने फ्रान्सच्या महसुली खर्चाचे व्यवस्थापनदेखील पार ढासळले. करमहसुलाचा मोठा हिस्सा व्याजदेयकांकडे वळवणे भाग पडू लागल्याने शिक्षण, संरक्षण यांसारख्या

बाबींना निधीचा तुटवडा जाणवू लागला. एकंदरीने, 'तूट-कर्ज-व्याज-खर्च-तूट-कर्ज' या दुष्टचक्रात आज फ्रान्स अडकलेला आहे.

हे दुष्टचक्र भेदायचे तर उत्पन्न आणि खर्च अशा दोन्ही आघाड्यांवर प्रयत्न करणे भाग आहे. तूट सीमित राखण्यासाठी एकीकडून करमहसूल वाढवत दुसरीकडे सरकारी खर्चातही कपात घडवून आणण्यावर प्रयत्नांचा सारा झोत एकवटणे क्रमप्राप्त ठरते. परंतु, त्यासाठी निकडीच्या असणाऱ्या व्यापक सहमतीचाच फ्रान्समध्ये मागमूस नसल्याने हे दुखणे चिवट बनून आता चिघळत चाललेले आहे. अर्थात, याच्या मुळाशी असणारी कारणे जशी प्रासंगिक, परिस्थितीजन्य आहेत तशीच ती संरचनात्मकदेखील (स्ट्रक्चरल) आहेत. फ्रान्सच्या लोकसंख्येची विद्यमान रचना आणि सरकारी खर्चाची पूर्वापारची जडणघडण हीच त्यांतील दोन मुख्य दुखणी आहेत आणि आव्हानेही. एकंदर लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे वाढत जाणारे संख्यात्मक प्राबल्य, ही एक सगळ्यांच देशांच्या वाट्याला कधी ना कधी येणारी अटळ अशी वस्तुस्थिती होय. आजचा फ्रान्स त्याच पर्वातून वाटचाल करतो आहे. या वास्तवाचे दोन परिणाम सहन करणे भाग पडते. एक तर, अर्थव्यवस्थेमध्ये त्यांमुळे उत्पादनक्षम हातांचा तुटवडा निर्माण होतो. उत्पादकतेची सरासरी पातळी घटते. आर्थिकदृष्ट्या उत्पादक लोकसंख्येचे एकूणांतील प्रमाण ओसरायला लागण्याने सरकारला मिळणाऱ्या करमहसुलालाही ओहोटी लागते. मात्र, त्याच वेळी, वयोवृद्ध नागरिकांचे जीवनमान, औषधपाणी, देखभाल व निवृत्तिवेतनादी तरतुदींकडे सरकारी खर्चाचा मोठा हिस्सा वळवावा लागतो. फ्रान्समधील निवृत्तिवेतनाची प्रचलीत व्यवस्था पूर्वीपासूनच निवृत्त कर्मचाऱ्यांना घसघशीत निवृत्तिवेतन अदा करणारी अशी आहे. वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानात्मक प्रगतीपायी सरासरी आयुर्मान वाढते आहे. परिणामी, निवृत्तिवेतनादी सवलतींचा मोठा बोजा शासकीय तिजोरीवर वाढतो आहे. त्यांवर उपाय म्हणून निवृत्तीचे वय वाढविण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला कडाडून विरोध झाल्यामुळे निवृत्तीचे वय पुन्हा एकवार ६० वर्षांपर्यंत घटविणे सरकारला भाग पडले.

एकंदर अर्थव्यवस्थेतच शासनसंस्था सर्वसंचारी असल्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या मोठी असावी, हे ओघानेच येते. त्यांतच, फ्रान्समधील श्रमांची बाजारपेठ ही तुलनेने अ-लवचीक गणली जाते. कर्मचाऱ्याला कामावरून कमी करणे कमालीचे कटकटीचे शाबीत होते. त्यांमुळे नवीन कामगारभरतीसाठी उद्योगधंदे सरासरीने अनुत्सुकच असतात. कामावर असणाऱ्या कामगारांना पगारवाढ बहाल करण्यासही उद्योगधंदे खळखळच करतात. रोजगारवाढ पुरेशी नसल्यामुळे फ्रान्समधील बेरोजगारीचा

दर हा युरोपीय समुदायातील बेरोजगारीच्या सरासरी दरापेक्षा बराच अधिक राहतो. या सगळ्याचा परिणाम शासकीय खर्चावर अनेक अंगांनी पडतो. एक तर, उद्योगांनी रोजगारवाढ हिरिरीने करावी यासाठी उद्योगांना प्रोत्साहक अनुदाने जाहीर करणे, आकर्षक अशी अर्थसाहाय्ये पुढे करणे सरकारला क्रमप्राप्त बनते. बेरोजगार भत्यांसाठी तरतूद करावी लागते. राहणीमानाचा वाढता खर्च आणि त्या मानाने अपुरी असणारी व अडखळणारी पगारवाढ यांपायी नागरिकांसाठीदेखील अनुदानांची, अर्थसाहाय्याची व्यवस्था राबवावी लागते. सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी पुरेशी तरतूद करणे तर भागच असते. फ्रान्समधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे अर्थकारण एकंदरीने कमकुवत असल्यामुळे त्यांनाही अर्थसाहाय्याचा टेकू पुरविण्याखेरीज सरकारला पर्याय उरत नाही. कर्जांचा बोजा सरकारी तिजोरीवर असल्यामुळे व्याजदेयकांपासूनही सुटका अशक्यच आहे. या सगळ्यांमुळे खर्चाची बाजू अ-लवचीक बनलेली आहे. परिणामी, तुटीला पायबंद घालणे अवघड ठरत जाते. मग पुन्हा कर्जे नव्याने घेणे भाग पडते.

या भोवऱ्यातून सुटका करून घ्यायची तर एकीकडे सरकारी खर्चात कपात घडवून आणत असतानाच, दुसरीकडे, करवाढ जारी करून अधिक करमहसूल गोळा करण्यावर भर देणे गरजेचे ठरते. तुटीचे भगदाड त्यांमुळे आटोक्यात येऊन कर्जउभारणीला आळा बसेल. परंतु यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक व वित्तीय धोरणदिशेचा अवलंब करण्याबाबत सत्तारूढ सरकारचे हात बळकट करण्याची वेळ आली की फ्रान्सच्या राजकीय व्यवस्थेत सक्रिय असणाऱ्या राजकीय पक्षांदरम्यानच्या मत्रवैचित्र्याचा अडथळा उभा ठाकतो. उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी करवाढ घडविण्यास अति-उजव्या राजकीय पक्षांचा विरोध आहे; तर, फ्रान्समधील अति- श्रीमंतांवर जबर करवाढ जारी करावी, संपत्तीवर करआकारणी केली जावी असा तिथल्या अति-डाव्यांचा धोशा असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच एकंदरच सरकारच्या खर्चात कपात घडवून आणावी, याला तिथले अति-उजवे अनुकूल असले तरी ते पर्याय अवलंबण्यास फ्रान्समधील अति-डाव्या पक्षांचा टोकाचा विरोध आहे. या सगळ्यापायी अर्थकारणातील तिढा सुटत नाही. त्यांमुळे राजकारण अस्थिर बनते आणि राजकीय व्यवस्थाच अस्थिर राहण्याने त्याचा एकंदरीने प्रतिकूल परिणाम अर्थकारणावर घडत राहतो.

आर्थिक आघाडीवर फ्रान्सची आज झालेली कोंडी ही अशा सगळ्या राजकीय अर्थकारणाची निष्पत्ती होय. राजकीय प्रगल्भतेअभावी वित्तीय समस्येच्या काट्याचे, यथावकाश, सामाजिक-राजकीय नायट्यामध्ये कसे अवस्थांतर घडून येते याचे हे

उत्तम उदाहरण ठरावे. निखळ लोकानुनयी अर्थधोरणांची तामिली आणि राजकीय व्यवस्थेमध्ये टोकाच्या भूमिका यांपायी अर्थव्यवस्थेला आणि पर्यायाने देशाला कोणत्या भयप्रद संकटांना तोंड द्यावे लागते, हे फ्रान्सच्या रूपाने वैश्विक समुदाय अनुभवतो आहे, पाहतो आहे. या वरून देशोदेशींचे राजकीय धुरीण आणि धोरणकर्ते काही धडे शिकतील का?

*शासकीय तिजोरीवरील कर्जांच्या बोज्याची फ्रान्सच्या पुढ्यात उभी ठाकलेली समस्या ग्रीसला एके काळी भेडसावणाऱ्या समस्येइतकी गंभीर नसली तरी, वैश्विक स्तरावरील 'मूडीज्'सारख्या पतमानांकन संस्थांनी फ्रान्सचे पतमानांकन घटविलेले आहे, हे वास्तव नजरेआड करता येत नाही. त्यांमुळे, तिजोरीतील तूट भरून काढण्यासाठी नवीन कर्जे उभारतेवेळी, फ्रान्सला आता, व्याजाचा अधिक दर मोजावा लागेल. युरोपीय समुदायातील इटली अगर बेल्जियम यांसारख्या देशांचा संसर्ग, या बाबतीत, फ्रान्सला होणारच नाही, असे छातीठोकपणे आज तरी कोणी सांगू शकत नाही. परंतु, फ्रेंच अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीबाबत अतिरेकी व अवास्तव अशा धारणा प्रसृत होऊन, समजा, त्यांचे पडसाद कर्जरोख्यांच्या बाजारपेठेत उमटू लागले तरी युरोपीय समुदायाची मध्यवर्ती बँक फ्रान्सच्या मदतीस धावून येईल हे नक्की. परंतु, ही आपसूक घडणारी बाब नव्हे. अर्थकारणाची बिघडलेली घडी पूर्ववत बसविण्याबाबत तसेच तुटीचे भगदाड, हर प्रयत्न करून, निरुंद बनविण्याबाबत शासनसंस्था परिणामकारक पावले प्रामाणिकपणे उचलते आहे, याची हमी फ्रान्सच्या सत्ताधीशांनी युरोपीय समुदायाच्या मध्यवर्ती बँकेला, त्यासाठी, प्रथम पटवून द्यावी लागेल. भक्कम पाठबळ लाभलेले सरकार निर्माण करणे ही त्याची पूर्वअट ठरते. त्यासाठी, फ्रान्सच्या राजकीय व्यवस्थेत सक्रिय असणाऱ्या सगळ्यांच राजकीय पक्षांना त्यांच्या त्यांच्या पक्षीय भूमिका, निदान काही काळ तरी, बाजूला ठेवून, अर्थकारणाची विस्कटलेली वीण पूर्ववत विणण्यासाठी आवश्यक अशा अर्थशास्त्रीय पर्यायांचा स्वीकार करण्याची प्रगल्भता प्रगट करावी लागेल.*

# पुरवणी

## १. ज्ञानदेव, 'ज्ञानदेवी' आणि भाषाव्यवहार

# पुरवणी

## ज्ञानदेव, 'ज्ञानदेवी' आणि भाषाव्यवहार

भाषाव्यवहार हा सगळ्या मानवी व्यवहाराचा जणू प्राणच समजायला हवा. मानवी समाजामध्ये घडोघडी आकार घेणारे अगणित व्यवहार आणि त्यांचा पोत त्या समाजव्यवस्थेतील भाषाव्यवहार कितपत समृद्ध आणि प्रगल्भ आहे, त्यांवर निर्भर असतो. कारण, भाषा हेच समाजव्यवहाराचे साधन होय. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम भाषा करत असते. ही संयोजन शक्ती भाषेच्या ठायी असल्यामुळेच माणसे परस्परांशी चर्चा-विचारविनिमय करू शकतात. मनात अप्रगट असलेल्या विचारांना व भावनांना भाषेच्या माध्यमातूनच अभिव्यक्त होण्याची संधी गवसते. त्यांतूनच समाजाची बांधणी गतिमान राहते. कोणतीही समाजव्यवस्था निकोप आणि निरामय पद्धतीने चालण्यासाठी तिच्या अंगप्रत्यंगांमध्ये सर्व स्तरांवरील संवाद सतत चालू असणे गरजेचे ठरते. त्या संवादाची जातकुळी भाषाव्यवहार निश्चित करत असतो. मराठी समाजातील संवाद प्रवाही राखण्यात अभिजात गणल्या जाणाऱ्या ज्या मराठी भाषेची केंद्रवर्ती भूमिका राहिलेली आहे तिला ज्ञानभाषेचे लेणे बहाल करण्यात १२-१३व्या शतकात 'महानुभाव' आणि 'वारकरी' या दोन संप्रदायांनी अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. अतिशय आशयघन असे गद्य मराठी भाषेत निर्माण करण्यात महानुभाव संप्रदायाच्या धुरिणांनी पुढाकार घेतला; तर, रसाळ परंतु अर्थबहुल अशा पद्याच्या माध्यमातून तत्कालीन मराठी समाजाचे सक्षमीकरण घडवून आणण्यास वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू सरसावले. 'ओवी' आणि 'अभंग' या दोन देशी आदिबंधांची प्रतिष्ठापना त्याच व्यवहारातून साकारली. वर्णाश्रमप्रधान धर्मविचाराच्या चौकटीत व्यवहारणाऱ्या त्या समाजरचनेत सगळा ज्ञानव्यवहार उच्चवर्णियांच्या कनवटीला बांधलेला होता. साहजिकच, देवभाषा गणल्या जाणाऱ्या संस्कृतची मक्तेदारी तत्कालीन यच्चयावत ज्ञानव्यवहारात बलशाली राहिली. त्या ज्ञानव्यवस्थेपासून वंचित राखलेल्या

समाजव्यवहारांचे ज्ञानप्रसाराद्वारे सक्षमीकरण घडवून आणण्याच्या हेतूने महानुभाव आणि वारकरी या दोन संप्रदायांनी मऱ्हाटी प्राकृताचा माध्यम म्हणून अंगीकार जाणीवपूर्वक केला.

महानुभाव आणि वारकरी हे उभय संप्रदाय भक्तिमार्गी. या संप्रदायांच्या अध्वर्यूंनी त्यांच्या वाङ्मयाचे उपयोजन घडविले ते मुख्यत: तत्कालीन समाजव्यवहारात नीतीप्रधान अशा समाजाभिमुख भक्तीचे बीजांकुरण घडवून आणण्यासाठी. तत्कालीन समाजाच्या सर्व स्तरांत दूरवर झिरपलेल्या वारकरी सांप्रदायिक संतांनी ज्ञानाधिष्ठित, कर्मप्रधान अशा भक्तिविचाराचा परिपोष करण्यासाठी आधार घेतला तो श्रीमद्‌भगवद्‌गीता आणि श्रीमद्‌भागवत यांसारख्या व्यासरचित संस्कृत ग्रंथांचा. या दोन ग्रंथांमधील सत्वांश समकालीन समाजमनाची मशागत करण्यासाठी लोकभाषेमध्ये रूपांतरित करण्याचे काम – त्याचे दोन स्तर असल्यामुळे – मोठे दुष्कर होते. एक तर, संस्कृतातील आशय लोकभाषा मऱ्हाटी प्राकृतात उतरविणे, हा झाला त्या मानाने ढोबळ स्तर. मुळात, शब्दांमध्येही जे नीट पकडता येत नाहीत असे जाणिवेचे तलमतर तरंग संस्कृतातून टिपून आपल्या जाणिवेमध्ये मुरवून मग लोकभाषेमध्ये तितक्याच प्रत्ययकारीपणे व्यक्त करण्यासाठी लोकभाषेचे सक्षमीकरण घडवून आणणे, हा ठरतो त्या दुहेरी आव्हानातील कठीणतर असा दुसरा स्तर. असे हे मोठे अवघड काम सिद्धीस नेण्यासाठी १३व्या शतकापासून पुढे क्रियाशील राहिलेल्या संतकवींनी भाषाव्यवहाराचे जे ‘मॉडेल’ अंगीकारले ते आजही अभ्यसनीय ठरते.

किमान दोन व्यक्ती एकत्र आल्याखेरीज भाषाव्यवहार प्रगटतच नाही. संभाषणामध्ये सहभागी असणाऱ्या दोन अथवा त्यांहीपेक्षा अधिक व्यक्ती आलटून–पालटून ‘श्रोता’ आणि ‘वक्ता’ अशा दोन्ही भूमिकांमध्ये जा–ये करत असतात. परंतु, भाषाव्यवहाराचे उद्दिष्ट ज्ञानप्रदानाचे असेल आणि तशा ज्ञानव्यवहाराचे स्वरूप, समजा, अध्यापन अथवा व्याख्यानाचे असेल तर मात्र ‘वक्ता’ आणि ‘श्रोता’ या दोन भूमिका स्थिर आणि स्पष्ट असतात. असा ज्ञानव्यवहार शाळा अगर महाविद्यालयातील वर्गांच्या चार भिंतींमध्ये साकारणारा असो अथवा खुल्या मैदानावरील कीर्तन–प्रवचन–व्याख्यानादी रंगरूपाद्वारे खुलणारा असो, वक्ता आणि श्रोते यांच्या भूमिका तिथे आखून दिलेल्याच राहतात. ज्ञानवहनासाठी योजलेल्या तशा भाषाव्यवहारामध्ये, ज्ञानप्रदान अर्थपूर्ण पद्धतीने घडून यावे यासाठी किमान काही घटक तिथे विद्यमान असणे अगत्याचे गणावे लागते. वक्ता अथवा शिक्षक जो विषय समजावून देतो आहे त्याच्या आशयाशी श्रोते ज्या वेळी वक्त्याच्या समपातळीस येऊन भिडतात

त्या वेळी ज्ञानाच्या देवाणघेवाणीची प्रक्रिया तिथे परिपूर्ण झाली, असे समजता येते. अभ्यासाचे विषय अनंत आहेत व असतात. परंतु, कोणत्याही विषयातील ज्ञानाभ्यास अर्थपूर्ण ठरायचा असेल तर, तशा ज्ञानव्यवहाराचे आदिद्रव्य असणारी भाषा प्रतिपाद्य विषयानुरूप जाणीवपूर्वक घडवावी लागते. इथे कसोटी लागते. वक्त्याची. परंतु, इथे आणखीही एक गोष्ट ध्यानात ठेवावी लागते आणि ती अशी की, वक्ता अथवा शिक्षक जे शिकवतो आहे ते नीट समजावून घेण्यासाठी श्रोत्यांनादेखील स्वत:ला सक्षम बनवावे लागते. या बाबतीत परीक्षा असते ती श्रोत्यांची.

प्रतिपाद्य विषय श्रोत्यांपर्यंत अथवा विद्यार्थ्यांपर्यंत व्यवस्थित पोहोचावा यासाठी तुलनेने अधिक जबाबदारी येऊन पडते ती वक्त्याच्या अथवा शिक्षकाच्या खांद्यावर. समोरचा श्रोता नेमका कसा आहे, कोण आहे, त्याची पार्श्वभूमी कशी आहे याचा अदमास घेऊन जो अभ्यासविषय मांडायचा त्यासाठी अनुरूप अशी शब्दसंहती आणि भाषाप्रयोग वापरणे, हा ठरतो त्या जबाबदारीचा एक पैलू. परंतु, केवळ तेवढ्यानेदेखील भागत नसते. जो ज्ञानव्यवहार अध्यापक आणि विद्यार्थी यांच्यादरम्यान भाषेच्या माध्यमातून साकारणार असतो त्या व्यवहाराच्या मुळाशी असलेली वक्त्याची अथवा शिक्षकाची प्रेरणा व उद्देशदेखील या संदर्भात तितकाच कळीचा ठरतो. कारण शिक्षकाची प्रेरणा, ज्ञानव्यवहाराचा उद्देश आणि श्रोत्यांचे 'प्रोफाइल' या तीन बाबींवर भाषाव्यवहाराचा पोत आणि ज्ञानवहनाचे माध्यम निर्भर राहते. म्हणजे, अभ्यासाचा जो प्रांत निवडलेला आहे त्या प्रांतातील शास्त्रीय संज्ञा व त्या ज्ञानविषयाची रोकडी परिभाषा अध्यापनादरम्यान किती वापरायची आणि ज्ञानप्रदानाचे माध्यम व्याख्यानाचे ठेवायचे की अध्यापनाची शैली संवादप्रधान राखायची, याचे तारतम्य शिक्षकाला समोरच्या श्रोत्यांचे 'प्रोफाइल' ध्यानात घेऊन निश्चित करता येते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, ज्ञानाचे आदानप्रदान साध्य करण्यासाठी जो भाषाव्यवहार साकारावा लागतो त्यांत वक्ता, श्रोते, ज्ञानव्यवहारामागील वक्त्याची प्रेरणा व त्या उपक्रमामागील उद्देश, ज्ञानसंक्रमण परिणामकारकपणे घडून येण्यासाठी ज्ञानव्यवहारात उपयोजावयाच्या भाषेचे सक्षमीकरण, प्रत्यक्ष ज्ञानव्यवहाराचा आदिबंध (व्याख्यान/संवाद/चर्चा वा अन्य) आणि श्रोत्यांचे सक्षमीकरण (स्वत: श्रोत्यांकडूनच स्वप्रयत्नांद्वारे आणि/अथवा अध्यापकाकडून) इतक्या घटकांचा विचार क्रमप्राप्त ठरतो.

लोकभाषा असणाऱ्या मऱ्हाटी प्राकृताला ज्ञानव्यवहाराची भाषा बनविण्यासाठी प्रयत्नशील बनणाऱ्या वारकरी परंपरेतील संतविभूतींमध्ये अग्रक्रमाचा मान सर्वार्थाने जातो तो ज्ञानदेवांकडे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर संस्कृतेतर भाषांमधील पहिलीवहिली

टीका (‘ज्ञानेश्वरी’) निर्मून, देववाणी गणल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेतील ज्ञानठेवा लोकव्यवहाराचे अंग असलेल्या देशी भाषेमध्ये तितक्याच रसमय प्रत्ययकारकपणे रूपांतरित करवण्याचे मऱ्हाटी प्राकृताचे सामर्थ्य ज्ञानदेवांनी सिद्ध करून मराठी सारस्वताच्या पुढ्यात मांडले. तर, शैवमतातील ‘शैवागमा’सारखे एक आगळे दर्शन मऱ्हाटी प्राकृतामध्ये ‘अमृतानुभवा’च्या रूपाने सिद्ध करून, एक स्वतंत्र तत्त्वदर्शन प्रगट करण्याची लोकभाषेची क्षमताही त्यांनी समकालीन जनमानसाला पटवून दिली. नीतीबोधाच्या सिंचनाद्वारे लोकव्यवहार निरामय बनविण्यासाठी आध्यात्मिक ज्ञानदानाच्या माध्यमातून जनसामान्यांचे आंतरिक उन्नयन घडवून आणण्यासाठी जो भाषाव्यवहार ज्ञानदेवांनी सरूप-साकार केला त्याचे वैशिष्ट्य जाणून घेण्याचा काही एक प्रयत्न या ठिकाणी मांडलेला आहे. सन २०२४-२५ हे ज्ञानदेवांचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष होते. तर, दरवर्षीच्या भाद्रपद महिन्यातील वद्य षष्ठी ‘ज्ञानेश्वरी परिष्करण दिन’ म्हणून साजरी केली जाते. ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यानंतर, तत्कालीन ग्रंथव्यवहारातील प्रस्थापित कार्यपद्धतीनुसार ‘ज्ञानेश्वरी’च्या अनंत हस्तलिखित नकला वेळोवेळी अनेकांद्वारे केल्या गेल्या. साहजिकच, त्यांत प्रसंगोपात्त व कालपरत्वे नाना प्रकारचे अपपाठ व प्रक्षेप यांचा अंतर्भाव होत राहिला. अशा अपपाठांची व प्रक्षेपांची निवृत्ती घडवून आणत ‘ज्ञानेश्वरी’ची पाठशुद्ध संहिता सिद्ध करण्याचा महत्प्रयास पैठणनिवासी एकनाथमहाराजांनी आरंभला. त्या महद्योगाची सांगता भाद्रपद महिन्यातील वद्य षष्ठीला झाल्यामुळे त्या तिथीला ‘ज्ञानेश्वरी परिष्करण दिन’ साजरा केला जातो. यंदा भाद्रपद वद्य षष्ठी तारीख १३ सप्टेंबर २०२५ या दिवशी होती. या दोहोंचे औचित्य साधून, गीताबोधाचे प्रगटन मऱ्हाटी प्राकृताच्या माध्यमातून घडवत ज्ञानसंवाहनादरम्यान उपयोजावयाच्या भाषाव्यवहाराच्या विविध अंगांचे दर्शन ज्ञानदेवांनी त्यांच्या गीताटीकेमध्ये किती साक्षेपाने घडविलेले आहे, ते न्याहाळण्याचा प्रयत्न या लेखाच्या रूपाने इथे मांडलेला आहे.

‘ज्ञानेश्वरी’सारख्या ज्ञानव्यवहाराचे प्रवर्तन करण्यामागील ज्ञानदेवांची प्रेरणा, गीताबोधाला लोकभाषेचा अलंकार प्रदान करण्यामागील त्यांचा उद्देश, ‘ज्ञानेश्वरी’कथनासाठी ज्ञानदेवांनी योजलेला आदिबंध आणि श्रोत्यांचे सक्षमीकरण साध्य करण्यासाठी त्यांनी ग्रंथात केलेले दिशादर्शन यांचे, या ग्रंथातील भाषाव्यवहारात उमटलेले प्रतिबिंब निरखण्यासाठीच हा सारा खटाटोप! भाषाव्यवहारात थेट सहभाग असणाऱ्या विविध घटकांसंदर्भात ज्ञानदेवांनी त्यांच्या गीताटीकेमध्ये मांडलेला सूक्ष्म विचार, केवळ साहित्याशी निगडित असणाऱ्या भाषाव्यवहारातच नव्हे तर, कोणत्याही

विषयाच्या उहापोहाशी संबंधित भाषाव्यवहाराला लागू पडावा. प्रतिपाद्य विषय जिज्ञासू अध्ययनार्थींना नीट समजावा यासाठी शिक्षकाला किती अंगांनी प्रयत्न करावे लागतात, याचा काहीसा अदमास, ज्ञानदेवांनी आस्थेवाईकपणे मांडलेल्या विवेचनावरून येतो. अध्यापनासाठी केवळ संबंधित अभ्यासविषयातील परिभाषेशीच काय ती सलगी असून भागत नाही. तर, समोर बसलेल्या श्रोत्यांच्या मनीमानसी तो विषय मुरलाच पाहिजे, ही बांधिलकीदेखील शिक्षकाच्या ठायी तितक्याच तीव्रतेने जागृत असावयास हवी, यांवर ज्ञानदेवांचा कटाक्ष आहे. ती निष्ठा जाज्वल्य असली की, विषयाच्या साक्षेपी विवरणासाठी आणि त्या विषयाचा गाभा तितक्याच चोखपणे श्रोत्यांकडे संक्रमित केला जावा यासाठी, भाषेवर जी मेहनत घेणे अत्यावश्यक ठरते ती मेहनत अध्यापकाकडून आपसूकच घेतली जाते, या वास्तवाकडे ज्ञानदेव आवर्जून संकेत करत राहतात.

आपण सुरुवात करूया ती 'ज्ञानदेवी' नामक टीकाग्रंथाच्या निर्मितीमागील प्रेरणेपासून. 'ज्ञानेश्वरी'च्या सहाव्या अध्यायातील एक ओवी या संदर्भात मननीय ठरते. गीताबोधाला मऱ्हाटी प्राकृतामध्ये रूपांतरित करण्यामागील आपली प्रेरणा, ज्ञानदेव तिथे, ***तेणें कारणें मी बोलेन । बोलीं अरुपाचें रूप दावीन । अतींद्रिय परि भोगवीन । इंद्रियांकरवीं,*** अशा शब्दांत विदित करतात. जे तत्त्व अथवा जे ज्ञान मुळात इंद्रियगोचर नाही अथवा होणे अवघड आहे, ते शब्दाच्या माध्यमातून साकार करण्यासाठी मी सिद्ध झालेलो आहे, हे ज्ञानदेवांचे प्रतिपादन व्यवस्थित समजावून घ्यावयाचे तर मुळात श्रीमद्‌भगवद्‌गीतेची निर्मितीप्रक्रिया प्रथम स्पष्टपणे आकलन व्हायला हवी. कुरूक्षेत्रावर ऐन युद्धाच्या प्रारंभी किंकर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनाला कर्तव्यसन्मुख करण्यासाठी श्रीकृष्णाने केलेला उपदेश म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीता, हे सगळ्यांनाच ठाऊक असते. पण १८ अध्यायांमध्ये कृष्णाने विवरण केलेला तो बोध, प्रत्यक्षात, महाभारताच्या भीष्मपर्वामध्ये व्यासांनी शब्दबद्ध करून संग्रहित केल्यामुळेच आपल्यापर्यंत आज पोहोचू शकला, ही वस्तुस्थिती तितक्या प्रकर्षाने आपल्याला भावत नाही. कृष्णार्जुनांचा संवाद झाला तिथे व्यास प्रत्यक्ष हजर नव्हतेच. महाभारत रचले व्यासांनी. म्हणजे, कृष्णाने जो काही बोध अर्जुनाला केला त्याचा व्यासांपर्यंत आलेला वृत्तान्त अथवा तपशील त्यांनी शब्दबद्ध करून महाभारताच्या भीष्मपर्वात समाविष्ट केला. त्यालाच आम्ही 'श्रीमदभगवदगीता' असे म्हणतो. त्या, मूळ संस्कृतातील गीतेला ज्ञानदेवांनी बहाल केलेले देशी लेणे म्हणजे 'ज्ञानेश्वरी'.

म्हणजे, 'ज्ञानेश्वरी'च्या माध्यमातून कृष्णकृत बोधाचे जे शब्दरूप आज आपल्या पुढ्यात अवतरलेले आहे ते, वास्तवात, तीन चाळण्यांमधून प्रवास करून आलेले आहे. मुदलात, आपल्या मनात जे विचार उमटतात ते तितक्याच समर्पक रूपात अभिव्यक्त करण्यासाठी, अनेकदा, आपल्याला अचूक व नेमके अर्थवाही शब्द गवसतातच असे नाही. मग, जे व्यक्त करायचे आहे त्या आशयाशी सगळ्यांत जवळ पोहोचणारी शब्दरूपे हाताशी घेऊन आपण बोलतो अथवा लिहितो. ही झाली पहिली चाळणी. कित्येकदा असेही होते की मनात उमटलेले सगळेच विचार प्रगट करणे शक्य नसते अथवा उचितही नसते. अनेकदा संवाद घडतो तो शब्दांविनाच. कारण, वैखरीची ताकद तिथे उणी पडते. अशा वेळी संभाषण साकारते मौनाच्या परिभाषेद्वारे. असे मौन 'बोलके' असते, असे आपण म्हणतो. परंतु, काही आशय असाही असतो की, त्याचे संवाहन करण्यासाठी बोलके मौनदेखील शबल शाबीत होते. अशा व्यवहारात, मग, मौनही 'मौन' धारण करते. ***म्हणौनि माझी वैखरी । मौनातें म्हणे मौन करी । हे पाणियावरी मकरी । रेखिली जैसी,*** ही ज्ञानदेवांची त्यांच्या 'अमृतानुभवाती'ल ओवी, नेमका तोच आशय व्यक्त करते. काही प्रांत असे असतात की, त्या प्रांतांतील संवाद मौन धारण केलेल्या मौनाद्वारेच फुलत राहतो! त्यांमुळे, अर्जुनाला कर्तव्याभिमुख करण्यासाठी जे काही हृदयापासून सांगायचे आहे ते शब्दरूपामध्ये अवतरत असताना जे काही शब्दांच्या फटीतून निसटून गेलेले असेल, तिथे कृष्णार्जुनांच्या संवादातील पहिली चाळणी लागली.

कुरुक्षेत्रावरील कृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद सत्यवतीपुत्र व्यासांनी, त्यांना ज्या माध्यमातून तो हस्तगत झाला त्याला अक्षररूप प्रदान करून महाभारतामध्ये समाविष्ट केला. ही झाली दुसरी चाळणी. आणि, संस्कृतामधील त्या गीतेवर ज्ञानदेव मऱ्हाटी प्राकृतामध्ये प्रतिपद टीका करतात, तिथे सक्रिय होते तिसरी चाळणी. कारण, या सगळ्या चाळण्यांमधून जे संक्रमित झाले ते सत्त्व पुन्हा शब्दांनी जाणताच येत नाही, असा हवाला खुद्द ज्ञानदेव पहिल्याच अध्यायात, ***हें शब्देंविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआधीं झोंबिजे । प्रमेयासि,*** इतक्या नितळ शैलीत देतात. म्हणजे, ध्वनिरूपाने कुरुक्षेत्रावर प्रगटलेला कृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद स्वरूपत:च अरूप होता. त्या अरूपाला, प्रथम, व्यासांनी शब्दरूप प्रदान केले आणि व्यासनिर्मित त्या संस्कृत शब्दरूपाला आता मऱ्हाटी प्राकृतात मी तुमच्या पुढ्यात मांडतो आहे, हे ज्ञानदेव सांगतात. ***आणि तोचि हा मी आंता । व्यासाचीं पदें पाहतां पाहतां । आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया,*** हे ज्ञानदेवांचे कथन तोच सारा क्रम स्पष्ट करते.

'ज्ञानदेवी'नामक श्रोतृसंवाद निर्मिण्याचा हा झाला प्राकृतिक अथवा भौतिक हेतू. परंतु, या भाषाव्यवहाराद्वारे समाजमनावर कोणते संस्कार घडणे अथवा घडवणे ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे, हेदेखील बघायला हवे. कारण, कोणत्याही सकारात्मक भाषाव्यवहाराचा अंतिम हेतू समाजव्यवस्थेमध्ये कालानुरूप सुभग असे परिवर्तन घडवून आणणे, हाच असतो अथवा असावयास हवा. 'ज्ञानेश्वरी'च्या १२व्या अध्यायाच्या प्रारंभी जे नमन ज्ञानदेवांनी घातलेले आहे, त्यांतील एक ओवी या संदर्भात अतिशय सूक्ष्म व तितकीच मार्मिक आहे. व्यासांच्या देववाणीला मऱ्हाटी प्राकृताचा पेहराव चढवण्यामागील माझा अंतिम हेतू, ***साहित्यसोनियाचिया खाणी । उघडवी देशियेचिया आक्षोणी । विवेकवेलीच लावणी । हों देई सैंघ,*** हे ज्ञानदेवांचे शब्द विलक्षण सूचक होत. इथे मराठी समाजमनाला ज्ञानदेवांनी उपमा दिलेली आहे सुपीक भूमीची. या देशातील सुपीक शेतजमिनीमध्ये (आक्षोणी) विवेकवेलीची घनदाट लावणी मला करायची आहे, असे ज्ञानदेव या ओवीमध्ये सांगतात. समाजव्यवहारात फोफावलेल्या अविवेकाच्या पसाऱ्याचा पुरत बीमोड करायचा तर विवेकरूपी एकटी-दुकटी वेल पुरणार नाही, त्यासाठी विवेकवेलींची घनदाट लावणीच करावी लागेल, असे ज्ञानदेव अधोरेखित करतात. कोणत्याही काळातील समाजव्यवहारात विवेकाचे भरणपोषण घडवून आणणे हा भाषाव्यवहाराचा अंतिम उद्देश असावयास हवा, यांवर ज्ञानदेवांचा कटाक्ष आहे.

असा नागर आणि भद्र हेतू असलेला भाषाव्यवहार अखेर कोणासाठी साकारावयाचा हा मग ठरतो पुढचा मुद्दा. इथे कळीचे ठरते ते श्रोत्यांचे 'प्रोफाइल'. अभ्यासाचा जो प्रांत सुकर बनविण्यासाठी जो भाषाव्यवहार समूर्त करायचा त्याचा 'टार्गेट' श्रोता कोण आहे, त्याची सांस्कृतिक-शैक्षणिक-सामाजिक पार्श्वभूमी नेमकी कशी आहे, त्याचे आकलन कितपत असेल, त्याच्या धारणाशक्तीची लांबी-रुंदी-खोली किती आहे याचा सम्यक् विचार करूनच शिक्षकाला अथवा अध्यापकाला भाषाव्यवहाराचा पोत निश्चित करावा लागतो. या वस्तुस्थितीची स्वच्छ कल्पना व्यासांनादेखील होती. मुळात, कृष्ण आणि अर्जुन या उभयतांमध्ये कुरुक्षेत्रावर दोन सैन्यांच्या मधल्या मैदानात जो मोकळा-ढाकळा संवाद झाला तो व्यासांनी शब्दबद्ध का व कोणासाठी केला असावा, असा गर्भित प्रश्न उपस्थित करून ज्ञानदेवच त्याचे उत्तर देऊन टाकतात. 'ज्ञानेश्वरी'च्या १८व्या अध्यायात उपसंहाराच्या ज्या ओव्या ज्ञानदेवांनी रचलेल्या आहेत त्यांतील, ***तैसें शब्दें जें न लभे । तें घडुनियां अनुष्टुभें । स्त्रीशूद्रादि प्रतिभें । सामाविलें,*** ही ओवी फार मौलिक आणि मार्मिक आहे. व्यासकालीन

समाजव्यवस्थेने तत्कालीन समाजरचनेमधील चारी वर्णांतील स्त्रिया आणि 'शूद्र' म्हणून निर्देशित केलेले लोकसमूह या ज्या दोन समाजघटकांना वेदाध्ययनाद्वारे (आत्म)ज्ञानसंपादनाचा अधिकार नाकारलेला होता अशा दोन घटकांसाठी उपनिषदांचे (म्हणजेच वेदान्ताचे) सारसर्वस्व असणारे कृष्णकथित गीताशास्त्र समाजमनस्क महर्षी व्यासांनी शब्दांकित केले, हे ज्ञानदेव विदित करतात. जिज्ञासू परंतु वंचित अशा ज्ञानार्थींवर, त्यांद्वारे, व्यासांनी थोर उपकारच केले म्हणून, ज्ञानदेव, ***ह्मणौनि व्यासाचा हा थोरू । विश्वा जाला उपकारू । श्रीकृष्णउक्त आकारू । ग्रंथाचा केला,*** अशा शब्दांत व्यासांचे विश्वावरील उपकार व्यक्त करतात. भारतीय ज्ञानपरंपरेमध्ये वेदवाङ्मयाचा निर्देश 'शब्द' या सांकेतिक संज्ञेद्वारे पूर्वापार होत आलेला आहे. वेदाध्ययनाचा अधिकार नाकारलेल्या समाजघटकांवर, त्याच वेदांचे कृष्णमुखातून शब्दरूपाने प्रगटलेले अ-रूप सार समाजमनस्क व्यासांनी त्याला अक्षररूप चढवून ग्रंथग्रथित केले, यासाठी व्यासांचे ऋण ज्ञानदेव व्यक्त करतात.

म्हणजे, प्रथम व्यासांच्या आणि त्या नंतर ज्ञानदेवांच्या डोळ्यांपुढील जो श्रोता आहे तो कोणत्याही प्रकारच्या औपचारिक ज्ञानव्यवहाराच्या मांडवाखालून न गेलेला, किंबहुना, ज्ञानक्षेत्रात मुदलात प्रवेशच नाकारलेला असा आहे. अशा जिज्ञासूंपर्यंत स्वरूपत: अ-रूप असणारा ज्ञानठेवा शब्दावगुंठित करून प्रत्ययकारकरीत्या पोहोचवायचा तर, भाषाव्यवहार सुसेव्य बनवायला हवा याची ज्ञानदेवांना पुरती जाणीव आहे. गीताबोधाद्वारे प्रसृत झालेले जीवनशास्त्र अवगत करून घेण्यासाठी उत्सुक असलेल्या ज्ञानार्थींना त्या बोधगंगेमध्ये बुडी मारणे तिथवर अशक्य होते कारण, व्यासरचित तो सारा बोध त्या समाजसमूहांना अगम्य असणाऱ्या संस्कृतामध्ये बंदिस्त होता. इथे, ज्ञानदेवांनी एक अतिशय मनोज्ञ दृष्टान्त दिलेला आहे. ***तीरें संस्कृताचीं गहनें । तोडोनि मऱ्हाठीया शब्दसोपानें । रचिलीं धर्मनिधानें । निवृत्तिदेवें,*** ही ओवी या संदर्भात मननीय ठरते. गीताबोधरूपी जो ज्ञानप्रवाह प्रदीर्घ काळापासून या भूमीमध्ये वाहतो आहे त्यांत बुडी मारण्यासाठी धडपडणाऱ्या ज्ञानेच्छूंना त्या प्रवाहाचे संस्कृत भाषारूपी झाडाझुडपांनी गजबजलेले किनारे प्रवाहात उतरणे अशक्य शाबीत करत असल्यामुळे, उभय तीरांवरून ज्ञानेच्छूंना प्रवाहापर्यंत नेऊन पोहोचविणाऱ्या मऱ्हाटी प्राकृत भाषारूपी पायऱ्या, माझे गुरू निवृत्तिनाथ यांच्या प्रेरणेने निर्माण करण्यास मी सरसावलो आहे, हा भाव ज्ञानदेव इथे व्यक्त करतात. म्हणजेच, ज्ञानव्यवहाराचा आशय विद्यार्थ्यांना सुलभपणे आत्मसात करता यावा अशा प्रकारचा भाषाव्यवहार निर्माण करणे, ही शिक्षकाची जबाबदारी होय या सूत्राकडे ज्ञानदेवांचा निर्देश आहे.

आता, जो प्रतिपाद्य विषय आहे तो त्या त्या विषयातील प्रस्थापित परिभाषेतील तांत्रिक संज्ञा-संकल्पनांनिशी मांडायचा की, पुढ्यातील अभ्यासार्थींची पार्श्वभूमी आणि आकलनक्षमता यांचा अदमास घेऊन त्यानुरूप भाषेचे माध्यम सिद्ध करायचे, हा पुढचा मुद्दा इथे निर्माण होतो. या संदर्भातही, ज्ञानदेवांनी अर्जुनाच्या मुखातून एक विनंती मुखर केलेली आहे. ***म्हणोनि आइकें देवा । हा भावार्थु आतां न बोलावा । मज विवेकु सांगावा । मऱ्हाटा जा,*** ही चौथ्या अध्यायातील ओवी या संदर्भात कमालीची सूचक आणि बोलकी आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांची भूमिका ज्ञानदेवांनी इथे अर्जुनाकडे सोपविलेली आहे. माझ्या हिताचे जे ज्ञान तू मला सांगणार आहेस ते मला कळेल अशा भाषाशैलीद्वारे तू माझ्यापर्यंत पोहोचव, अशी अर्जुनाची विनवणी आहे. 'मऱ्हाटा बोल' या शब्दसंहतीचा अर्थ साधे, सरळ, सोपे आणि जडजंबाल नसलेले शब्द. प्रतिपाद्य विषय त्या अभ्यासप्रांतातील रोकड्या शास्त्रीय परिभाषेत न मांडता अध्यापकाने तो विषय तो सुलभ शब्दांत उकलून सांगावा, हे ज्ञानाच्या देवाणघेवाणीदरम्यान योजावयाच्या भाषाव्यवहारासंदर्भातील सूत्र ज्ञानदेव इथे निर्देशित करतात.

परंतु, सोपी, सरळ आणि करकरीत पारिभाषिक संज्ञा अथवा शब्दसंहती न वापरता एखादा गहन अभ्यासविषय सुघड शैलीत सुसेव्य करून सादर करायचा हे


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

कमालीचे अवघड काम ठरते. सोपे बोलणे म्हणजे पांचट बोलणे नव्हे. अवघड विषय सोपा करून मांडण्यासाठी किमान तीन बाबींची गरज असते. पहिले म्हणजे, अध्यापकाला प्रतिपाद्य विषयाचे अंगोपांग अतिशय व्यवस्थित आत्मसात झालेले असावयास हवे. दुसरे म्हणजे, ज्ञानव्यवहार ज्या भाषेत साकारावयाचा आहे त्या भाषेशी त्याची अतिशय उत्तम सलगी असली पाहिजे. कोणत्याही ज्ञानशाखेतील कठीण पारिभाषिक संज्ञा-संकल्पनांना केवळ व्यवहारातील भाषेमधील प्रतिशब्द योजून भागत नसते. तर, त्या त्या तांत्रिक संज्ञेचा आशय तितक्याच प्रत्ययकारीपणे संक्रमित करण्यासाठी बोली व्यवहारातील भाषेचेदेखील संवर्धन घडवावे लागते. आणि तिसरी, कदाचित सर्वांत महत्त्वाची निकड म्हणजे, शिकवण्याची बावनकशी तळमळ शिक्षकाच्या अंगी असलीच पाहिजे. जो विषय आपण सादर करतो आहोत तो समोर बसलेल्या जिज्ञासूंना, त्याच्या बारीकसारीक पदर-उपपदरांसह व्यवस्थित अवगत व्हावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहण्याची निष्ठा अध्यापकाच्या ठायी मुबलक असली तरच तो ज्ञानव्यवहार फलदायी शाबीत होतो. श्रीकृष्णकृत गीताबोधाचे हृदगत मऱ्हाटी शैलीत मांडायचा, आणि तोही पुन्हा कोणत्याही प्रकारच्या ज्ञानव्यवहाराचे संस्कार न घडलेल्या श्रोतृसमूहाच्या पुढ्यात, म्हणल्यानंतर मऱ्हाटी प्राकृतालादेखील त्यासाठी सरसे करून घेणे अनिवार्य ठरते. मऱ्हाटी प्राकृताच्या अंगभूत सामर्थ्यांबद्दल ज्ञानदेव नि:शंक होते, हे वास्तव, ***माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजांसीं जिंके । ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन,*** या त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण कथनात पुरेपूर सिद्ध होते.

भाषेच्या ठायी असलेले अंगभूत शब्दसामर्थ्य त्याच वेळी तितकेच रुचकर आणि रसपूर्णही असले पाहिजे, ही बाब, ज्या समाजसमूहांसाठी गीतागत ज्ञानठेवा उघड करण्यासाठी आपण सरसावले आहोत त्यांच्या लेखी अधिकच संवेदनशील ठरते याचे नेमके भान ज्ञानदेवांना होते. त्यांमुळे, लोकभाषेचे उपयोजन सूक्ष्म अशा अभ्यासप्रांतातील प्रमेये समजावून देण्यासाठी करावयाचे तर त्यासाठी व्यवहारभाषा एकाच वेळी आशयघन आणि रसमय पद्धतीने उपयोजली जाणे अगत्याचे ठरते. त्यासाठी, प्रथम कंबर कसावी लागते वक्त्याला अथवा अध्यापकाला. ग्रंथारंभी, ज्ञानदेव म्हणूनच वंदन करतात ते बुद्धिदात्या विनायकाला.

परंतु, इथे असलेली एक अतिशय वैशिष्ट्यपूर्ण बाब चट्दिशी ध्यानात येत नाही. ज्ञानदेवीला प्रारंभ करतेवेळी ज्ञानदेवांनी जो गणेश वंदिलेला आहे तो 'शब्दगणेश' होय, ही ती बाब. ज्ञानदेवांच्या लेखी गणेश हे मूर्तिमंत शब्दब्रह्मच होय. ***हें शब्दब्रह्म***

***अशेष । ते चि मूर्ति सुरेख । जेथें वर्णवपु निर्द्दोष । मिरवत असे,*** ही त्यांची ओवी निर्देश करते तो त्याच धारणेकडे. या संदर्भात, वारकरी श्रद्धाविश्वामध्ये आराध्य गणल्या जाणाऱ्या दैवतमंडळात गणेश या बुद्धिदेवतेची प्रतिष्ठा नेमकी काय कल्पिलेली आहे, तिचा परिचय करून घेणे अगत्याचे ठरते. सर्वसाधारण धारणेनुसार गणपती हे आपल्या दैवतमंडलात बुद्धिदाते दैवत म्हणून विराजमान आहे. पंढरीचा श्रीविठ्ठल हे वारकरी संप्रदायाचे अधिष्ठात्रे दैवत होय. विठ्ठल हा वारकरी उपासनेच्या क्षेत्रात देवाधिदेव म्हणून प्रतिष्ठित आहे. साहजिकच ते सर्वश्रेष्ठ दैवत गणले जाते. त्यांमुळे, तुकोबांच्या प्रमाणानुसार, श्रीविठ्ठल हाच बुद्धिदाता होय. ***बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे,*** हे तुकोबांचे वचन त्याच धारणेची पुष्टी करते. आता, मुद्दा असा उपस्थित होतो की, बुद्धीचा जनिता जर श्रीविठ्ठल असेल तर मग वारकरी श्रद्धाविश्वात गणेशाचे त्यासापेक्ष स्थान नेमके कोणते, असा. इथे आपल्या मदतीला येतात तुकोबा. गणेश हे दैवत, प्रत्येक व्यक्तीला लाभलेल्या बुद्धीवर संस्कार करून तिला पैलू पाडणारे असे दैवत होय, अशी तुकोबांची धारणा दिसते. याच वास्तवाची साक्ष आपल्याला पटते तुकोबांच्या अभंगांत.

तुकोबांच्या गाथेमध्ये 'नाट' या नावाचे अभंगांचे एक प्रकरण आहे. गाथेमध्ये या प्रकरणात अभंग आहेत एकंदर ६३. त्यांतही मोठी गंमत आहे. या ६३ 'नाटां'मध्ये ५६ 'नाट' आहेत तुकोबांचे तर, उरलेले सात 'नाट' रचलेले आहेत ते तुकोबांचे धाकटे बंधू कान्होबा यांनी. वारकरी परंपरेतील संतमालिकेत 'नाट' हा अभंग प्रकार आढळतो तो केवळ तुकोबांच्या गाथेतच. हे सगळे अभंग चौ-चरणी असून प्रत्येक चरणात चार ओळी आहेत. या अभंगगुच्छाची एकंदर रचना बघितली तर ती प्रबंधाच्या अंगाने जाणारी दिसते-भासते. असा अदमास बांधायलादेखील एक कारण आहे. ते असे की, तुकोबांचे हे जे ५६ 'नाट' आहेत त्यांतील पहिले दोन अभंग गणेशवर्णन करणारे आहेत. साधारणपणे, कोणत्याही प्रबंधलेखनाची सुरुवात बुद्धिदेवता गणल्या जाणाऱ्या गणेशवंदनाने होते अथवा केली जाते, हा परंपरागत संकेत आहे. त्यांमुळे, गणेशाचे रूप-गुण वर्णन करणारे तुकोबांचे हे दोन नाट लक्षणीय ठरतात. या दोन अभंगांमधील पहिल्याच अभंगातील प्रथम चरण अतिशय मार्मिक आहे. ***प्रथम नमन तुज एकंदता । रंगीं रसाळ वोडवीं कथा । मति सौरस करीं प्रबळता । जेणें फिटे आतां अंधकार,*** अशा त्या अभंगाच्या या पहिल्या चरणातील प्रत्येक शब्द आशयघन असाच आहे. मी एक कथाख्यान मांडण्यास सिद्ध झालेलो आहे, असे तुकोबा प्रथमच विदित करतात. ते कथाख्यान कशा प्रकारे सिद्धीस

जावे, यांबाबतची आपली अपेक्षादेखील तुकोबांनी गणेशाच्या पुढ्यात स्पष्ट केलेली आहे. त्या माझ्या कल्पनेबरहुकूमच हे कथाख्यान अवतरावे यासाठी तू माझ्यावर कृपा कर, अशी तुकोबांची विनवणी आहे. जी कथा मांडायला मी बसलेलो आहे ती कथा रसाळ आणि श्रोत्यांना रंगवून टाकणारी असावी, ही तिची आद्य मागणी होय. परंतु ती कथा केवळ रसाळ आणि रंजक असून भागणार नाही तर, तिच्या श्रवणामुळे अज्ञानरूपी अंधकारही दूर व्हायला हवा, असेही तुकोबांचे कथन सांगते. म्हणजेच, ही कथा सक्षम हवी आणि रसाळही. सामर्थ्य आणि रसवत्ता या उभय गुणांनी युक्त असणारे कथाख्यान मांडण्यास मी सरसावलो असल्यामुळे, हे एकदंता,तू माझी बुद्धी कणखर (प्रबळ अर्थात शक्तिभारित) आणि प्रसाद, गोडवा, प्रसन्नता (सौरस) यांसारख्या गुणांनी मंडित होईल अशी कृपा कर, हा तुकोबाकृत 'नाटा'तील या अभंगाच्या पहिल्याच चरणाचा गाभा होय. सौरस या शब्दाचा आणखी एक अर्थ 'आसक्त' असाही आहे. मी मांडलेले कथाख्यान सिद्धीस जाईपर्यंत माझी बुद्धी तुझ्याच रूपागुणाशी आसक्त होऊन राहील आणि तिच्याद्वारे प्रसवणारे माझे शब्द रसवत्ता आणि ज्ञानमयता यांनी परिपूर्ण असावेत, यासाठी प्रथम तुला नमन करतो आहे, हा आशय या चरणात तुकोबा व्यक्त करतात. म्हणजेच, श्रीविठ्ठलाच्या कृपेने जी काही बुद्धी मला जन्मजात लाभलेली आहे तिला रसवत्ता आणि सामर्थ्य प्रदान करून अज्ञानाचा अंधकार फेडून टाकण्याची शक्ती तिच्याद्वारे निर्माण होणाऱ्या शब्दसंभारास लाभावी, ही गणेशवंदनामागील तुकोबांची प्रेरणा इथे अगदी स्पष्ट दिसते. वारकरी श्रद्धाविश्वातील श्रीविठ्ठल आणि गणराय या दोन दैवतांची व्यवस्था यावरून स्पष्ट व्हावी. बुद्धीचा जनिता असणाऱ्या आराध्य दैवत पांडुरंगाने जी काही बुद्धिमत्ता प्रदान केलेली आहे त्या निसर्गदत्त बुद्धीला पैलू पाडणारे दैवत म्हणजे गणेश, अशी ही व्यवस्था आहे. त्याच धारणेचे पडसाद आपल्याला ज्ञानदेवांनी मांडलेल्या गणेशवंदनामध्ये जाणवतात. गणेश म्हणजे मूर्तिमंत शब्दब्रह्मच, ही ज्ञानदेवांची धारणा या संदर्भात पुन्हा एकवार अभ्यसनीय ठरते.

शब्द हे तर कोणत्याही भाषाव्यवहाराचे आद्य मूलद्रव्य. लोकव्यवहारामध्ये वापरल्या जाणाऱ्या लोकभाषेचे रूपांतर ज्ञानव्यवहाराच्या प्रांतात उपयोजावयाच्या ज्ञानभाषेमध्ये करायचे तर, शब्दांच्या अंगी वसणाऱ्या सामर्थ्याची अंतर्बाह्य पुरेपूर ओळख संवादकर्त्याला असणे अनिवार्य ठरते. संवादादरम्यान आणि/अथवा ज्ञानप्रदानादरम्यान श्रोत्यांपर्यंत जो आशय संक्रमित करावयाचा आहे तो त्यांच्यापर्यंत यथायोग्य व परिपूर्णपणे पोहोचावा यासाठी वक्त्याची शब्दब्रह्माशी सलगी असायलाच

हवी. कारण, शब्दांच्या अर्थांतराचे पदर व उपपदर अचूक जाणणारा अध्यापकच ज्ञानव्यवहार नेमका, सुसेव्य आणि परिणामकारक बनवू शकतो, हे इंगित ज्ञानदेव जाणून आहेत. वरकरणी मोजके अस्तित्वरूप असणारे शब्द हे भाषाव्यवहाराचे मूलद्रव्य, वस्तुतः, त्यांच्या पोटात आशयाचा महासागर वागवित असतात. निव्वळ बाह्यरूपावरून शब्दांच्या आशयघनतेची लांबी–रूंदी–खोली यांचा अदमास लागणे अशक्यच. ***जैसें बिंब तरी बचकें एवढें । परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी,*** हे ज्ञानदेवांचे कथन निर्देश करते त्याच वास्तवाकडे. शब्दांचे असे असाधारण असणारे व्यापकपण सर्वार्थाने आकळावयाचे तर, अभ्यासकाला शब्दांच्या धातुरूपादी अवयवांचा सर्वांगीण परिचय असणे गरजेचेच ठरते. त्यासाठी, अभ्यासकाचा शब्दाभ्यास चांगला पक्काच हवा. शब्द, शब्दांची रूपे, शब्दाचा मूळ धातू, शब्द प्रगट करत असणारे भाव यांचे अचूक आकलन करून घेणाऱ्यांची अवस्था जणू, मनोईप्सित पूर्ण करणारे ‘चिंतामणी’ रत्नच हस्तगत व्हावे अशी बनते, असे ज्ञानदेवांचे या संदर्भातील कथन अर्थपूर्ण आहे. ***तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण । पाठेयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे,*** असे ज्ञानदेव म्हणतात ते उगीच नाही.

ज्ञानदेवांची ही ओवी अतिशय सूचक आहे. ज्ञानव्यवहारामध्ये लोकभाषेचे उपयोजन घडवून आणण्यासाठी सिद्ध झालेला अभ्यासकच केवळ नव्हे तर, त्या ज्ञानव्यवहाराचा दुसरा घटक असणाऱ्या जिज्ञासू अभ्यासार्थीलादेखील शब्दांचे ज्ञान व शब्दार्थाचे आकलन चोखच असले पाहिजे, हे ज्ञानदेव इथे अधोरेखित करतात. शब्दाच्या मूलार्थाचे व शब्दाच्या मूलरूपाचे तर त्याचे ज्ञान पायाशुद्ध असलेच पाहिजे परंतु, त्याही पुढे जाऊन शब्दाचा मूळ जो धातू त्याचेही ज्ञान शुद्धच असले पाहिजे, यावरही ज्ञानदेवांचा कटाक्ष आहे. शब्द, शब्दार्थ, तो शब्दार्थ अचूकपणे आकलन होण्यासाठी शब्दाचा मूळ धातू या तीनही अंगांमध्ये त्या ज्ञानव्यवहारातील उभय घटक (वक्ता व श्रोता) पारंगत असे तज्ज्ञ असावेत ही ज्ञानदेवांची अपेक्षा आहे. तरच तो ज्ञानव्यवहार अर्थपूर्ण बनतो, याकडे ज्ञानदेव आपले लक्ष वेधतात. आता, भाषाव्यवहारामध्ये शब्दाची अनेक रूपे, मूळ शब्दाला प्रत्यय–उपसर्गादी लगडलेली वलये अवतरावीत हे स्वाभाविकच ठरते. शब्दाच्या अर्थगाभ्याला भिडायचे तर, शब्दाभोवतीची ती आवरणे ज्ञातेपणाने दूर करून त्याच्या अर्थाला बिलगले तरच (अध्यापक आणि अभ्यासार्थी यांच्यादरम्यानचा) ज्ञानव्यवहार उभयपक्षी पुरेपूर अर्थपूर्ण शाबीत होतो, हे मार्गदर्शक तत्त्व, ज्ञानदेव, ***आहाच बोलाचि वालीफ***

***फेडिजे । आणि ब्रह्माचेया चि आंगा घडिजे । मग सुखेसी सुरवाडिजे । तेया माझि,*** अशा शब्दांत उलगडून मांडतात. असे व्यापकत्व अंगी सामावलेले शब्दब्रह्म नीट आकळायचे तर त्या शब्दब्रह्माचा मूर्तावतार असणाऱ्या गणेशाची कृपा ग्रंथारंभीच प्राप्त करून घेण्यासाठी ज्ञानदेव गणेशनमनाला प्रवृत्त होतात.

गणेशाला वंदन करण्यासाठी सरसावलेले ज्ञानदेव, प्रथम, त्याचे रूपवर्णन करतात. ज्ञानदेवांनी मांडलेले हे रूपवर्णन लाडूमोदकप्रिय गणेशाचे नसून शब्दब्रह्मस्वरूप गणेशाचे आहे, हे वास्तव आपण नीट समजावून घ्यावयास हवे. ज्ञानदेवांना इथे अभिप्रेत असलेले गणेशदर्शन म्हणजे अपार आशयघनता अंगी सामावलेल्या शब्दनामक आदिद्रव्याचे अंतर्बाह्य सर्वांगीण, सखोल ज्ञान ज्याच्या ठिकाणी समूर्त साकार नांदते आहे अशा विराट ज्ञानी शब्दप्रभूचे दर्शन होय. गणेशाची सोंड, त्याचा शुभ्रवर्णी असा, न तुटलेला, सरळ एक दात, गणेशाचे बारीक असे डोळे या सगळ्यांचा ज्ञानदेवांनी लावलेला अन्वय आपल्याला त्या दिशेनेच समजावून घ्यावयास हवा. त्या दृष्टीने, ज्ञानदेवांच्या गणेशवंदनातील दोन ओव्या विलक्षण अर्थवाही ठरतात. विघ्नराज गणेश हा समताधिष्ठित संवादासाठी उत्सुक असा विलक्षण बुद्धिमान ज्ञानदाता होय, ही ज्ञानदेवांची धारणा, ***तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु। देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु,*** अशा अर्थवाही शब्दांत अवतरलेली आहे. 'उन्मेष' म्हणजे बुद्धी. 'अक्ष' म्हणजे डोळा. शब्दप्रभू गणेशाचे, त्याच्या मस्तकाच्या मानाने आकाराने लहान असणारे नेत्र अपरिमित बुद्धिमान ज्ञात्याचे सूचन घडवतात, असे ज्ञानदेवांचे कथन आहे. ज्ञानप्रदानासाठी जो शब्दव्यवहार अभ्यासक साकारतो त्या शब्दव्यवहारातील प्रत्येक शब्दातून झिरपणारा सूक्ष्मातिसूक्ष्म आशय अचूक टिपणाऱ्या दृष्टीचे सूचन गणेशाचे बारीक अक्ष (म्हणजेच नेत्र) घडवितात, असे ज्ञानदेवांचे स्पष्टीकरण आहे. तर, ज्ञानव्यवहाराचा विषय असणाऱ्या अभ्यासप्रांताचे पदर-उपपदर हळुवार प्रगल्भतेने उलगडण्याची सक्षमता आणि त्यासाठी आवश्यक असणारे पैलू शब्दप्रभूने त्याच्या बुद्धीला पाडलेले असतात, हेदेखील ज्ञानदेव विवरून सांगतात.

जिज्ञासूंपर्यंत अभ्यासविषय आशयपूर्ण रीतीने संक्रमित व्हावा यासाठी शब्दप्रभू अभ्यासक ज्या माध्यमांचा विनियोग करतो ते माध्यमदेखील ज्ञानदेवांनी याच ओवीमध्ये निर्देशित केलेले आहे. गणेशाला 'एकदंत' असे नाव आहे. गणपतीच्या दोन दातांपैकी एक तुटलेला असल्याने अर्धा तर दुसरा दात पूर्ण आहे. हा पूर्ण असलेला दात अतिशय शुभ्र आहे, असेही ज्ञानदेव सांगतात. आता, इथे एक सूक्ष्म संकेत दडलेला आहे. 'संवाद' हा समतेच्या अधिष्ठानावरच संभवतो आणि फुलतो, हे ज्ञानदेव इथे

सुचवतात. श्रेष्ठ-कनिष्ठ भावावर बेतलेले नाते जिथे नांदते तिथे 'संवाद' साकारणे स्वरूपत:च अशक्य. तिथे देवाणघेवाण जी होते ती स्वभावत: आज्ञार्थी अथवा उपदेशात्मक अशीच असणार. ज्ञानव्यवहार सुभगपणे साकारण्यासाठी तिथे समतेची बैठक असली पाहिजे, असा ज्ञानदेवांचा आग्रह नीट समजावून घ्यावयास हवा. अध्यापक आणि विद्यार्थी या दोन घटकांमध्ये अधिकारपरत्वेच श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व अध्याहृत आहे आणि साहजिकही. अशा परिस्थितीत, तिथे 'संवाद' कसा अवतरावा, अशी शंका कोणाच्याही मनात उमटेल. इथे, ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे ती संवाद या संकल्पनेच्या आदिबंधाइतकीच संवादाच्या मुळाशी असणारी भावस्थिती. त्या भावस्थितीचा संबंध पोहोचतो तो ज्ञानदेवांच्या पुढ्यात असणाऱ्या श्रोतृवृंदाशी त्यांच्या असलेल्या नात्याच्या पोताशी.

'ज्ञानदेवी'च्या कथनाद्वारे श्रोतृवृंदाशी ज्ञानदेवांचे प्रतीत होणारे नाते आहे सख्यत्वाचे. किंबहुना, 'सख्य'भाव हा ज्ञानदेवांचा सहजभावच जणू. ज्ञानदेवांचे हृदय आईचे आहे, हे नि:संशय. मातृत्वभावाच्या त्या अधिष्ठानावरच ज्ञानदेवांच्या सख्यभावाची इमारत उभारलेली आहे. त्यांच्या दृष्टीत सर्वत्र आणि सदा सर्वकाळ हे सख्यत्व ओतप्रोत भरलेले आहे. त्याच नजरेने ते अंतर्बाह्य जगाकडे बघतात, असे पदोपदी जाणवते. दारी हाळी देणारा कावळा त्यांना, पंढरीरायाच्या आगमनाकडे संकेत करणारा सखा भासतो त्याचे कारण तेच. विटेवर उभ्या असणाऱ्या सावळ्या सुंदरीला, ***तू विटेवरी सखये बाई,*** म्हणून ज्ञानदेव प्रेमभराने पुकारतात ते तिच्याशी सख्यत्वाचे नाते असल्यामुळेच. पंढरीक्षेत्रामध्ये समचरण आणि समदृष्टी उभ्या ठाकलेल्या विठ्ठलमूर्तीला न्याहाळून स्वत:ला झालेला सुखानंद ज्ञानदेव, ***सुख झाले वो साजणी,*** अशा शब्दांत सांगतात त्यांच्या सखीलाच. ज्ञानदेवांच्या अभंगगाथेत एक संपूर्ण प्रकरण 'बुद्धीरूपी सखीशी संवाद' या शीर्षकाचे आहे. श्रीगुरू आणि शिष्य यांच्यादरम्यानच्या नात्याचे वर्णनदेखील, 'अमृतानुभवा'त ज्ञानदेव, ***याचियां सख्याची नवाई,*** अशाच शब्दांत करतात. 'ज्ञानदेवी'च्या माध्यमातून जो ज्ञानव्यवहार ज्ञानदेव ज्यांच्यासाठी प्रगट करत आहेत त्या जिज्ञासू श्रोत्यांशी त्यांचे नाते सख्यत्वाचेच आहे.

समता हे तर सख्यत्वाचे अधिष्ठान. जिथे समता नांदते तिथेच संवाद संभवतो. श्रोते आणि ज्ञानदेव यांच्यादरम्यानचा ज्ञानव्यवहार साकारतो सख्यत्वाच्या पायावर आणि संवादाच्या आदिबंधाद्वारे. ज्या ज्ञानाचे संक्रमण घडवून आणण्यासाठी ज्ञानदेव सिद्ध झालेले आहेत तो अ-रूप बोध आपल्याला अवगाहन होईल ना, अशी आशंका श्रोतृवर्गाच्या मनात मुळात उमटूच नये म्हणूनच, कदाचित, ***प्रभु तुम्ही***

***महेशाचियां मूर्ती,*** अशा आदरभरित शब्दांत ज्ञानदेव श्रोत्यांना आश्वस्त करतात आणि त्यांचे आत्मबळही सुदृढ बनवतात. ‘ज्ञानदेवी’च्या माध्यमातून खुला केलेला ज्ञानठेवा श्रोत्यांना सुसेव्य स्वरूपात आस्वादता यावा यासाठी संवादाचा जो आदिबंध ज्ञानदेवांनी अंगिकारलेला आहे त्याच्या मुळाशी असणाऱ्या भावबंधाला साहित्यशास्त्राच्या चर्चाविश्वात ‘मित्रसंमित’ असे संबोधतात, असे विश्लेषक स्पष्टीकरण ***इये मराठीचिये नगरी,*** या ग्रंथात मांडले आहे मराठी लोकव्यवहाराचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी. तर, उभी वारकरी परंपरा म्हणजे समताधिष्ठित सत्तासंवादाचे मूर्तिमंत आविष्करण होय, याची साधार चर्चा मांडली आहे मराठीतील व्यासंगी समीक्षक डॉ. रूपाली शिंदे यांनी, ***‘न व्हावे उदास – समतेचा सत्तासंवाद,’*** या त्यांच्या विवेचक ग्रंथात.

गणेशाचा तो न तुटलेला पूर्ण असा शुभ्रवर्णी दात संवादाचे प्रतीक होय, असे ज्ञानदेवांचे विश्लेषण सांगते. संवादाचे प्रतीक असणाऱ्या गणेशाच्या त्या सरळ दाताला ज्ञानदेवांनी शुभ्रवर्णी असे त्याचे रंगवाचक जे विशेषण जोडलेले आहे तेदेखील सूचक व उद्बोधक आहे. शुभ्रता सूचन घडवते पावित्र्याचे आणि शुद्धीचे. ज्ञानव्यवहारादरम्यान प्रमेयांची उकल करण्यासाठी जो संवाद साकारतो तो विशुद्ध असावा, अशी ज्ञानदेवांची अपेक्षा आहे. म्हणजेच, त्या ज्ञानव्यवहाराची परिणती विसंवादात होता कामा नये, याचे सूचन ते घडवतात. अध्ययनाची व अध्यापनाची फलश्रुती तत्वबोधात व्हावयास हवी, विद्वेषात नव्हे. ज्ञानव्यवहाराची परिणती श्रोत्यांच्या मनात सकारात्मक ऊर्मींची रुजवण करण्यात व्हावी, याबाबत ज्ञानदेवांचा असलेला कटाक्ष त्यावरून दिसतो. व्याख्यान अथवा आख्यान, त्यांमुळे, सपकच असले पाहिजे, असा गैरसमज यावरून कोणीच करून घेऊ नये. वक्ता आणि श्रोता यांच्यादरम्यान साकारणारा ज्ञानसंवाद कसा असावा, याचे दिशादर्शनही, ज्ञानदेव, ***न बुझवति मतें । न फीटे आक्षेपाचें लागतें । तें वाखाणें जी तुमतें । जोडुनु नेंदीं,*** अशा आशयगर्भ शब्दांत घडवतात. प्रतिपाद्य विषयाचे विवेचन चालू असताना त्या संदर्भातील विविध मतमतांतरांचा परामर्श घेतला गेला नाही, विवेचित मुद्यांसंदर्भातील आक्षेप निवेदून त्याबाबतचे स्पष्टीकरणात्मक विवेचन वक्त्याने केले नाही तर त्या व्याख्यानाबाबत श्रोत्यांना कोणत्याही प्रकारची आस्था वाटणारच नाही. परिणामी, वक्ता आणि श्रोता यांना परस्परांशी जोडणारा अर्थपूर्ण संवादाचा सेतू निर्माणच होऊ शकणार नाही, असे ज्ञानदेवांचे प्रतिपादन आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, कोणत्याही ज्ञानव्यवहाराची निष्पत्ती विवेकामध्ये घडून येणे ज्ञानदेवांना अभिप्रेत आहे.

ज्ञानव्यवहारादरम्यान साकारणाऱ्या संवादाची निष्पत्ती विवेकाची रुजवण घडून येण्यात व्हावी हे सूत्रच ज्ञानदेवांनी ग्रंथारंभी ज्याला नमन आरंभलेले आहे त्या शब्दगणेशाची सोंड सूचित करते, हे ज्ञानदेव पुढे मांडतात. ***देखा विवेकवंतु सुविमळु। तोचि शुंडादंडु सरळु । जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा,*** ही ओवी या संदर्भात मननीय ठरते. हत्तीची सोंड हा त्याचा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण अवयव गणला जातो. अक्षरश: काही लाख पेशींनी बनलेली ती सोंड जमिनीवर पडलेली सुई जितक्या सहजतेने टिपू शकते तितक्याच सहजतेने भल्यामोठ्या झाडाची जडशीळ फांदीदेखील ती मोडू शकते. कोणत्याही अभ्यासप्रांतातील सूक्ष्मातिसूक्ष्म तसेच स्थूल प्रमेयेही उकलणारी विवेकशीलता शब्दगणेशाची सोंड सूचित करते. विवेक 'विमल' म्हणजे शुद्धच असतो. कोणताही विवेकपूर्ण व्यवहार सरळच असतो. त्यांत लपवाछपवी नसते. ज्ञान ही चीजच मुळात शुद्ध असल्यामुळे ज्ञानोपासनेद्वारे अभ्यासकाच्या अंत:करणात उदय पावणाऱ्या विवेकशीलतेचे अस्तर लगडलेला प्रत्येक भाषाव्यवहार सर्वकाळी सुखदायकच ठरावा, हे मग ओघानेच येते. आणि सुख हेच तर आनंदाचे अधिष्ठान! कोणत्याही अभ्यासप्रांतातील ज्ञानव्यवहार आनंदपर्यवसायी शाबीत व्हावा, हेच ज्ञानदेव इथे सुचवत आहेत. ज्ञानव्यवहाराचे आदिद्रव्य असणारी भाषा आणि तिच्या उपयोजनाद्वारे प्रगटणाऱ्या भाषाव्यवहारामागील प्रेरणा यांची विविध अंगोपांगे, ज्ञानदेवांनी त्यांच्या गीताभाष्याच्या प्रारंभी ओवीसुमनांनी पूजिलेला शब्दगणेश, त्याच्या रूपाद्वारे सूचित करतो ती अशी.

या शब्दगणेशाने केलेली कृपा आणि श्रीगुरू निवृत्तिनाथांचा आशीर्वाद यांमुळे 'ज्ञानदेवी'नामक ज्ञानव्यवहार लोकभाषा मऱ्हाटी प्राकृताची अंगडी-टोपडी लेवून प्रगटला, अशी भावना ज्ञानदेवांनी त्यांच्या प्रतिपादनादरम्यान अनेक ठिकाणी व्यक्त केलेली आहे. मूळ संस्कृतामध्ये महर्षी व्यासांनी शब्दांकित केलेला कृष्णबोध तितक्याच समर्पकपणे, त्याची अर्थगर्भता कोठेही लोप पावणार नाही याची पुरेपूर दक्षता घेत परंतु समोरच्या श्रोतृवर्गातील पंडितांच्या पगड्या आणि सर्वसामान्यांची हृदये एकाच वेळी डोलवणाऱ्या रसाळपणे मऱ्हाटी प्राकृतामध्ये अवतरवणे, हे सोपे काम नव्हे. त्यासाठी मऱ्हाटी प्राकृताचे अंगभूत सामर्थ्य अचूक हेरून त्याचे तितक्याच प्रगल्भपणे उपयोजन घडविणारी प्रतिभा जितकी गरजेची ठरते तितकीच, लोकभाषेचे सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी कष्ट उपसण्याची मानसिकतादेखील आवश्यक असते. या दोन्ही बाबी ज्ञानदेवांपाशी मुबलक मात्रेने होत्या याच्या खुणा त्यांच्या ग्रंथात पदोपदी गवसतात. प्रतिभा ही दैवी देणगी आहे हे मान्य, परंतु संस्कृतासारख्या

परभाषेतील ज्ञान, लोकमानसाचे सिंचन घडवून आणण्यासाठी, लोकभाषा असणाऱ्या मऱ्हाटी प्राकृताद्वारे सुसेव्य बनावे याकरिता लोकभाषेचे सक्षमीकरण साध्य करण्यासाठी ज्ञानदेवांनी केलेल्या सायासांचा धांडोळा घेणे म्हणजेच 'ज्ञानदेवी'चा भाषाभ्यास करणे होय.

संस्कृतात अवतरलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेत एकवटलेला ज्ञानठेवा मऱ्हाटी प्राकृतात रूपांतरित करण्यासाठी ज्ञानदेवांनी बरीच मेहनत घेतली असली पाहिजे, याचे प्रगट दाखले 'ज्ञानेश्वरी'मध्येच आपल्याला सापडतात. परंतु, त्या प्रयत्नांचे नेमके स्वरूप मात्र अप्रगटच राहते. असे असले तरी, लोकव्यवहाराची भाषा असणाऱ्या मऱ्हाटीचे, महत्प्रयासाने, अव्वल अशा ज्ञानभाषेमध्ये अवस्थांतर घडवून आणल्यानंतर त्या लोकभाषेला जे ओज व सामर्थ्य प्राप्त झाले त्याचे ज्ञानदेवांनी केलेले वर्णन मात्र काही ठिकाणी आपल्या हाताला लागते. तिथे प्रकर्षाने प्रतिबिंबित होतो तो ज्ञानदेवांच्या ठायी असलेला उदंड आत्मविश्वास. मूळ संस्कृतामध्ये अवतरलेला कृष्णबोध मी लोकभाषेमध्ये अशा समर्थपणे रूपांतरित केलेला आहे की, मऱ्हाटी प्राकृताद्वारे माझ्या ग्रंथात प्रगटलेल्या त्या बोधाचा आशय तुम्ही नीट जाणून घेतलात तर, हे माझे गीताख्यान म्हणजे संस्कृतातील श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे मऱ्हाटी रूपांतर आहे की, मऱ्हाटीत निर्मिलेल्या मूळ ग्रंथाचे संस्कृत रूप म्हणजे श्रीगीता आहे, असा प्रश्न तुम्हांला पडेल असे ज्ञानदेव श्रोत्यांना उद्देशून म्हणतात. ***मूलग्रंथिचेया संस्कृता । सवें नीट मऱ्हाटी पढतां । अभिप्रायें मानलेया उचिता । कवणि भूमिका ते नेणवे,*** हे ज्ञानदेवांचे उद्‌गार म्हणजे त्यांच्या बुलंद आत्मविश्वासाचे रसरशीत द्योतनच होय. मऱ्हाटी प्राकृताचे सक्षमीकरण प्रयत्नपूर्वक घडवून तिला मी आता असे तेज व ओज प्रदान केलेले आहे की ती आता संस्कृत भाषेशी समतुल्य बनलेली आहे, असा निर्वाळा, ज्ञानदेव, ***ऐसी देशी आणि संस्कृत वाणी । एकां भावाचां सुखासनीं । शोभती ते आणि । चोखट आइकां,*** अशा निरपवाद शैलीमध्ये देतात.

परंतु, लोकभाषेला केवळ ओज प्रदान करून भागणारे नाही, याचीही ज्ञानदेवांना पुरेपूर जाणीव आहे. कारण, सक्षमीकरणकृत मऱ्हाटी प्राकृताच्या माध्यमातून गीतातत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविले तरी तो ज्ञानसंवाद तर्ककठोर आणि शुष्क असेल तर सगळीच मसलत विस्कटेल, हे ज्ञानदेव जाणून आहेत. अध्यात्मशास्त्राची चर्चा गंभीर परंतु रसमय असली तरच, ज्ञानाच्या संस्कारांपासून जे समाजघटक अनंत काळापासून वंचित आहेत त्यांना तो ज्ञानसंवाद रुचकर वाटेल-भासेल याची खूण ज्ञानदेवांच्या मनीमानसी पक्की असली पाहिजे, याचे सूचन त्यांची एक ओवी

निर्विवाद घडवते. ***तैसें देशियेचें लावण्य । हरौनि रसां आणिजैल तारुण्य । मग हनणिपैल अगण्य । गीतातत्व,*** या शब्दांमध्ये ज्ञानदेवांनी ओतलेला आशय केवळ अ-साधारण असाच आहे. ज्ञानदेवांनी इथे दिलेली उपमा तर अफलातून अशीच आहे. कमालीच्या रूपवती अशा यौवनेच्या रमणीयतेवर लुब्ध झालेली मने ज्या प्रमाणे तिच्याकडे आकृष्ट होतात, अगदी त्याच न्यायाने, माझ्या देशी मऱ्हाटीचे तारुण्यमय लावण्य मी अशा खुबीने खुलवीन की, तिच्या सौंदर्याने अवगुंठित गीतातत्वाचा अनुनय करीत अवघे रस मागे धावत येतील आणि त्या रसमय तत्वचर्चेच्या आस्वादाने तुम्ही अंतर्बाह्य सुखावून जाल, अशी जणू हमीच ज्ञानदेव श्रोत्यांना देतात.

अर्थात, हे साधायचे तर भाषेशी जिव्हाळ्याची सलगी हवी. परभाषेतील ज्ञानठेवा लोकभाषेच्या माध्यमातून आस्वाद्य बनवायचा तर नवीन कोणता तरी भाषाव्यवहार मांडून उपयोग नाही. लोकव्यवहारात मुरलेल्या भाषेलाच, त्यासाठी, परभाषेतील गहन अर्थवत्ता पेलण्यासाठी नवीन साज चढवणे भाग आहे, हे हेरून ज्ञानदेव त्या उद्योगाला लागतात. प्रचलीत लोकभाषा असणाऱ्या मऱ्हाटी प्राकृतालाच त्यांनी गीताटीकेसाठी नवीन कोणता साज कसा चढवला याचा अभ्यास करणे हा अतिशय आव्हानात्मक भाग ठरेल. गीताटीकेसाठी ज्ञानदेवांनी देशी भाषेचीच नवी आंगवण अंगिकारली. ती नवभाषा त्यांनी नेमकी कशी सिद्ध केली ते शोधणे ही होय खरी कसोटी. परंतु, कृष्णहृदय जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जी नवी देशी मी घडवलेली आहे तिच्यामुळे साहित्यालाच ओज चढेल इतकेच केवळ नाही तर, तिच्यातून झिरपणारे गीतातत्व, तुम्ही तिच्याशी सलगी करून चाखलेत तर त्या गोडीपुढे तुम्हांला अमृतदेखील थोटेच भासेल, अशी ग्वाही ज्ञानदेव नि:शंकपणे श्रोत्यांना देतात. ***दाउं वेल्हाळ देशी नवी । जैसी साहित्यातें वोजावी । अमृता ही चूकि ठेवी । गोडिसेपणें,*** हे ज्ञानदेवांचे शब्द, त्यांनी गीताटीकेसाठी घडविलेल्या नव-देशी भाषेचे वेल्हाळ सामर्थ्य निर्देशित करतात.

अभिजाततेची मोहोर उमटवून घेतलेली लोकभाषा मराठी, खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा बनवून तिच्याद्वारे ओजस्वी ज्ञानव्यवहार साकारायची आपली मनापासून इच्छा असेल तर, किती पातळ्यांवर किती सूक्ष्मपणे व सातत्याने प्रयत्न करावे लागतील याचे भान ज्ञानदेवांनी मांडलेला भाषाविचार आपल्याला आणून देतो.

# उजळणी

## रामकृष्ण गोपाळ भांडारकर

*आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संस्कृततज्ज्ञ, भारतविद्याविशारद, कर्ते समाजसुधारक आणि प्रार्थना समाजाचे एक अग्रणी डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या स्मृतिशताब्दीची २४ ऑगस्ट २०२५ रोजी सांगता झाली. विद्वत्वर म्हणून त्रिखंडात कीर्ती गाजणाऱ्या डॉ. भांडारकर यांच्या कार्यकर्तृत्वाचे तपशील त्या मानाने अल्पज्ञात असेच आहेत. भागवत धर्मविचाराचा सखोल अभ्यास असणारे डॉ. भांडारकर प्रार्थना समाजाच्या व्यासपीठावरून उपासना तर चालवतच, परंतु, ते कीर्तनदेखील करत असत ही बाब बव्हंशी अपरिचित अशीच होय. डॉ. भांडारकर यांच्या स्मृतिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून, द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनी शब्दबद्ध केलेल्या डॉ. भांडारकर यांच्या जीवनालेखाचा काही अंश या ठिकाणी सादर केलेला आहे. प्रार्थनासमाजाचा इतिहास साक्षेपपूर्वक प्रथम सिद्ध केला तो द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनीच. त्या ग्रंथाच्या द्वितीयावृत्तीचे संपादन केले प्रा. राजा दीक्षित यांनी. तो ग्रंथ प्रकाशित झाला २०१९ साली. डॉ. भांडारकर यांचे धर्मपर लेख तसेच व्याख्याने संकलित असलेल्या दस्तऐवजात वैद्य यांनी समाविष्ट केलेला डॉ. भांडारकर यांचा जीवनवृत्तान्त, प्रा. डॉ. राजा दीक्षित यांच्या ग्रंथात समाविष्ट केलेला आहे. त्या लेखाचाच संपादित अंश या ठिकाणी सादर केलेला आहे. मजकुरातील शुद्धलेखन मुळाबरहुकूम ठेवलेले आहे.*

# उजळणी

## रामकृष्ण गोपाळ भांडारकर

Life's race well run, Life's work well done
Life's Crown well won
Now comes rest.

आपल्या सर्व आयुष्यभर ज्यांचें ज्ञानार्जनाचें कार्य सतत चालू होते; एकेकाळीं दृष्टि बहुतेक लुप्त झाली असतांही ज्यांनीं आपलें ग्रंथरचनेचें कार्य पूर्णावस्थेस नेलें, सुखाच्या, व दुःखाच्या, सहवासाच्या व वियोगाच्या, आनंदाच्या व खेदाच्या अशा सर्व प्रसंगीं परमेश्वराच्या सान्निध्यांत राहण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला; आपल्या विवेकाला जें पटलें, सत्यानें जो मार्ग दाखविला, परमेश्वरानें जी स्फूर्ति दिली, त्याप्रमाणें वर्तन करावयास ज्यांनीं केव्हांहि माघार घेतली नाहीं, 'परमेश्वर परमात्माच विवेकरूप आपली वाणी आत्म्याला श्रुत व्हावी अशी योजना करून आध्यात्मिक जगामध्यें आम्हांस नांदवितो, आध्यात्मिक ज्ञान परमेश्वरच सर्व मनुष्यांस देऊन, आम्हांमध्यें समता गुण उत्पन्न करून सुखधामाप्रत नेत आहे' असा ज्यांचा जागृत विश्वास होता व ह्या विश्वासानें प्रेरित होऊन ज्यांची सर्व कार्ये होत होतीं; संसारांतील एकावरील एक बिकट आपत्तींच्या वेळींही ज्यांचा परमेश्वरावरील विश्वास तिळमात्र ओसरला नाहीं, परमेश्वर ज्या स्थितींत ठेवील त्या स्थितींत ज्यांनीं समाहितमनेंकरून काळ कंठिला, ते आमचे गुरुवर्य डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर ता. २४ आगस्ट १९२५ रोजीं, ऋषिपंचमीच्या दिवशीं परलोकवासी झाले, त्यांचें अल्पचरित्र येथे सादर करितों.

**जन्म, शिक्षण वगैरे**

आषाढ शुद्ध तृतीया गुरुवार शके १७५९, ता. ६ जुलै १८३७, रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण मुक्काम आमचे चरित्रनायक रामकृष्णपंत यांचा जन्म झाला. त्यांचे तीर्थरूप गोपाळ लाडको भांडारकर हे मालवण येथें मामलेदाराच्या कचेरीत प्रथम कारकून होते. त्यांचे वडील, रामकृष्णपंतांचे पितामह, लाडो विठ्ठल हे चांगले

प्रसिद्धीस आलेले गृहस्थ होते. इंग्रज सरकारास कोल्हापुर सरकाराकडून सन १८१२ मध्यें मालवण व त्याच्या आसपासचा भाग प्राप्त झाला, त्याची व्यवस्था लावण्याच्या कामीं लाडो विठ्ठल ह्यांचें चांगलें साहाय्य झालें होतें; हें जाणून त्यांच्या कुटुंबास मालवण नजीक चार कोसांवर कांहीं जमीन फारच थोड्या धाऱ्यानें मिळाली होती. मालवण येथें ज्या घरांत रामकृष्णपंतांचा जन्म झाला तें घर अद्याप रामकृष्णपंतांच्याच आप्तांकडे आहे. कांहीं काळानें गोपाळरावांची राजापूर येथील मामलेदारांच्या कचेरींत बदली झाली. रामकृष्णपंतांचें मराठी शिक्षण मालवण येथेंच गांवठी शाळेंत व नंतर कांहीं महिनेपर्यंत राजापुर येथें सरकारी मराठी शाळेंत झालें. पुढें लवकरच गोपाळरावांची बदली रत्नागिरीस ट्रेझरी ऑफिसांत झाली व त्यांनीं आपलें सर्व कुटुंब रत्नागिरीस नेलें. डॉ. भांडारकरांना आपल्या जन्मभूमीचा अखेरपर्यंत फार अभिमान असे. गोपाळरावांचें कुटुंब पुष्कळ वर्षे मालवणास होतें व तेथें त्यांचें घरदार वगैरे असल्यामुळें, सर्व संसार रत्नागिरीस नेतांना त्यांची बरीच गैरसोय झाली; तरी ह्या बदलीमुळें खुद्द रामकृष्णपंतांचें व सगळ्या हिंदुस्थानाचें जें कल्याण झालें आहे, त्याचा विचार मनांत आला म्हणजे ही बदली परिणामीं किती हितकर झाली आहे याची कांहींशी कल्पना होते. ज्या वेळीं गोपाळरावांची राजापुराहून रत्नागिरीस बदली झाली, त्यावेळीं रामकृष्णपंतांचें वय अवघें दहा वर्षांचें होतें. तेवढ्या वयांत मालवणच्या गांवठी शाळेंत व राजापुर येथील सरकारी शाळेंत तीन महिन्यांत जेवढें शिक्षण होणें शक्य होतें तेवढें त्यांचें झालें होतें. त्यांच्या वडिलांची जर ही बदली झाली नसती, तर त्या वयांत तरी रामकृष्णपंतांस इंग्रजी शिक्षण मिळणें शक्य झालें नसतें. कारण, बदली होतांच सर्व कुटुंब गोपाळरावांनीं रत्नागिरीस नेलें.

सन १८४७च्या आक्टोबरमध्यें रत्नागिरीस आल्यानंतर गोपाळरावांनीं आपल्या चिरंजिवास इंग्रजी शाळेंत घातलें, ही गोष्ट फार महत्त्वाची समजली पाहिजे. कारण, त्या जुन्या काळी इंग्रजी शिक्षण लोकप्रिय झालेलें नव्हतें; तें सर्वांस मिळणें शक्य नव्हतें. अद्याप लोकांना त्या शिक्षणाची आवश्यकताही भासू लागली नव्हती, अर्थात् लोकमत अनुकूल झालेलें नव्हतें, हें निराळें सांगावयाची जरूर नाहीं. तथापि ज्या काळीं रामकृष्णपंतांचा इंग्रजी शाळेमध्यें प्रवेश झाला तो काळ मात्र फार महत्त्वाचा व त्याच प्रमाणें चळवळीचा होता. येथें मुंबईस शेट दादाभाई नौरोजी आपला सुस्वभाव, विद्वत्ता, चौकसपणा व सदाचरण ह्यांच्यामुळे एल्फिन्स्टन् इन्स्टिट्यूशनमध्यें सर्वांचे आवडते होत होते. रत्नागिरीच्याच शाळेंतील सर्व अभ्यासक्रम संपवून विश्वनाथ नारायण मंडलीक, माधवराव बरवे, गणेश धोंडदेव परांजपे वगैरे

मुंबईंत एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें आपला पुढला अभ्यास चालू ठेवण्यासाठीं आले होते व त्यांच्या हुषारीविषयीं बरीच चर्चा चालू असे. त्यांच्यासारखा रत्नागिरीच्या शाळेंतील आपणही इंग्रजी वरिष्ठ शिक्षणाचा लाभ करून घ्यावा असें वाटून रामकृष्णपंत मोठ्या उमेदीनें, ईर्षेनें व निश्चयानें वरिष्ठ अभ्यासास लागले व तेथील अभ्यास त्यांनीं त्वरित संपवून मुंबईस जाण्याचा निश्चय केला. त्यांनीं निश्चय केला खरा, परंतु तो सिद्धीस जाण्यास पुष्कळ अडचणी होत्या. आजकाल मुंबई व रत्नागिरी ह्यांमधील प्रवास पूर्वी इतका त्रासदायक नाहीं. बोटींच्या सोयीमुळें प्रवास, फारसा सुखकारक जरी नसला तरी, सुलभ झाला आहे. परंतु साठ सत्तर वर्षांपूर्वीची स्थिति अशी नव्हती. रत्नागिरीहून मुंबईस यावयास अनेक दिवस लागत. प्रवास अगदीं त्रासदायक असे. आणि त्यांतून केवळ शिक्षणासाठीं मुंबईस एकटें येऊन राहणें हा विचार आईबापांस, आप्तांस कितीसा रुचण्यासारखा होता तें दिसतच आहे. तथापि वरिष्ठ प्रतीचें शिक्षण प्राप्त करून घेण्याचा रामकृष्णपंतांचा निश्चय दृढ असल्यामुलें, वडिलांनी परवानगी दिली नसती, तरी सुद्धां आपणांस न कळवितां रत्नागिरी सोडून मुंबईस कदाचित् ते जातील असें वाटून गोपाळरावांनीं रामकृष्णपंतांस मुंबईस पाठविण्याची व्यवस्था केली. ह्या वेळीं रामकृष्णपंतांचें वय १५ वर्षांचें होतें. ह्यावरून वरिष्ठ शिक्षणाची त्यांची त्यावेळची आवड किती होती हें आपल्या लक्षांत येतें.

१८५३ साली ज्यानुआरी महिन्यांत आपल्या पुढील अभ्यासासाठी रामकृष्णपंत मुंबईस आले. त्यावेळीं एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनचे कॉलेज व शाळा असे दोन भाग होते. प्रथम एक वर्षपर्यंत रामकृष्णपंतांस हायस्कूलमधील कॉलेजमध्ये जाण्याकरितां तयार होण्याच्या वर्गांतील अभ्यास करावा लागला. १८५४ सालीं परीक्षेत त्यांचा नंबर पहिला आला, तरी त्यावेळीं स्कालरशिप देण्यासंबंधानें नीटशी व्यवस्था नसल्यामुळें नंबर पहिला येऊनही त्यांना स्कॉलरशिप मिळाली नाहीं! मात्र त्यांना कॉलेजांतील वर्गात दाखल करण्यांत आलें. कॉलेजांत अभ्यास चालू असतां रामकृष्णपंतांस बऱ्याचशा स्कालरशिप्स मिळाल्या व त्यामुळें त्यांच्या शिक्षणासही बरीच मदत झाली. प्रथमत: त्यांस दरमहा १५ रुपयांची वेस्ट स्कालरशिप मिळाली. ही मिळत असतां गायकवाड सरकारकडून १० रु. दरमहाची गायकवाड स्कालरशिप त्यांस मिळत असे. १८५७ सालीं नॉरमल स्कालरशिप्स म्हणून कांहीं स्कालरशिप्स होत्या त्यांपैकी एक मिळाली.

रामकृष्णपंत कॉलेजांत असतां एक महत्त्वाची गोष्ट घडली. तिचा उल्लेख करण्यापूर्वी येथें हें सांगणें जरूर आहे कीं, वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणास त्यावेळीं जरी नुक्ताच प्रारंभ

झालेला होता, तरी एकंदर शिक्षणाविषयीं जितकी आस्था घ्यावयास पाहिजे तितकी शिक्षकवर्ग घेत नसे. निदान १८५५ सालीं विद्याखात्याचे प्रमुख मि. हावर्ड ह्यांनी रामकृष्णपंतांच्या वर्गाची जेव्हां परीक्षा घेतली, तेव्हां त्यांची एकंदरीत बरीच निराशा झाली, व त्यांनीं असें बोलूनही दाखविलें की, ''रामकृष्ण गोपाळ नांवाच्या एका विद्यार्थ्यानें मात्र समाधानकारक उत्तरें दिली.'' असो, रामकृष्णपंत आपल्या स्पष्टवक्तेपणाबद्दल व सत्यनिष्ठेबद्दल जे प्रसिद्ध आहेत ते त्यांचे गुण त्यांच्यांत लहानपणापासूनच असून त्यावेळी त्यांनीं आपल्या अध्यापकांसही आपल्या स्पष्टोक्तीची ओळख करून दिली, हीच वर म्हटलेली विशेष गोष्ट होय. ते कॉलेजांत असतां दादाभाई विलायतेस गेल्यानंतर कॉलेजमध्येंच असलेल्या एका युरोपिअन गृहस्थाची गणित विषय शिकविण्याकडे योजना आली. त्यावेळीं गणितविषयाची अगर्दीच हयगय होत असे आणि तो विषय तर ह्यांचा अति आवडता. हें पाहून एके दिवशीं रामकृष्णपंतांनीं आपल्या अध्यापकांस म्हटलें, ''गणितामध्यें आपली गति व्हावी ह्या उद्देशानें मी ह्या कॉलेजांत आलों. पण येथें येऊन माझी आतां अगर्दीच निराशा झाली आहे!'' रामकृष्णपंत जेव्हां कॉलेजांत दाखल झाले तेव्हा मि. दादाभाई नौरोजी गणित विषय शिकवीत होते. परंतु रामकृष्णपंतांचें कॉलेजांतील अभ्यासाचें दुसरें वर्ष जेव्हां सुरू झालें, त्याच सुमारास दादाभाई विलायतेस गेले. नवे अध्यापक आपल्या वर्गाला अवश्य तें गणित न शिकवितां खालच्या वर्गास शोभणारें गणित शिकवून वेळ मारून नेत असत. त्यामुळें रामकृष्णपंतांची मोठी निराशा होऊन त्यांनीं वरील उद्‌गार काढले. ते ऐकून साहेब बहादुर गरम झाले व आपल्या जवळ असलेली गणितविषयावरील सर्व कठिण पुस्तकें एकत्र करून ती सर्व रामकृष्णपंतांसमोर त्यांनीं आणून ठेविलीं! हेतु हा कीं, आपल्याला पुष्कळ येत आहे व आपण पुष्कळ वाचलें आहे हें ह्या धीट विद्यार्थ्याला दाखवून द्यावें. तीं सर्व पुस्तकें पाहून रामकृष्णपंत सहज म्हणाले, ''ही सर्व पुस्तकें आमच्यापुढे ठेवण्यांत काय अर्थ आहे? त्यांतील कांहींही आपण आम्हांला शिकवीत तर नाहीं!'' असो.

वरील माहितीवरून रामकृष्णपंतांचा गणित हा फार आवडता विषय होता असें दिसून येईल. पण, तेवढ्यावरून इतर विषयांकडे ते दुर्लक्ष करीत असत असें मात्र नव्हे. इंग्रजी, इतिहास, शास्त्रीय विषय यांत त्यांची सारखी गति असे. तथापि ह्या सर्वांमध्यें गणिताकडे त्यांचा ओढा अधिक होता, एवढें मात्र खरें. त्यांच्या वेळीं मुरलीधर गिरधर नांवाचे एक सहाध्यायी असत. हेही पुढें प्रार्थनासमाजाचे सभासद झाले; त्यांचे एक चिरंजीव समाजाचे सभासद असून दुसरे नित्य उपासनेस येत

असतात. असो. रामकृष्णपंतांची व ह्यांची वर्गांत गणितांत नेहमी झटापट चालू असे. पुढें रामकृष्णपंतांचें गणिताकडील लक्ष कमी झालें. तत्त्वज्ञान, इतिहास व संस्कृत हे विषय जरी त्यांचे पुढें आवडते झाले, तरी त्यांच्या सर्व कार्यांमध्यें जो नीटनेटकेपणा दिसून येई, त्यांचा चौकसपणा, हाती घेतलेलें काम चोख रीतीनें करण्याची त्यांची पद्धत, एकदां कार्य हाती घेतलें म्हणजे कोणत्याही प्रकारची टंगळमंगळ न करितां आपलें सर्व लक्ष तिकडे लावून तें काम करणें हा जो त्यांचा गुण इतकीं वर्षे अनुभवास आला तो ते पूर्ववयांत उत्तम गणिती असल्यामुळें त्यांच्यांत आला असावा!

रामकृष्णपंत आपले सर्व अभ्यास उत्तम रीतीनें व्हावेत म्हणून बरेच परिश्रम घेत असत. रात्रीं ते फक्त सहा तास झोंप घेत; मग कधीं कधीं लवकर निजून पहांटे उठावयाचें, अगर बारा वाजतां झोप जाऊन सकाळीं ६ वाजतां उठावयाचें, असा त्यांचा क्रम असे. कांहीं झालें तरी सहा तासांपेक्षां अधिक झोंप न घेण्याचा त्यांचा निश्चय असे. आणि क्वचित् प्रसंगीं झोंप येऊ नये म्हणून ते आपली शेंडी वरच्या खुंटीस बांधून ठेवीत असत! पुष्कळ वेळां सायंकाळचा बराचसा वेळ आपल्या सहाध्यायांबरोबर अनेक विषयांवर वादविवाद करण्यात जात असे. पाश्चात्य विचार, पाश्चात्य संस्था व सुधारणा अशा प्रकारच्या विषयांवर त्यांचे वादविवाद व संभाषणें होत असत.

रामकृष्णपंतांच्या काळी कॉलेजची अंतर्व्यवस्था ठीक झाल्यानंतर अध्यापक व विद्यार्थी ह्यांच्यामध्यें बरेंच दळणवळण असे. अध्यापकांचें विद्यार्थ्यांकडे लक्ष असे. त्यांच्या हिताचा विचार ते आस्थेनें करीत, त्यामुळें विद्यार्थ्यांचाही त्यांच्याकडे ओढा असे व अध्यापकांविषयीं त्यांच्या मनांत आदरबुद्धि वास करीत असे. सुदैवानें रामकृष्णपंतांच्या वेळीं आजची स्थिति नव्हती. कॉलेजांतील मुलांच्या शिक्षणाची हयगय होत आहे, असें पाहून सरकारनें मुद्दाम तीन अध्यापक विलायतेहून आणविले होते. ह्या तिहींपैकी मि. ओवेन नांवाचे अध्यापक रामकृष्णपंतांच्या फार आवडीचे असत. मि. ओवेन यांचें सर्व विद्यार्थ्यांकडे सारखें लक्ष असे. ते सर्वांशी प्रेमानें वागत व प्रत्येक विद्यार्थ्याचा गुणदोष जाणून घेण्याचा प्रयत्न करीत. ह्यामुळें जिज्ञासु, मेहनती, हुशार व चाणाक्ष अशा रामकृष्णपंतांकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें व त्यांचें रामकृष्णपंतांवर वजनही तसेच असे. मि. ओवेन यांच्यांत सत्यनिष्ठा हा गुण विशेष असे. त्यावेळीं French Revolution हा विषय शिकवितांना ही त्यांची सत्यनिष्ठा व सत्यप्रीति रामकृष्णपंतांच्या विशेष अनुभवास आली. ग्रंथकर्ता फ्रेंचक्रांतीची पूर्णपणें तरफदारी करणारा होता. ह्या क्रांतींत त्यास कांहीं दोष दिसत नव्हता. परंतु मि.

ओवेन यांच्या दृष्टीनें अशा रीतीनें इतिहासाचें अध्ययन करणें अनिष्ट होतें. व्यक्तीव्यक्तींच्या कृती कोणत्या तें ठरविलें पाहिजे. आणि त्या घडवून आणण्यांत त्यांचें वर्तन जर दोषी दिसलें, तर तें तसें होतें असें स्पष्टपणें म्हटलें पाहिजे. म्हणजे त्या कृतीची जबाबदारी त्यांच्या माथ्यावर पूर्णपणे ठेविली पाहिजे. नाइलाज म्हणून त्यांनीं असें केलें असें म्हणून त्यांची जबाबदारी उडवून टाकू नये. या मि. ओवेन ह्यांच्या गुणांचा रामकृष्णपंतांच्या मनावर स्पष्ट ठसा उमटला. मि. ओवेन यांची स्पष्टोक्ति, त्यांची विद्वत्ता व त्यांची कर्तव्यनिष्ठा यांचा रामकृष्णपंतांच्या मनावर किती परिणाम झाला याची कल्पना मि. ओवेन यांच्याविषयीं जेव्हां जेव्हां ते भाषण करीत त्या वेळीं त्यांचे विषयींचा आपला आदर ते व्यक्त करीत, ह्या एका गोष्टीवरून होण्यासारखी आहे. रामकृष्णपंतांची कर्तव्यरतता, चिकित्साबुद्धि, शोधक स्वभाव इत्यादि अनेक गुणांचा व मि. ओवेन यांच्या शीलाचा व गुणांचा निकट संबंध आहे. रामकृष्णपंतांस मि. दादाभाई नौरोजी, मि. ह्यूलिंग्स, डा. हार्कनेस इ. अध्यापकांचा लाभ झाला. ह्यापेक्षां आणखी एका गृहस्थांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा व दूरदर्शित्वाचा रामकृष्णपंतांस लाभ होत असे. हे गृहस्थ म्हणजे मि. हावर्ड होत. मि. हावर्ड ह्यांची विद्यार्थ्यांच्या शिक्षणाविषयींची आस्था असाधारण असे. ते शिक्षणखात्याचे प्रमुख असल्यामुळें विद्यार्थ्यांस शिकविणें हें कांहीं त्यांचें काम नव्हतें. तरीपण होतकरू व हुशार अशा कांहीं विद्यार्थ्यांस खाजगी रीतीनें ते आपल्या ज्ञानाचा लाभ देत असत. ह्या विद्यार्थ्यांत रामकृष्णपंत असत.

सन १८५८ साली रामकृष्णपंतांचा एल्फिन्स्टन कॉलेज मधील शिक्षणक्रम संपला. काही काळपर्यंत कॉलेजच्या प्रिन्सिपालच्या कारकुनाचें काम केल्यावर एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें शिक्षकांच्या जाग त्यांची नेमणूक झाली. १८५९ मध्ये त्यांस फेलोशिप मिळाली व सुमारें दीड वर्ष मुंबईस काम करून ते १८६० साली पूना कॉलेजमध्यें बदली होऊन प्रथमच पुण्यास गेले. आपल्या आयुष्याचीं पुष्कळशीं वर्षे ह्या ठिकाणी जावयाची आहेत, हेंच शहर आपलें वसतिस्थान होणार आहे, व येथेंच आपल्या हातून कांहीं लोकोपयोगी कार्यभाग होणें आहे, असा विचारही त्यावेळीं त्यांच्या मनांत आला नसावा!

**शिक्षण पूर्ण झाल्यानंतर**

**१८५९ – १८६४**

मि. हावर्ड ह्यांचें विद्यार्थ्यांच्या हिताकडे लक्ष बरेंच असे, असें वर म्हटलेंच आहे. १८५९ पर्यंतचा शिक्षणक्रम संपल्यानंतर आपल्या ज्ञानांत भर घालावयाची जी

संधि रामकृष्णपंतांस मिळाली, ती मि. हावर्ड ह्यांच्या योजनेमुळें, हें लक्षात ठेविलें पाहिजे. आपल्या ताब्यांतील विद्यार्थ्यांस जें कांहीं ज्ञान प्राप्त झाले यांत आणखी भर पडणें अवश्य आहे असें वाटून व ज्यांना ह्या वरिष्ठ शिक्षणाचा लाभ झाला आहे त्यांच्या ज्ञानाचा इतरांसही लाभ मिळावा ह्या हेतूनें मि. हावर्ड यांनीं एक युक्ति योजिली. पेशव्यांच्या वेळचा दक्षिणाफंड त्या वेळेपर्यंत तसाच लोळत पडला होता. त्याचा उपयोग सहा फेलोशिप्स नेमून करण्याची आपल्याला परवानगी असावी अशी त्यांनीं सरकारला विनंति केली व ती मान्य होऊन १८५९च्या जानुआरीत रामकृष्णपंतांस मि. हावर्ड ह्यांनी पहिले दक्षिणा फेलो नेमिलें. प्रथम त्यांची नेमणूक मुंबईस झाली होती. परंतु नंतर १८६० साली जून महिन्यांत हल्ली ज्यास आपण डेक्कन कॉलेज म्हणतो, त्या पुण्याच्या कॉलेजांत त्यांची बदली झाली. ह्या सहा फेलोशिप्सपैकीं एक नंतर प.वा. जव्हेरीलाल उमियाशंकर ह्यांसही देण्यात आली होती.

रामकृष्णपंत एकंदरींत ५।। वर्षे फेलो होते, एवढ्या अवधींत त्यांनीं आपलें ज्ञान, विशेषत: संस्कृताचें ज्ञान, बरेंच वाढविलें. सर रामकृष्णपंत भांडारकर हे संस्कृत ज्ञानामध्यें श्रेष्ठ पंडित म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत. परंतु कॉलेजांत शिकत असतां प्राप्त झालेल्या ज्ञानाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजें. त्यांच्या वेळीं कालेजात संस्कृत शिकविलें जात नसे. आणि यांचा गणितविषय मोठ्या आवडीचा असे. तथापि ते गणिती होते म्हणून पुढें जेव्हां त्यांनीं संस्कृताच्या अभ्यासास प्रारंभ केला त्यावेळीं तो अगर्दी जुन्या पद्धतीनें न करितां आपल्या चौकस स्वभावास साजेल अशाच रीतीनें केला. संस्कृताच्या अभ्यासास लागण्यापूर्वी आधीं त्यांनी महाराष्ट्र कवींची ओळख करून घेतली. असें सांगतात की, एकदां परिक्षेत प. वा. मंडलिकांनीं आर्या व श्लोक घातले होते. परंतु महाराष्ट्र कवींचीं काव्यें त्यांच्या वेळच्या विद्यार्थ्यांस लावतां येत नसत. म्हणून रामकृष्णपंत, नारायण महादेव परमानंद, बाळ मंगेश वागळे, इ. मंडळी, बाळोबा पाध्ये ह्यांच्याजवळ आर्या व श्लोक लावावयास शिकली. नंतर रामकृष्णपंतांनी संस्कृत भाषेच्या अभ्यासास प्रारंभ केला. ह्या अभ्यासाकडे त्यांचें लक्ष लागावयास पाश्चात्य विद्वान्च कारण झाले. ते फेलो असतांना त्यांच्या हें लक्षांत येऊन चुकलें कीं, आपले लोक संस्कृत भाषेस अत्यंत पूज्य मानीत आहेत खरे, परंतु शोधक बुद्धीनें अध्ययन करून, नंतर अनेक महत्त्वाचे शोध लावण्याचें व त्यासाठीं रात्रंदिवस मेहनत करण्याचें त्रासाचें काम परके लोक करीत आहेत! ही गोष्ट आपल्या त्या भाषेच्या अभिमानास कमीपणा आणणारी आहे असें वाटून त्या भाषेचा व्यवस्थित रीतीनें अभ्यास करण्याचा

रामकृष्णपंतांनीं निश्चय केला, व हा आपला विचार त्यांनीं मि. हावर्ड ह्यांस कळवितांच त्यांनीं त्यांस उत्तेजन देऊन शक्य तितकें साह्य करण्याचें अभिवाचन दिलें व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस साह्य केलेही. कॉलेजांतील शिक्षणक्रम संपूर्ण झाल्यावर त्यांनी ह्या नव्या अभ्यासास सुरुवात केली. मुंबईस थोडे दिवस गोविंद शास्त्री लेले, व त्यांच्याबरोबर मुख्यत्वेंकरून आप्पाशास्त्री खाडीलकर, ह्यांजपाशीं अध्ययन केलें व पुण्यास बाळशास्त्री देव व अनंतशास्त्री पेंढारकर ह्या शास्त्र्यांपाशीं त्यांनीं आपला अभ्यास चालू ठेविला. थोड्याच वर्षांत त्यांची इतकी गति झाली कीं, नंतर न्याय, व्याकरण, वेदांत ह्या विषयांसारख्या गहन विषयांवरील ग्रंथांचें ते स्वत:च अध्ययन करूं लागले. व त्यांत अखेरीस इतकी पारंगतता मिळविली की, इंग्रजी शिक्षण प्राप्त झालेल्यांमध्ये त्यांच्यासारखे शोधक, चिकित्सक व पंडित तेच होते असा त्यांचा लौकिक झाला.

रामकृष्णपंतांच्या संस्कृतांतील पारंगततेसंबंधानें एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. संस्कृत भाषेंतील धर्मविषयक ग्रंथांचें विशेष अध्ययन केलें म्हणजे पुरातनाकडील ओढा विशेष वाढतो; मन एककल्ली होतें; दुसऱ्या कोठून कसेंही सत्य ज्ञान प्राप्त होण्यासारखें असलें, तरी तें त्याज्यसें वाटू लागतें व मन कांहीं अंशीं अत्यंत आकुंचित होतें. असें पुष्कळाचें झाले आहे. मग रामकृष्णपंतांचें तसें कां झालें नाहीं? ह्यास कारण एकंदर अध्ययनामुळें त्यांच्यांत आलेला चौकसपणा व सत्यावरील त्यांचें अढळ प्रेम हें होय. सत्य कोठूनही आलें तरी त्याचा स्वीकार करावयाचा, सत्य केव्हांही आढळलें तरी त्याचा त्याग करावयाचा नाहीं, हें तत्त्व त्यांच्या हाडींमासीं भिनून गेल्यामुळे ह्या त्यांच्या सत्यप्रीतीमुळेंच ते दुराग्रही न होतां जुन्या शास्त्रीलोकांप्रमाणें एककल्लीही झाले नाहीत. सत्य ग्रहण करावयाचें, सत्य अत्यंत पूज्य व आदरणीय, हेच त्यांचें सदोदितचें धोरण असे.

मुंबई युनिव्हर्सिटी १८५७ साली स्थापन झाली. आणि पहिली प्रवेश परीक्षा १८५९ साली झाली. ह्या वेळींही मि. हॉवर्ड हेच विद्याखात्याचे प्रमुख होते. त्यांनीं असा नियम केला कीं, त्या वेळीं फेलो असणाऱ्यांनी युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस बसलें पाहिजे. आणि त्यांत नापास झाल्यास फेलोशिपवर पाणी सोडलें पाहिजे! अशी अटच घातल्यामुळें रामकृष्णपंतांसही १८५९ सालीं पहिल्या प्रवेश परीक्षेस बसावें लागलें. त्या वेळीं पुढें जे न्यायमूर्तीच्या पदास पोंचले ते मि. नानाभाई हरिदासही त्या परीक्षेस बसून रामकृष्णपंतांबरोबर प्रवेश परीक्षा पसार झाले. १८६१ सालीं रामकृष्णपंतांची एफ्.ए.ची परीक्षा उतरली, आणि १८६२ सालीं ते बी.ए.

झाले. हे जेव्हां बी. ए. झाले, तेव्हां एक विशेष गोष्ट घडली. ती ही कीं, पास झालेल्या विद्यार्थ्यांत प्रथम त्यांचें नांवच नव्हतें! त्यामुळें आतां आपली फेलोशिप जाणार अशी रामकृष्णपंतांची खात्री होऊन चुकली होती आणि नियमाप्रमाणें मी आपली फेलोशिप सोडण्यास तयार आहें, असेंही त्यांनीं दर्शविलें होतें. परंतु आपण नापास कसे झालों ह्याचें त्यांस बहुत करून आश्चर्य वाटलें असावें. कारण, सर अलेक्झांडर ग्रँट त्यांचे मार्क पहात असतां त्यांच्या नांवापुढे एका विषयाचे मार्क पाहून त्यांस फारच आश्चर्य वाटलें. कारण, त्यांनी त्यांचीं त्या विषयाचीं जीं उत्तरें पाहिली होतीं त्यांवरून रामकृष्णपंतांस जे गुण दिल्याचें त्यांस स्मरत होतें त्यापेक्षां त्या एकंदर विषयास त्यांस पुष्कळ कमी गुण पाहून त्यांस सहजच फार आश्चर्य वाटले. आणि मग अधिक चौकशी करतां त्यांच्या व कृष्णाजी बापूजी बाळ यांच्या मार्कांची अदलाबदल झाल्याचे आढळून आलें! ती चूक सुधारतांच रामकृष्णपंत बी.ए.त ‘ऑनर्स’सह पास झाल्याचें प्रसिद्ध झालें! ह्याच वर्षी प. वा. नामदार न्यायमूर्ति रानडेही बी.ए.ची परीक्षा पसार झाले. १८६३ साली रामकृष्णपंत आपली एम्.ए.ची परीक्षा पास झाले. परंतु एम्.ए.ची पदवी त्यांनी १८६६ साली घेतली. ते आपली एम्. ए. ची परीक्षा पसार झाले त्या वेळीं संस्कृत घेऊन त्या परीक्षेस बसले. ह्यावरून त्या वेळीं त्यांचे संस्कृताचें अध्ययन कोठपर्यंत गेलें होतें, त्याची वाचकांस कल्पना होणार आहे. असो. डेक्कन कॉलेजांत शिकविण्याचें काम करीत असतां इंग्रजी, लॉजिक व भाषाशास्त्र Philology हे विषय ते शिकवीत असत. त्यावेळीं आतांप्रमाणेच दरसाल अध्यापकांस आपल्या कामाचा रिपोर्ट प्रिन्सिपाल ह्यांस सादर करावा लागत असे. १८६४ सालीं प्रिन्सिपाल वर्डसवर्थ ह्यांस त्यांनीं जो रिपोर्ट सादर केला त्यांत एका वर्षांत शेक्सपियरचें जूलिअस सीझर, गिबनचे रोमन लॉवरील कांहीं भाग, मिलचें लॉजिक, व्हेटलीचें Easy Lessons on Reasoning नांवाचें एक पुस्तक व ह्या पुस्तकांचें अध्यापन चाललें असतां मिल, थॉमसन व मॅनसेल ह्यांचें त्या विषयांसंबंधानें काय मत आहे तें सांगणें इतका इंग्रजीचा अभ्यास झाल्याचा, व संस्कृताखेरीज मोरोपंताचें सभापर्व व व्याकरण आणि व्याकरणशास्त्र हेही विषय त्यांनीं एका वर्षांत संपविल्याचा उल्लेख आहे. ह्या आपल्या रिपोर्टांत रामकृष्णपंतांनी पुढील उद्गार काढिले आहेत:-

"My lectures to the first class embraced the history and development of Marathi language. That the Prakrit dialects arose from a corruption of Sanskrit and one of these by a further

development or change became our Modern Marathi, was proved by comparing Marathi vocables with their forms, as they exist in Prakrita, Maharashtri and in Sanskrit."

त्या काळचा मराठीचा अभ्यास कोणत्या प्रकारचा असे ह्याची कल्पना वरील उताऱ्यावरून वाचकांस होणार आहे. डेक्कन कॉलेजांत असतांना संस्कृत भाषेचे अध्यापक डॉ. हाउग नांवाचे एक गृहस्थ होते. ते १८६४ सालीं रजेवर गेल्यावर आपले इंग्रजी वगैरे शिकविण्याचें काम सांभाळून रामकृष्णपंतांनी डॉ. हाउग ह्यांचे संस्कृताचेही वर्ग कांहीं दिवस घेतले. ह्याच सालीं त्यांनीं फेलोशिपच्या जागेचा राजीनामा दिला. नंतर कायद्याचा अभ्यास करण्याचा त्यांचा विचार होता. कायद्याचा अभ्यास करण्याचा विचार मनांत येण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, ह्यांच्या बरोबरीचे बाळ मंगेश वागळे, महादेव गोविंद रानडे ह्यांनी कायद्याच्या अभ्यासांत मन घातलें होतें. हा विचार चालू असतांनाच सिंध हैद्राबाद येथील हायस्कूलच्या हेडमास्तरची जागा त्यांस एकदम देण्यांत आली. तेथें ते निघून गेले व कायद्याच्या अभ्यासाचा विचार मनांतच राहून गेला!

**हेड मास्तर, मदतनीस प्रोफेसर व प्रोफेसर**

**१८६५ पासून पुढील काळ**

सिंध हैदराबाद येथील शाळेच्या हेडमास्तरच्या जागेवर असतांना रामकृष्णपंत जेव्हां उन्हाळ्यांत मुंबईस आले त्या वेळीं सर बाल् फ्रिअर हे गव्हरनर होते. होतकरू आणि हुषार पदवीधरांस मोठमोठ्या जागा ते मुद्दाम उत्तेजनासाठी देत असत. हें पाहून रामकृष्णपंतांचा रेव्हिन्यु खात्यांत शिरण्याचा विचार होता. आणि गव्हरनरसाहेब बी.ए. झालेल्यांना डेप्युटी कलेक्टरच्या जागा देत आहेत असें पाहून आपलीही अशा जागीं नेमणूक व्हावी, अशी आपण खटपट करा, असें त्यांनीं डायरेक्टर मि. हॉवर्ड ह्यांस लिहिलेंहि होतें. परंतु मि. हॉवर्ड ह्यांस हा विचार पसंत पडला नाहीं. विद्याखात्यांत इतके दिवस घालविल्यावर आतां त्या खात्याशीं कांहीं संबंध नसणाऱ्या खात्यांत रामकृष्णपंतांसारख्या विद्वानानें जाणें त्यांस पसंत न पडून त्यांनीं रामकृष्णपंतांस रत्नागिरी हायस्कूलच्या हेडमास्तरची जागा एकदम दिली! त्यांनीं त्यांस जर ती जागा दिली नसती तर काय झालें असतें? संस्कृताचे असामान्य पंडित ह्या दृष्टीनें त्यांच्या हातून जी कामगिरी झाली आहे तीस हिंदुस्तान देश मुकला असता! ज्या शाळेंत आपण प्रथम इंग्रजी शिकलों त्याच शाळेवर हेडमास्तरच्या जागीं आपली नेमणूक होत आहे असें पाहून त्यांनीं ती जागा पतकरली. हें हायस्कूल ह्या वेळीं अगदीं खालावलें

होतें आणि त्याची नीट व्यवस्था लावण्यास रामकृष्णपंत हेच काय ते एक योग्य गृहस्थ आहेत असें वाटल्यावरूनच मि. हावर्ड ह्यांनीं त्यांची ह्या जागी नेमणूक केली.

ह्यापूर्वी तेथें मि. रसेल ह्या नांवाचे एक युरोपिअन गृहस्थ हेडमास्तर होते. हे गृहस्थ आपल्या शाळेसंबंधानें व आपल्या वर्गांतील मुलांच्या शिक्षणसंबंधानें कांहींसुद्धां काळजी घेत नसत, व आपण नेहमीं गुंगीत असावयाचे! तेव्हां अशा स्थितीत त्यांना विद्यार्थ्यांचा अभ्यास, अगर शाळेची एकंदर व्यवस्था सुचावी तरी कशी? रामकृष्णपंतांस एकदम हेडमास्तराची जागा मिळाली एवढ्यावरून ती जागा आपल्या लोकास त्या वेळीं सहज मिळण्यासारखी होती, असा समज होण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक स्थिति तशी नव्हती. रामकृष्णपंत हेच पहिले देशी हेडमास्तर होत व त्यांनींच मग इतरांस मार्ग मोकळा करून दिला. रत्नागिरीस येतांच आपल्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून ते मोठ्या आस्थेनें, निश्चयानें आणि आनंदानें आपल्या शाळेची सुधारणा करण्याच्या कामास लागले. आणि पहिल्याच वर्षी त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें; कारण, त्यांनीं प्रवेश परीक्षेस जे विद्यार्थी पाठविले ते सर्व त्या परीक्षेत उतरले. पहिल्या वर्षी रा. रा. धामणस्कर (हे पुढे बडोद्यास मोठ्या हुद्यावर होते.) रा. रा. गांगण, केशवराव रेगे हे त्यांचे विद्यार्थी होते. दुसऱ्या वर्षीही असेंच झालें. दुसऱ्या वर्षी प. वा. यशवंत बाळकृष्ण आठल्ये हे रामकृष्णपंतांचे विद्यार्थि होते. ह्यांच्या संस्कृताच्या अभ्यासासंबंधानें रामकृष्णपंतांनी फारच काळजी घेतली व त्यामुळें त्यांस त्या वर्षी पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. रामकृष्णपंत १८६५ पासून ६८ पर्यंत रत्नागिरीस हेडमास्तर होते. तेवढ्या काळांत त्या शाळेची साहजिकपणें फारच भरभराट झाली व तीन वर्षांत ह्या शाळेलाच दोन वेळ जगन्नाथ शंकरशेट स्कालरशिप मिळाल्या आहेत. रामकृष्णपंत रत्नागिरीस हेडमास्तर असतां पहिल्या वर्षी त्यांस जरी शाळेसंबंधानें बरेच काम पडलें तरी ह्याच वर्षी त्यांनीं आपलें संस्कृत दुसरें पुस्तक प्रसिद्ध केलें. पहिलें पुस्तक ते पुण्यास फेलो असतांना सन १८६४ सालींच त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. संस्कृताचा अभ्यास करणारांस ह्या दोन्ही पुस्तकांपासून किती लाभ झाला आहे व ही पुस्तकें इतर संस्कृत ग्रंथांच्या अध्ययनास किती साह्यभूत झाली आहेत तें आतां येथें सांगण्याची कांहीं आवश्यकता राहिलेली नाहीं. रत्नागिरीस हेडमास्तर असतांनाच म्हणजे सन १८६६ साली रामकृष्णपंतांस प्रथमच संस्कृत भाषेचे परीक्षक नेमिलें. त्यावेळीं नंतर न्यायमूर्ती झालेले काशिनाथपंत तेलंग हे एक उमेदवार होते. उत्तरें लिहिण्यांत त्यांची दिसून आलेली विलक्षण हुशारी पाहून रामकृष्णपंतांचें त्यावेळीं त्यांचेकडे प्रथम लक्ष गेलें. ह्यानंतर १९०८ पर्यंत रामकृष्णपंत

मुंबई युनिव्हर्सिटीचे परीक्षक असत. शेवटीं शेवटीं ते फक्त एम. ए. च्याच परीक्षेत परीक्षक असत. परीक्षक ह्या नात्यानें आपलें काम करण्यांत हे एम.ए.च्याच किती दक्ष असत आणि त्याची थोडीशी कल्पना व्हावी म्हणून येथें एक उदाहरण देतों. नेहमीप्रमाणें सन १८९९ साली त्यांस एम. ए. साठी परीक्षक नेमिलें होते. तेव्हां त्यांनी आपण होऊन सिंडिटेकला कळविलें कीं, यंदां आपण माझ्या जागीं डॉ. हूल्झ ह्यांस परीक्षक नेमावें! कारण, यंदां ह्याच परीक्षेस माझा मुलगा बसणार आहे. आणि त्यानें जे विषय घेतले आहेत ते त्याचे बरोबर मीं वाचलेले असल्यामुळें, मला यंदां त्या विषयाचें तरी परीक्षक होतां येत नाही. ही डा. भांडारकरांची स्पष्टोक्ति कोठें आणि आतां आपला कोणी आप्त अगर संबंधीं परिक्षेस बसणार असल्यास ती माहिती अवश्य द्यावी असा नियम असूनही कांहीं सबबीवर ती माहिती टाळणारे कांहीं परीक्षक कोठें! असो.

१८६८ सालीं एल्फिस्टन कॉलेजाचे संस्कृताचे कायमचे अध्यापक डॉ. बूलर रजेवर गेले. त्यावेळीं त्यांच्या शिफारसीवरून त्यावेळचे कामचलऊ डॉयरेक्टर कर्नल वॉडिंग्टन यांनीं रामकृष्णपंतांस डॉ. बूलर ह्यांच्या जागीं संस्कृताचे अध्यापक नेमिलें. त्यामुळें रत्नागिरी सोडून मुंबईस आल्यावर पुन्हां त्यांस रत्नागिरीस जावें लागलें नाहीं. ह्या जागीं रामकृष्णपंत तीन वर्षे होते. इतका वेळपर्यंत डॉ. बूलर रजेवरच होते असें नाहीं. परंतु ते रजेवरून परत आल्यावर शिक्षण खात्यांतच इन्स्पेक्टरच्या मोठ्या पगाराच्या जागेवर त्यांस नेमण्यांत आलें. त्यामुळे १८७२ पर्यंत रामकृष्णपंत संस्कृत भाषेच्या अध्यापकाचेंच काम करीत होते. परंतु १८७२ साली मुंबईसरकारने ही जागा बाहेरचा कोणीतरी मनुष्य आणून भरण्याचा विचार चालविला! लोकांस हा विचार पसंत पडला नाही, तरी ह्या जागी डॉ. पिटरसन ह्यांस सरकारनें आणिलें. ह्यावेळीं मि. चॅटफिल्ड हे एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपल होते. त्यांस रामकृष्णपंतांचें काम, त्यांची शिकविण्याची उत्कृष्ट हातोटी, त्यांची विद्वत्ता वगैरेचा अनुभव होताच व रामकृष्णपंतांसंबंधानें त्यांच्या ठायीं आदरभावही असावा. त्यांनीं रामकृष्णपंतांस असिस्टंट प्रोफेसरच्या जागीं नेमिलें; नाहीं तर त्यांस पुन्हा रत्नागिरीस जावें लागलें असतें. १८७३ पासून १८८२ पर्यंत ते मदतनीस प्रोफेसराच्या जागी होते. परंतु मध्यंतरीं १८७९-८० मध्ये ते पुण्याच्या कॉलेजांत संस्कृताचे अध्यापक होते. १८८२ साली डेक्कन कॉलेजचे संस्कृताचे प्रोफेसर डॉ. किलहार्न यांनी पेन्शन घेतलें. त्या वेळीही पुन्हां एकदां रामकृष्णपंतांच्या हक्कावर गदा येण्याचा संभव होता! परंतु दहा वर्षांत लोक बरेच शहाणे झाले होते. ह्यावेळीं वर्तमानपत्रांत ह्याबद्दल फारच चळवळ

झाली. काशीनाथपंत तेलंगांसारख्या बाणेदार व नांवाजलेल्या विद्वानानें ह्या बाबतींत पुढाकार घेतला; आणि ह्या कामीं डॉ. पिटरसन्चीही बरीच मदत झाली. एवढी जरी खटपट झाली, तरी सरकारने एका जर्मन गृहस्थाची ह्या जागी नेमणूकही केली होती! ह्यासंबंधानें सरकारचा असा विचार होता की, डॉ. पिटरसन् ह्यांस इंग्रजीचें अध्यापक करावें आणि रामकृष्णपंतांस मुंबईची जागा द्यावी व पुण्याच्या रिकाम्या राहिलेल्या जागेवर त्या जर्मन गृहस्थास नेमावें; परंतु हा विचार डॉ. पिटरसन् ह्यांस मुळींच पसंत पडला नाही. त्यांनीं कौन्सिलरांची गांठ घेऊन मला इंग्रजीचे अध्यापक तुम्हीं काय म्हणून नेमणार? मला ती जागा नको आहे. अमुक मनुष्य एखाद्या जागेस योग्य आहे किंवा नाहीं हें त्यास न विचारतां कसें ठरवितां येतें? मला संस्कृत भाषेचेंच अध्यापक रहावयास हवें आहे.' अशा रीतीनें कौन्सिलरांशी भांडून त्यांनी त्या जर्मन गृहस्थास येथें न येण्याची तार पाठविण्यास लाविलें! व त्यामुळें तिकडें जर्मन लोक मुंबई सरकारच्या ह्या चलबिचल वृत्तीबद्दल बरीच टीकाही करूं लागले. डॉय पिटरसन् ह्यांनी त्यावेळी केवळ स्वार्थासाठी जी खटपट केली, ती जर केली नसती, आणि ते जर्मन गृहस्थ जर आले असते, तर रामकृष्णपंतांची मात्र मध्यंतरी जागा जाण्याचा संभव होता. कारण, डॉ. पिटरसननीं सहसा आपले काम सोडलें नसतें, व नव्या इसमास इंग्रजी शिकवितां येणें शक्यच नव्हतें. म्हणजे मग अर्थातच रामकृष्णपंतांना रत्नागिरीस अगर दुपरें कोठें तरी जाणें भाग झालें असतें! असो. अखेरीस मुंबईसरकारनें आपला हट्ट सोडून दिला आणि रामकृष्णपंतांस डेक्कन कालेजचे कायमचे अध्यापक नेमिलें. रामकृष्णपंत हेच संस्कृतचे पहिले देशी अध्यापक होत. तेथें जाण्यापूर्वी १८७३ सालापासून तों १८८२ पर्यंत प्रत्येक वर्षी ते सिंडिकेटचे मेंबर होते. आणि पुढेंही त्यांची निवडणूक व्हावी अशी युनिव्हर्सिटीच्या फेलोंची इच्छा होती. परंतु त्यांनी तो मान नाकारला. कारण, तरुण आणि होतकरू विद्वानांस उत्तेजन द्यावयाचें, हें त्यांचे धोरणच असल्यामुळे त्यांनी काशीनाथपंत तेलंगासारख्यांस सिंडिकेटमध्यें येऊन काम करितां यावें म्हणून याउप्पर आपली सिंडिक होण्याची इच्छा नाहीं, असें स्पष्ट रीतीनें दर्शविलें. १८९३ पर्यंत डेक्कन कॉलेजांत संस्कृतचे अध्यापक ह्या नात्यानें काम केल्यानंतर त्यांनी पेन्शन घेतलें. त्यानंतर त्यांची वसति नेहमी पुण्यास असे व त्यांनीं कानिटकर एन्जिनिअरच्या देखरेखीखाली १८९२ साली बांधलेल्या घराचें त्यांनी संगमाश्रम असें नाव ठेविलें. शेवटपर्यंत ते याच आपल्या आवडत्या आश्रमांत रहात होते.

रामकृष्णपंत ज्याप्रमाणें संस्कृतज्ञ म्हणून जगप्रसिद्ध होते त्याचप्रमाणें Antiquarian पुराणवस्तुसंशोधक म्हणूनही त्यांची सर्वत्र प्रसिद्धी असे; परंतु ह्या विषयांकडे त्यांनी संस्कृताचा अभ्यास सुरू केला तेव्हांपासून त्यांचा कल झाला असें मात्र नव्हे. एका केवळ आकस्मिक अशा प्रसंगामुळे ह्या विषयाकडे त्यांचें लक्ष लागलें. १८७० साली डॉ. माणेकजी आदरजी नांवाच्या एका पारशी गृहस्थांस जमीनीत पुरलेला एक ताम्रपट सांपडला. तो त्यांनीं रामकृष्णपंतांस आणून दिला. त्या ताम्रपटावर जुन्या देवनागरी लिपीत कांही लिहिलेलें होतें. त्यावेळीं रामकृष्णपंतांस हीं जुनीं अक्षरें मुळींच माहीत नव्हतीं व त्यासंबधाची माहितीही कोठून मिळवावी तेंही त्यांस माहीत नव्हतें. परंतु लवकरच त्यांनीं प्रिन्सेप, वगैरेंची ह्या विषयावरील पुस्तकें आणवून त्या ताम्रपटावरील लेख लाविला व कांहीं दिवसांनी त्यासंबंधानें रायल एशियाटिक सोसायटीच्या शाखेपुढें निबंधही वाचिला; तेव्हांपासून त्यांचें ह्या विषयाकडे विशेष लक्ष लागलें. त्यांनी नंतर अनेक लेख वगैरे लिहून आपला शोधकपणा व्यक्त केला आणि डॉ. बरजेस ह्यांनीं जेव्हां Indian- Antiquary नांवाचे मासिक पुस्तक सुरू केलें, तेव्हां रामकृष्णपंतांवर त्यांची बरीच भिस्त असे. ह पुस्तकांतील त्यांचे लेख पाहून त्यांची कीर्ति सर्वत्र पसरूं लागली. १८७४ साली लंडन येथें International Congress of Orientalists जी भरली होती तिच्या तर्फे रामकृष्णपंतांस आमंत्रण आलें होतें; परंतु कांहीं खासगी अडचणीमुळें त्या वेळीं त्यांस जातां आलें नाहीं. तरी पण त्यांनी सभेसाठी नाशिक येथील कांहीं (Inscriptions) शिलालेखांसंबंधानें एक उत्तम निबंध लिहून पाठविला. त्यांत दिसून आलेली त्यांची विद्वत्ता व शोधक बुद्धि पाहून सर्वांनीं त्यांची त्या वेळीं फारच स्तुति केली होती. १८७५ सालीं Royal Asiatic Society of Great Britain and Ireland ह्या संस्थेनें त्यांस आपल्या संस्थेचे सन्मान्य (Honorary) सभासद नेमिलें. नंतर जर्मन ओरिएंटल सोसायटी, अमेरिकन ओरिएंटल सोसायटी, इटालियन एशियाटिक सोसायटी, ह्या संस्थांनी त्यांस सन्मान्य सभासद निवडिलें. त्याचप्रमाणें फ्रेंच इन्स्टिट्यूट आणि सेंट पीटर्सबर्ग येथील इंपीरिअल अकॅडमीचे ते 'कॉरस्पाँडिंग मेंबर' होते, रायल बोहिमन सोसायटी ऑफ सायन्सेसचे ते 'फारेन मेंबर' असत. १८७६ सालीं त्यांनीं आपली मालतीमाधवावरील टीका प्रसिद्ध केली. ह्या पुस्तकांत त्यांनीं आपली शोधकबुद्धी, विद्वत्ता व चौकसपणा चांगल्या रीतीनें प्रत्ययास आणून दिल्याचा त्या पुस्तकाचें अध्ययन करणारांस अनुभव आहेच. १८७७ साली वुइल्सन फायलॉलॉजिकल लेक्चरशिप स्थापन झाली आणि प्रथमत: रामकृष्णपंतांनींच ही

व्याख्यानमाला सुरू केली. ह्या मालेंतील त्यांच पांच व्याख्यानें रायल एशियाटिक सोसायटीच्या येथील शाखेच्या मजर्नलफ मध्यें छापून प्रसिद्ध झाली. राहिलेलीं दोन आणि पूर्वी छापिलेली पांच मिळून सातही व्याख्यानें एकत्र ग्रंथरूपानें आतां प्रसिद्ध झाली आहेत. ह्यानंतर प्रो. मॅक्समूलर ह्यांच्या मालेसाठी त्यांनीं वायुपुराणाचें भाषांतर करण्यास प्रारंभ केला; परंतु दुर्दैवानें हें काम त्यांचे हातून तडीसही गेलें नाहीं आणि जितकें तडीस गेलें तितकें त्या मालेंत प्रसिद्धही झालें नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. १८७९ सालीं सरकारनें पुरातन संस्कृत लेखांच्या संशोधनाचें काम त्यांचेकडे सोंपविलें. हें काम त्यांनीं आपल्या नेहमीच्याच पद्धतीप्रमाणें मन लावून केलें. आणि ह्या कामी त्यांनी किती त्रास सोसले असले पाहिजेत ह्याची साक्ष तें काम संपल्यानंतर प्रसिद्ध झालेले रिपोर्ट देतच आहेत. त्यांची विद्वत्ता, त्यांची शोधकबुद्धि हीं पाहून १८८५ सालीं गॉटिंजन (जर्मन) युनिव्हर्सिटीनें त्यांस Ph.D. (म्हणजे Doctor of Philosophy) ही बहुमानाची पदवी अर्पण केली. आणि १८८६ साली मुंबई सरकारानें डॉ. भांडारकरांस काठेवाडांतील संस्थानिकांच्या तर्फे व्हीएना येथील Congress of Orientalists मध्यें प्रतिनिधि पाठविलें. त्यांस Ph.D. ही पदवी प्राप्त झाल्यापासून युरोप व अमेरिका येथील अनेक संस्थांनी आपापल्या संस्थेचे सन्मान्य सभासद नेमिलें आहे. १८९१ सालीं त्यांस सरकारनें C.I.E. ही बहुमानाची पदवी अर्पण केली. १८९३ साली न्या. मू. तेलंगांच्या जागीं डॉ. भांडारकरांची युनिव्हर्सिटीच्या व्हाइस चॅन्सलरच्या जागीं नेमणूक झाली. १९०४ साली मुंबईच्या युनिव्हर्सिटीनें त्यांस एलएल. डी. ही दुर्मिळ पदवी दिली. मुंबई युनिव्हर्सिटीकडून ही बहुमानाची पदवी प्रथमच हिंदी गृहस्थास मिळाली. दादाभाई नौरोजी ह्यांस ही पदवी मागाहून देण्यांत आली. १९०८ साली कलकत्त्याच्या युनिव्हर्सिटीनें Ph.D. (Doctor of Philosophy) ही पदवी त्यांस अर्पण केली. मुंबईच्या LL.D. पदवीदान समारंभाच्या प्रसंग झालेल्या भाषणाचा उल्लेख पुढें केला आहे. त्यांस एडिंबरो युनिव्हर्सिटीनेंही LL.D. ही पदवी दिलेली आहे. K.C.I.E. ही पदवी १९११ साली राजाधिराज विलायतेहून हिंदुस्थानांत दिल्लीच्या समारंभासाठी आले होते त्यावेळीं त्यांस देण्यात आली. न्या. मू. रानडे ह्यांस डॉ. भांडारकरांसंबंधानें आपला आदरभाव व्यक्त करण्याची जाहीर संधि १८९७ साली आली. ह्या सालीं डॉ. भांडारकरांच्या नांवें एक फुकट वाचनालय मुंबईतील प्रार्थना मंदिरांत उघडण्यांत आलें. त्यावेळीं त्यांनीं आपल्या मार्गदर्शक मित्रासंबंधानें जे उद्गार काढले ते ह्या ठिकाणीं साररूपानें नमूद करणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों :– ‘आपणांपैकी

कित्येकांना डॉ. भांडारकर हे आपले पूर्वपिढींतील एक गृहस्थ असें वाटत आहे. परंतु जो मी आज कित्येक बाबतींत त्यांनींच दाखविलेल्या मार्गाचें अवलंबन करीत आहें, त्या माझी व त्यांची चाळीस वर्षांपूर्वी झालेली ओळख जणू काय पर्वांच झाली असे मला वाटत आहे. ह्या अवधींत सुदैवानें त्यांचा व माझा असा परिचय झाला आहे कीं, त्याच्या योगें त्यांच्या हातून घडलेलीं सत्कृत्यें अवलोकून त्यांच्याविषयींचें माझें प्रेम व माझा आदर हीं वृद्धिंगतच झालीं आहेत... कोणी म्हणतात की प्रार्थनासमाज हा काय एक प्रार्थना करण्याचा दिवाणखाना आहे आणि एकेश्वरी धर्माचा प्रसार करणारीं लायक माणसें कांहीं ह्या प्रांतीं झालीं नाहींत. परंतु मजप्रमाणेच आपल्या सगळ्या आयुष्यभर डॉ. भांडारकरांचा ज्यांस परिचय झाला आहे व तेजीं कांहीं थोर कार्ये करीत असत त्यांची योग्यता ज्यांस माहीत आहे त्यांस असल्या विधानांची किंमत सांगणें नलगे. होय, आमचा हा दिवणखाना खरोखर प्रार्थना करण्याचाच दिवाणखाना आहे आणि माझ्या दृष्टीनें ह्याचें अधिक चांगलें वर्णनच करितां यावयाचें नाहीं! परंतु आमच्या मतांचा प्रसार करणारी लायक माणसें ह्या प्रांतीं झालींच नाहींत किंवा आज नाहींत असें म्हणणें हें मात्र वस्तुस्थितीस सोडून आहे. डॉ. भांडारकर ह्यांची योग्यता ब्राह्मसमाजाच्या थोर पुढाऱ्यांपेक्षा मुळींच कमी नाहीं. डॉ. भांडारकर हे केवळ विद्वान् गृहस्थ नाहींत. पुष्कळसे श्रम केल्यानें विद्वत्ता कोणासही प्राप्त होते. ते विद्वान् असून त्याच्याही पेक्षां फार थोर आहेत. ते मार्गदर्शक आहेत; पण ते मार्गदर्शक आहेत असें म्हणण्यानेंही त्यांच्या योग्यतेची खरी कल्पना होत नाहीं. ते आमचे गुरु आहेत, त्यांचें उदाहरण आम्हीं आमच्या दृष्टीपुढें ठेविलें आहे व त्यांच्या द्वारा आमच्या आयुष्यांत आम्हांस पुष्कळच बोध झाला आहे.'

**गुरुवर्यांच्या चरित्राचें रहस्य**

डॉ. भांडारकरांच्या चरित्राचें येथेपर्यंत अवलोकन करणारांच्या हें लक्ष्यांत आलेंच असेल की, ज्या विशेष गुणांमुळें पुढें डॉ. भांडारकरांची कीर्ति वाढली व ते अप्रियही झाले, त्या मुख्य गुणाचा - सत्यनिष्ठा व चिकित्सक बुद्धि - पाया ते कॉलेजांत शिकत असतांना घातला गेला होता. त्यांस जे अध्यापक लाभले होते त्यांत मि. ओवेन ह्या नांवाचे एक सज्जन गृहस्थ होते. प्रेमळपणा, सत्यनिष्ठा, सारासार विचार, समतोलपणा, सर्व बाजूंचा विचार करून स्वतःचें मत बनविणें, पूर्वग्रहांचा त्याग करून, सरळ बुद्धीनें हातीं घेतलेल्या कार्यांत मन घालणें, इ. मि. ओवेन ह्यांच्या गुणांचा रामकृष्णपंतांवर अत्यंत अनुकूल असा परिणाम झाला. इतका कीं, ज्या ज्या

वेळीं चरित्र लिहिते वेळीं मि. ओवेन ह्यांच्याविषयीं संभाषणाचा योग आला त्या त्या वेळीं, मि. ओवेन ह्यांच्या संबंधानें अत्यंत आदराचे उद्गार त्यांनी काढले व जर कोणा एका अध्यापकाच्या चारित्र्याचा व विचारांचा माझ्या मनावर विशेष परिणाम झाला असेल, तर तो मि. ओवेन ह्यांच्या चारित्र्याचा, विचारांचा व सहवासाचा होय असे उद्गार त्यांनी काढलेले लेखकास स्मरतें. आणि ह्या गुणांमुळेंच केवळ अध्ययन व अध्यापन, संशोधन व तत्संबंधीं व्यवसाय ह्यांत ते गढून राहिले नाहींत. सत्यान्वेषणाचें कार्य सर्व प्रकारच्या व्यवहारांत त्यांनीं केलें; आणि केवळ ह्या दृष्टीनेंच सामाजिक व धार्मिक बाबींकडे त्यांचें लक्ष वेधलें गेलें. सत्याचेंच ग्रहण करावयाचें, तर धर्माचा विचार करीत असतांना, विवेकास न पटणाऱ्या अतएव असत्य अशा पुष्कळ गोष्टी दिसतात, त्यांस चिकटून धर्मभावाची वाढ कशी व्हावी? सामाजिक बाबतींतही हाच प्रकार. केवळ कांहीं तरी नवीन करावयाचें ह्या बुद्धीनें डा. भांडारकरांनीं कांहीं केलें नाहीं. बालविवाहाचा त्याग काय, गतभर्तृकांचा विवाह काय, जातिभेदाचें बंड मोडणें काय, भागवतधर्माचें सेवन काय, जुन्या कित्येक आचारविचारांचा त्याग काय, सर्व कार्यांत असत्याचा त्याग करून सत्याचा आश्रय करावयाचा; आकाश कोसळो, लोकप्रीति ढासळी, मानमान्यता दूर पळो, कांहींही होवो, परमेश्वरानें दाखविलेला मार्ग सोडावयाचा नाहीं, त्यांतच रहावयाचें हा त्यांचा बाणा होता. आणि ही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवून परमेश्वराच्या कृपेनें दीर्घ काळपर्यंत टिकलेल्या त्यांच्या चरित्रांतील सर्व गोष्टींकडे पाहिलें पाहिजे. एकदा पन्नास हजार रुपये किमतीच्या जमीनीची मालकी व थोडेसें असत्य भाषण असा प्रश्न त्यांच्यापुढें आला असतांना म्हणजे थोडेंसें असत्य भाषण केल्यास पन्नास हजार रुपये किंमतीची जमीन मिळण्याचा संभव असतांना जमिनीच्या मालकीचा मोह त्यांस बिलकुल झाला नाहीं व सत्य गोष्टीचें कथन करवून त्यांनीं अपूर्व जय मिळविला.

डॉ. भांडारकरांनीं गेलीं पन्नास पंचावन वर्षे प्रार्थनासमाजाची जी सेवा केली आहे व निरनिराळ्या रीतींनीं जी धर्माची सेवा बजाविली आहे त्याची अस्पष्ट कल्पनाही ह्या येथें सहज करून देणें शक्य नाहीं. जेथें सर्व कार्ये धर्म्य कार्ये म्हणून होत होतीं, जेथें त्यांच्या रोमरोमामध्यें धर्मभावना संचरत होती, तेथें हीं इतकीं कार्ये त्यांचीं धर्मसंबंधाचीं असें सांगणें कठिण आहे. खरें पहातां मुंबईच्या समाजाची स्थापना अगदी थोड्या व्यक्तींनीं ह्या शहरीं १८६७ सालीं केली व त्यावेळीं गुरुवर्य रत्नागिरी येथें हेडमास्तर होते. म्हणून प्रार्थनासमाजाच्या स्थापनेपासून त्यांचा ह्या संस्थेशी संबंध नव्हता असें म्हणावयास आमची तयारी नाहीं. कारण ह्या बाबतींत ‘मी येथें

नव्हतों म्हणजे केवळ शरीरानें नव्हतों. मी कामानिमित्त परगांवीं होतों. पण, संस्था स्थापन झाली तिचे उद्देश मला मान्य होते व म्हणूनच पुढें दीड वर्षानें येथें आल्याबरोबर मी समाजांत प्रविष्ट झालों आणि समाजाशीं निकट संबंध जोडला, तो तेव्हांपासून अद्यापपर्यंत तसाच कायम आहे' अशी त्यांची स्वत:ची वाणी आह्मांला सांगत आहे. १८६९ सालीं येथें आल्यापासून पुण्यास जाईपर्यंत १२ वर्षांत मुंबई समाजाची बहुमोल सेवा त्यांनीं बजाविली. स्थापनेच्या वेळीं जीं धर्मतत्त्वें ठरलीं होतीं त्यांस रामकृष्णपंतांनीं हल्लींचें स्वरूप दिलें. समाजाच्या सर्व कार्यांत त्यांनीं पुढाकार घेतला; आपला धर्म आपापल्या व्यक्ति पुरताच राहून उपयोगाचा नाहीं, त्याचा प्रत्येक सभासदाच्या कुटुंबामध्यें प्रवेश झाला पाहिजे, असा सारखा आग्रह रामकृष्णपंतांचा असे. सुबोधपत्रिका पत्रासाठीं लहान मोठे लेख त्यांनीं ह्याच काळांत लिहिले आहेत. ईश्वरविषयक ज्ञान इ. जे लेख धर्मपर लेखांत समाविष्ट आहेत ते प्रथम पत्रिकेसाठीं त्यांनीं लिहिले. प्रार्थनासमाजा संबंधानें केसरी भलते सलते ग्रह उत्पन्न करीत आहे हें पाहून त्यांनीं संपादकाशीं वाद चालविला; सुशिक्षितांस तुकोबा पूर्वी अवगत नव्हते. उत्सवांतील गायनपत्रकामध्यें प्रथम तुकोबांच्या अभंगांचा समावेश ते करूं लागले. नंतर प्रार्थना संगीतामध्यें त्यांचा समावेश त्यांनींच केला; पुण्यास तुकाराम सोसायटी स्थापून सुमारें दोन हजार अभंगांची चर्चा त्यांनी पुढाकार घेऊन केली. प्रार्थना मंदिरांत हरिकीर्तन करण्याचा प्रघात त्यांनीं पाडला; मुंबईस असतांना मुंबईच्या मंदिरासाठीं त्यांनींही धन मिळविलें, पुण्याचें नवें मंदिर तर त्यांच्या आस्थेची व तळमळीची साक्ष देत आहे; त्यांनीं अनेक पद्ये आजपर्यंत रचिलीं असून त्यांपैकी कित्येकांचा प्रार्थना संगीतामध्यें समावेश केलेला आहे. १९१९ सालीं त्यांचा आवाज क्षीण झाला, 'आतां आवाज फार कोता झाला आहे, बोलण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं, म्हणून आतां व्याख्यानांची येथेंच समाप्ति झाली असें समजावें' असे गहिंवर आणणारे उद्गार त्यांनीं त्या सालीं काढले. त्यांची उपासना म्हणजे त्यांच्या आत्यंतिक धर्मश्रद्धेची साक्ष पटविणारी असावयाची. त्यांचा प्रत्येक शब्द अंत:करणाला पीळ पडून जणूं काय बाहेर पडत असे व तो जसा बाहेर पडे तसा ऐकणाराच्या अंत:करणावर ठसा उमटवून जाई. त्यांचा गंभीर चेहरा, विचारांत मग्न असलेली स्थिति, त्यांचें पहाणें ह्या सर्वांच्या द्वारे त्यांच्या थोरपणाची साक्ष पटत असे. त्यांचा परमेश्वरावरील विश्वास इतका अढळ होता कीं, तो कोणत्याही स्थितीमध्यें ढळला नाहीं. त्यांच्या चरित्रामध्यें असा एक काळ होता कीं त्यांस लौकिकाच्या दृष्टीनें त्यांना कांहीं उणें नव्हतें. त्यांचे कुटुंब फार मोठें झालें होतें. मुलें नातवंडे त्यांच्यासभोंवर आनंदानें

नांदत होतीं. देवाच्या प्रेमाचा, सहवासाचा, आनंदाचा, सामर्थ्याचा संगमाश्रमांत राहून व बाहेर ते आस्वाद घेत होते. योग्य वेळ येतांच त्यांनीं सरकारी नोकरी सोडिली होती. विश्रांति, देवाची धर्माची सेवा व नित्याचे लेखनव्यवसाय ह्यांत ते गर्क होते. अशा वेळीं ज्यांना पूर्वी दु:ख माहित नव्हतें, वियोगजन्य दु:ख सहन करण्याचा प्रसंग पुष्कळ वर्षांत आला नव्हता, त्यांजवर एकामागून एक अत्यंत बिकट अशा आपत्ति येऊन कोसळू लागल्या! प्रथम त्यांच्या सर्व कार्यांत त्यांस साहाय्य करावयास सिद्ध असलेली त्यांची प्रिय पत्नी त्यांस सोडून गेली. तो व्रण कायम असतांनाच, जिचें शिक्षण त्यांनीं आपल्या स्वत:च्या देखरेखीखालीं केलें होतें, गतभर्तृका असतांना, मोठें धैर्य करून, जिचा विवाह त्यांनीं जुळवून आणिला व जी सुखानें आपला संसार करीत होती, ती त्यांची प्रिय कन्या सौ. शांताबाई परलोकवासी झाली. त्यानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रो. श्रीधरपंत गेले, नंतर श्रीधरपंतांचा ज्येष्ठ पुत्र दिवाकर परदेशींच मृत्युमुखीं पडला. हीं सर्व एकावर एक आलेली संकटें सहन करून, परमेश्वरावर भरिभार घालून काळ कंठीत असतां, गेल्या जून महिन्यांत प्रभाकरपंतांना एकाएकीं ह्या जगांतून काळानें ओढून नेलें व त्यांच्या दु:खाची अतिकोटी झाली! तरी पण हीं सर्व दु:खें त्यांनीं अत्यंत शांतपणे सहन केलीं. असल्या आपत्ति आल्या तरी त्यांच्या तोंडून अविश्वासाचा एक शब्दही कधीं बाहेर पडला नाहीं. कारण, त्यांचा असा जागृत विश्वास होता कीं,

Trials are one of the ways in the wise Dispensation of our loving and Almighty Father to purify and elevate our character, and in this belief we should surrender ourselves to His will and throw ourselves in His lap. (From a letter.) हा उपदेश त्यांनीं केवळ इतरांस केला नाहीं, तर त्यांचें आचरण तंतोतंत वरील वाक्यांत म्हटल्याप्रमाणें होतें. त्यांच्या वयाला आतां ८८ वर्षे झाली होती. सर्व बाबतींत ते परावलंबी होते हैं 'आतां ह्या जीवाचा व जगण्याचा आपल्याला कंटाळा आला असेल नाहीं?' असा धिटाईचा प्रश्न कोणीं पाहून त्यांना केला असतांना त्यांनीं तितक्याच स्पष्टपणें उत्तर देतांना म्हटलें, ''नाहीं, कंटाळा मुळींच आला नाहीं. कारण, परमेश्वर ज्या स्थितींत ठेवितो त्या स्थितींत समाधान मानून राहावयाचें हें माझें कर्तव्य आहे.'' अशा प्रकारें सर्व बाबतींत परमेश्वराचीच इच्छा प्रमाण मानून, तोच आपला सर्वस्वी आधार ह्या जागृत विश्वासाच्या जोरावर ते काळ कंठीत होते.

डॉ. भांडारकर ह्यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें ह्यांचें वरवर अवलोकन करणारांच्या एक गोष्ट ताबडतोब लक्षांत येते ती अशी कीं, त्यांची तुकोबांवर अलोट भक्ति होती व तुकारामाच्याच आध्यात्मिक अनुभवास विशेष महत्त्व देऊन, त्यांनीं आपल्या आध्यात्मिक जीवनाची रूपरेषा आंखिली. व्याख्यानांमध्यें जागोजाग तुकोबांविषयीं अत्यंत आदराचे उद्गार त्यांनीं काढले आहेत. तुकोबांकडे त्यांचा इतका ओढा कां? याचें उत्तर डॉ. भांडारकरांनीं तुकोबा आणि प्रार्थनासमाज ह्या आपल्या व्याख्यानांत विस्तारपूर्वक दिलें आहे. त्यांत ते म्हणतात तुकोबा 'वारंवार सूक्ष्म परीक्षणांनीं आपल्या दोषांचें उच्चारण करून त्यांतून मुक्त करण्याविषयीं देवाची प्रार्थना करीत असत. अशा साधकांमध्यें तुकोबांसारखा आम्हांस मार्गदर्शक दुसरा गुरू कोण सांपडेल?' तसेंच एका खाजगी पत्रांत ते म्हणतात :-

Tukaram is the leading devotee of God whose sole object in life was to prepare himself for fellowship with God and he uttered sentiments and feelings in a manner admired by all men of discernment and faith. In his progress towards the attainment of his object an incalculable number of thoughts owning their origin to a numberless feelings of variety arose in his heart and there he gave expression to them in an inevitable manner. His expostulation with God (येऊनी मजमाजी करावी हो वसती) against his not having come to dwell in his heart, not withstanding all his devices, is very affecting; and his throwing himself on his mercy (आतां तुज कळेल तें करी) after being baffled everywhere is very impressive. What thoughts can be more elevating to the human soul than that contained in the अभंग 'आपुलें मरण देखिलें म्यां डोळां ।' 'दिला जीवभाव' 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती' (From a letter written in 1919)

अशा प्रकारें तुकोबांविषीं अत्यंत आदरभावच ठेवून ते स्वस्थ बसले नाहींत. तुकोबा कसून आत्मपरीक्षण करीत असत. गुरुवर्यांचीं सर्व धर्मपर व्याख्यानें त्यांच्या आत्मपरीक्षणपर वृत्तीची साक्ष पटवीत आहेत. त्यांचा प्रार्थनेवर किती विश्वास होता हें त्यांचेच वर अवतरलेले उद्गार आपणास सांगत आहेत. आपल्या स्वतःच्या प्रार्थनेच्या वेळीं, परमेश्वराशीं त्यांचें जें निवेदन चालत असे तें ऐकून जवळ असलेल्या व्यक्तींसही हें आत्मपरीक्षण अनुभवून मोठा लाभ होत असे. इतरांचें परीक्षण न करितां, स्वतःच्याच परीक्षणाकडे त्यांचा ओढा असे. तुकोबांचे आत्मपरीक्षणपर

उद्गार त्यांनीं आत्मसात् केले होते व त्यांच्याच उक्ति आपल्या अनुभवाशीं एकरूप करून त्या त्यांच्या तोंडावाटे भराभर निघत असत.

वर एके ठिकाणीं आम्हीं म्हटलें आहे कीं, गुरुवर्य प्रथमदर्शनीं दिसावयास उग्र दिसत. परंतु हा सर्व वरवरचा प्रकार असे. निरपेक्षबुद्धीनें, स्वार्थाचा विचार न करितां समाजकार्यासाठीं अगर कोणत्याही सत्कार्यासाठी कोणी झटत आहे असा त्यांस अनुभव आला म्हणजे मग त्यांचें लक्ष अशा व्यक्तीकडे सहज जात असे व समाजाच्या सेवकांविषयीं त्यांच्या मनांत विशेष आदर वसत असे. कोणीही तरुण आपल्या ईश्वरदत्त देणग्यांचा समाजकार्याकडे उपयोग करीत आहे असें त्यांना समजलें कीं त्यांना कोण आनंद होत असे! संसार हा देवाचा, ह्या संसारांतील सर्व कार्ये योग्य प्रकारें करून देवाच्या सेवेंत रत असावें, सत्कार्ये देवाच्या चरणीं वाहून देवाची सेवा करावी हा त्यांचा बाणा होता, हा त्यांचा उपदेश असे. आणि ह्याप्रमाणें वागणारे व धर्मकार्यास प्राधान्य देऊन त्यास वाहून घेणारे तरुण त्यांस आढळले म्हणजे त्यांस किती तरी आनंद होत असे. आपल्या धर्मानुभवाप्रमाणेंच समाजांतील कांहीं माणसें तरी अनुभव प्राप्त करून घेण्याच्या मार्गांत आहेत असा अनुभव येतांच त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येत! तरुण माणसें उपासना चांगल्या चालवीत आहेत, आपलें लेखनसामर्थ्य समाजकार्य वेंचीत आहेत हें पाहून ते प्रसन्न होत! आपल्या चिरंजीवानें आपल्याप्रमाणेंच कीर्तनाचा व्यवसाय समाजकार्य म्हणून उचलला हें पाहून, आपली कीर्तनकाराची माळ त्यांनीं त्यांच्या गळ्यांत घालून आपला आनंद व्यक्त केला! दुसरा एक तरुण कीर्तन करूं लागलेला पाहून, त्याच्या कीर्तनांत बसून, नंतर त्याला लाजविण्याइतका त्याच्यावर स्तुतीचा त्यांनीं वर्षाव केला! सारांश, समाजांतील नव्या पिढीकडे त्यांचें सतत लक्ष असे व तरुणांचें लक्ष ह्या कार्याकडे लागत आहे असा अनुभव आला कीं त्यांच्या आनंदास भरतें येत असे.

त्यांच्या ठिकाणीं 'वरी तोचि पोटी' भाव असे. जें मनामध्यें नाहीं त्याची बतावणी करणें हा प्रकार त्यांस माहीत नसे. त्यांनीं केव्हांही कोणाची विनाकारण स्तुति केली नाहीं आणि केव्हांही कोणाचें अनुकरण केलें नाहीं. ब्राह्मधर्म सत्यग्राही आहे हें तत्त्व त्यांस मान्य होतें. सर्व धर्मांतील सत्यांश अत्यंत आदरानें ते घेत; परंतु आपल्या आर्य संस्कृतींतील सत्याच्या व अनुभवाच्या कसास उतरणारा भाग ते प्रथम ध्यानांत घेत. गोपाळराव देशमुखांनीं पुराणांची विदारणा करून, पुराणें म्हणजे शिमगा असें प्रतिपादिलें. त्या वेळीं पुराणांचा पक्ष घेऊन रामकृष्णपंत भांडावयास पुढें आले! त्यांच्या दीर्घकाळ टिकलेल्या सर्व चरित्राकडे सूक्ष्म दृष्टीनें जे कोणी पहातील त्यांस

त्यांनीं केव्हांहि कोठेंही अंध अनुकरण केल्याचें दिसून येणार नाहीं. सत्याच्या, अनुभवाच्या, नीतीच्या कसास जें उतरलें तें त्यांनीं घेतलें; आपल्या आर्यसंस्कृतींतील ह्या कसास जें जें उतरलें त्याचा त्यांनीं आदरानें स्वीकार केला व सत्यानें वागून, सत्यव्रत चालवून, सत्याचा महिमा आपल्या आचरणाच्या द्वारें त्यांनीं गाइला.

**ग्रंथरचना व अमोल ठेवा**

डॉ. भांडारकरांनीं ग्रंथरचना पुष्कळ केली. त्यांचे संशोधनकार्यपर निबंध, त्यांचे रिपोर्ट, त्यांचीं वुइल्सन लेक्चर्स, त्यांचीं दोन संस्कृत पुस्तकें, मालतीमाधवावरील त्यांची जगप्रसिद्ध टीका, व त्यांचा अखेरचा वैष्णव व शैव पंथावरील असामान्य योग्यतेचा ग्रंथ त्यांच्या विद्वत्तेची, चिकित्साबुद्धीची, त्यांच्या सत्यप्रीतीची व त्यांच्या चिकाटीची साक्ष पुरवितात; पण त्यांच्या अंत:करणाची धर्मश्रद्धेची, परमेश्वरावरील त्यांच्या निष्ठेची, त्यांच्या उत्कट भक्तीची, त्यांच्या धर्मविचारांत, धर्मानुभवांत रममाण होणाऱ्या आत्म्याची ओळख त्यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें पटवूं शकतात. हा अनेक ठेवा त्यांनीं भावी पिढ्यांसाठीं ठेविला आहे. जावत्कालपर्यंत मराठी भाषा आहे, जोंपर्यंत मनुष्यांचीं अंत:करणें सहज प्रवृत्तीनें धर्माकडे वळत आहेत, सत्य व न्याय, धर्मानुभाव, उदार धर्मविषयक विचार आपलेसे करणारीं माणसें महाराष्ट्रांत आहेत, तोंपर्यंत हा अमोल ग्रंथ कोणत्याही स्थितींतील माणसास शांति, समाधान व आनंद ह्यांचा लाभ करून द्यावयास पुरेसा आहे. ज्यांनीं ज्यांनीं ह्या ग्रंथांतील लेखांचें व व्याख्यानांचें अध्ययन केलें त्यांस तो त्यांच्या दैवी संपत्तीचा भांडारच वाटला. ही दैवी संपत्ति त्यांनीं पुढील पिढीसाठीं ठेविली आहे. सर्वांचा ह्या संपत्तीवर वारसा आहे. सर्वांनीं ती लुटावी. ती कमी व्हावयाची नाहीं, तिचें महत्त्व कमी व्हावयाचें नाहीं. ऐहिक संपत्ति पुष्कळ वेळां शांतीचा भंग करते, ही दैवी संपत्ति शांतीचा लाभ व परमेश्वराची प्राप्ति करून देते. ती गुरुवर्यांनीं मागें ठेविली आहे.

गुरुवर्यांनीं सतत पन्नास पंचावन वर्षे धर्मसेवेचें जें कार्य केलें त्याचा विचार मनांत आला कीं त्यांच्याविषयीं तात्काळ आदरभाव जागृत होतो. हातपाय धड होते त्यावेळीं त्यांनीं हातांनीं धर्मपर लेख लिहिले, पायांनीं प्रवास केला व वाचेच्या द्वारें लोकांस जागृत केलें. हरिकीर्तनास लोकांच्या झुंडीच्याझुंडी याव्यात व चार चार पांच पांच तास हरिकीर्तनाचा लाभ घेत तटस्थपणें लोक बसत. स्वत:चे डोळे काम करीनातसे झाले त्यावेळीं इतरांच्या डोळ्यांचा फायदा घेऊन त्यांनीं धर्मकार्य केलें. स्वत: ते हात वार्धक्यामुळें काम करीनातसे झाले त्यावेळीं इतरांच्या हातांचा उपयोग करून घेऊन त्यांनीं धर्माची सेवा बजाविली. अखेरीस आवाज क्षीण झाला, बोलण्याचें

सामर्थ्य राहिलें नाहीं त्यावेळीं इतरांस आपल्या धर्मानुभवाचा लाभ करून देण्याची क्रिया थांबली! तथापि त्यांचें स्वत:चें साधन मात्र नित्य चालू होतें. अशा प्रकारें परमेश्वराच्या ह्या एकनिष्ठ सेवकाच्या सहवासाचा सतत लाभ झाला त्याबद्दल अत्यंत लीन अंत:करणानें आम्ही दयाघन परमेश्वराचे आभार मानतों. गुरुवर्यांचें तें कृश झालेलें शरीर आतां दिसावयाचें नाहीं. त्यांच्यावर दृढ श्रद्धा असणारांचे पाय आतां संगमाश्रमाकडे ओढ घेणार नाहींत, आणि कोणी तेथें गेल्यावर त्यांच्या नेहमींच्या बसावयाच्या ठिकाणीं उद्योगरत, वाचनलेखनमननरत ती व्यक्ति आतां दिसावयाची नाहीं. तथापि ज्यांना ज्यांना त्यांचा सहवास झाला, परिचय झाला, त्यांस त्यांचा केव्हांहि विसर पडावयाचा नाहीं. परमेश्वरानेंच त्यांस सर्व सामर्थ्य दिलें, ह्या ईश्वरदत्त देणगीचा देवाच्या कार्याकडेच त्यांनीं उपयोग केला व देवाचे एकनिष्ठसेवक ह्या नात्यानेंच त्यांनीं आपलीं सर्व कार्ये करून देह ठेविला. धर्म व परमेश्वराशीं नित्य सहवास, सत्यनिष्ठा व सदाचारपालन ह्यांतच त्यांच्या जीवनाचे रहस्य होतें. आणि प्रार्थनासमाज ह्या संस्थेचें जे ध्येय त्याच्या पालनासाठीं अहर्निश झटत असतांच आपल्या आध्यात्मिक उन्नतीस अमूप अवसर सांपडत होता असा त्यांचा विश्वास व अनुभव होता. त्यांच्यासारख्या विद्वान् प्रतिभाशाली, सर्व खंडांत कीर्ति झालेल्या व्यक्तीस केवळ आपलें संशोधनकार्य घेऊन बसणें अशक्य नव्हतें, परंतु त्यापेक्षां आपल्या आत्म्याच्या तळमळीकडे त्यांचें लक्ष अधिक होतें. त्यामुळे सर्व कार्ये करीत असतांना परमेश्वराच्या सान्निध्यांत ते राहिले व आध्यात्मिक उन्नतीस त्यांनीं महत्त्व दिलें. देव करो आणि त्यांचें ध्येय दिवसेंदिवस अधिकाधिक आदरणीय वाटून, नव्या पिढीचें लक्ष त्यांच्या ध्येयाकडे अधिकाधिक लागो. त्यांचे असामान्य गुण जनतेच्या आचारांत दिसूं लागोत, व त्यांच्या ध्येयाचें परिपालन, प्रसार व त्या ध्येयास पुष्टि हीं सर्वांच्या आचरणांत अधिकाधिक दिसोत. गुरुवर्यांचा पवित्र आत्मा परमेश्वराच्या योजनेनें उन्नतिपथांत आहे असा आमचा विश्वास आहे. ज्या संस्थेची सतत पंचावन वर्षे त्यांनीं काळजी वाहिली तिच्या उन्नतीसाठीं ते झटले, त्यांचें अखिल जीवन परमेश्वराच्या सेवकास शोभण्यासारखेंच झालें आहे. म्हणून सुरुवातीच्याच वाक्यांनीं आम्ही गुरुवर्यांस उद्देशून म्हणतों कीं, आपण तर

Life's race well run,
Life's work well done,
Life's crown well won
Now comes rest.

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
   (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
   by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
   (in English and Marathi),
   by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
   (To Searches is Education), (in Marathi),
   by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
   by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
   by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
   Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
   Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

- **ENCOUNTERS WITH POLITICIANS,**
  **Author : Anil Swarup,**
  **Unique Publishers (I) Pvt.Ltd.**
  **New Delhi, 2024, Pp. xxi + 277, Price - Rs. 395/- (Paperback)**

प्रशासनात, लष्करात अगर राजकीय व्यवस्थेमध्ये प्रदीर्घ काळ कारकिर्द बजावलेल्या व्यक्तींची आत्मचरित्रे अथवा शब्दबद्ध करण्यात आलेल्या त्यांच्या आठवणी दोन अंगांनी रोचक आणि वाचनीय असतात. अशा व्यक्तींनी ज्या क्षेत्रात ज्या पदांवर सेवा बजावलेली असते त्या क्षेत्रातील कामकाजपद्धतींचा परिचय अशा दस्तऐवजांद्वारे वाचकांना घडतो. केवळ इतकेच नव्हे तर, दैनंदिन कामकाजाचा भाग म्हणून अशा व्यक्तींचा राजकारणी, प्रशासक, नेते, लष्करी अधिकारी अशांशी जो अनुबंध व संवाद प्रस्थापित होतो त्यांच्या व्यक्तिमत्वांचे नानाविध कंगोरेदेखील वाचकांना न्याहाळता येतात. भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये थोडीथोडकी नव्हे तर, पुरी ३८ वर्षे सेवा बजावून निवृत्त झालेले ज्येष्ठ सनदी अधिकारी अनिल स्वरूप यांच्या प्रस्तुत आठवणी त्यांचमुळे विलक्षण रंजक आणि वाचनीय ठरतात. या आठवणींचे स्वरूपदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. विविध पदांवर जबाबदाऱ्या निभावत असताना राजकारण आणि प्रशासन या दोन क्षेत्रांतील ज्या उच्चपदस्थांशी अनिल स्वरूप यांचा संपर्क आला अशा ९५ व्यक्तिमत्वांबरोबर झालेल्या त्या भेटींदरम्यान मनावर उमटलेल्या त्या त्या व्यक्तींच्या प्रतिमा अनिल स्वरूप यांनी मोजक्या शब्दांत इथे रेखाटलेल्या आहेत. त्यांपैकी काहींशी तर त्यांचा संबंध, कारणपरत्वे, अगदी अल्पकाळ आणि तोदेखील एकदाच आला. त्यांमुळे, या पुस्तकात शब्दबद्ध झालेल्या व्यक्तिगत आठवणींद्वारे पुढ्यात प्रगटणारे त्या त्या हस्तींच्या कार्यकर्तृत्वाचे रेखाटन म्हणजे त्यांच्या कार्यकलापाचे मूल्यमापन नसून ते लेखकाच्या त्या व्यक्तीशी झालेल्या त्या भेटीदरम्यानचे क्षण-स्मरणचित्र होय, याची आठवण लेखक ठायीठायी करून देतो. राज्यपातळीवर तसेच देशपातळीवर नानाविध पदे व जबाबदाऱ्या भूषविलेल्या राजकीय हस्तींच्या कार्यदिशेचे आणि स्वभावाचे रंजक कंगोरे प्रकाशात आणणारे लेखककृत खुसखुशीत वर्णन जितके रोचनीय तितकेच प्रसंगी विषाददायकही ठरते. आपल्या देशातील राजकारणाचा आणि प्रशासनाचा पोत नेमका कसा घडत आलेला आहे आणि त्याचे विद्यमान अंतरंग नेमके कसे आहे, हे न्याहाळण्याचा झरोका प्रस्तुत स्मृतिसंग्रहाद्वारे वाचकांना खुला झालेला आहे. ■■

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**